
# ॲडॉल्फ हिटलर

रघुवीरसिंह राजपूत




अॅडॉल्फ हिटलर
रघुवीरसिंह राजपूत

# अॅडॉल्फ हिटलर



रघुवीरसिंह राजपूत

अॅडॉल्फ हिटलर

रघुवीरसिंह राजपूत

•

प्रकाशन क्रमांक / 1441

•

प्रकाशक

साकेत बाबा भांड,

साकेत प्रकाशन प्रा. लि.,

115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,

औरंगाबाद - 431 005,

फोन- (0240)2332692/95.

www.saketpublication.com

info@saketpublication.com

•

पुणे कार्यालय

साकेत प्रकाशन प्रा. लि.,

ऑफिस नं. 02, ‘ए’ विंग, पहिला मजला,

धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,

कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030

फोन- (020) 24436692

सतत लिखाणाला प्रेरणा देणारी माझी प्रिय पत्नी

**सौ. सुशल**

हिच्या पुण्य स्मृतीस...

# प्रस्तावना

अॅडॉल्फ हिटलर! इतिहासातील एक कलंकित व्यक्तिमत्त्व. कोणीही चांगल्या भावनेने हे नाव उच्चारत नाही. ज्यांना पूर्ण इतिहास माहीत नाही, त्यांच्या मनातही या नावाबद्दल घृणाच ओतप्रोत भरून राहिलेली. का? कारण संबंध काहीच नाही. 'पीछे से आयी, आगे धकायी' इतकेच.

इतिहासप्रसिद्ध व्यक्तींपैकी तिघांबद्दल मनात नेहमीच एक सुप्त कुतूहल सामावलेले आहे. ग्रीसचा सिकंदर किंवा अलेक्झांडर, फ्रान्सचा नेपोलियन बोनापार्ट आणि जर्मनीचा अॅडॉल्फ हिटलर किंवा फ्यूहरर. तसे तिघेही बाहेरचेच!

अनेक लेखकांनी या तिघांबद्दल लिहून ठेवले आहे. त्याबाबत अनेक चर्चा, वादविवाद आजही होतात. पण काहीही झाले तरी इतिहास खराच असतो. दुसऱ्या विश्वयुद्धासाठी हिटलरला जबाबदार धरले गेले, पण नीट विचार केला तर एक वेगळीच पार्श्वभूमी मान्य करण्यावाचून गत्यंतर राहत नाही. तत्कालीन कारणे कोणतीही असोत, हे विश्वयुद्ध होणारच ही गोष्ट 20 वर्षांपूर्वीच नक्की झाली होती.

1919च्या व्हर्सायच्या तहातच 1939च्या द्वितीय महायुद्धाचे मूळ लपलेले होते. जर्मनीचे खच्चीकरण करण्यासाठी दोस्त राष्ट्रांनी एक प्रकारे कट करून जर्मनीवर ज्या अटी लादल्या आणि जी बंधने घातली होती तीच उघड उघड जर्मनीच्या सार्वभौमत्वाच्या नरडीचा घोट घेणारी होती.

स्वाभिमानी जर्मन नागरिकांच्या मनात तो तह एखाद्या अणकुचीदार काट्याच्या टोकाप्रमाणे खुपत होता, सलत होता. अॅडॉल्फ हिटलरने ही परिस्थिती हेरली. लोकांच्या भावनात्मक मन:स्थितीचा अभ्यास करून त्याने बरोबर फायदा उचलला.

त्याची संपूर्ण योजना यशस्वी झाली असती तर जगाने त्याच्या त्रुटी शोधत न बसता त्याला 'जगज्जेता' म्हणून डोक्यावर घेऊन मिरवले असते. इतिहासाने त्याच्या शौर्याच्या रसभरीत वर्णनाने पानेच्या पाने रंगवली असती.

जगात नेहमी जेत्याचा उदोउदो होतो. पराजिताला कोणाचीच सहानुभूती मिळत नाही. उलट सगळीकडून खूप अवहेलना सहन करावी लागते. असे काही भोगावे लागू नये म्हणून शेवटी हिटलरने स्वत:च आत्महत्या करून स्वत:ची सुटका करून घेतली.

**- रघुवीरसिंह राजपूत**

# अॅडॉल्फचा जन्म

काही समाजात असा समज किंवा अंधश्रद्धा प्रचलित आहे की, माणसाचा जन्म ज्या दिवशी, ज्या वाराला होतो त्याच वाराला त्याचा मृत्यूदेखील होतो म्हणे! खरे-खोटे राम जाणे! तसा नक्की काही अनुभव तर सांगता येणार नाही. अॅडॉल्फ हिटलरबाबत मात्र याच्याशी मिळताजुळता योगायोग इतिहासाच्या साक्षीने घडून आला. ज्या महिन्यात हिटलरचा जन्म झाला तो महिना एप्रिल होता. ज्या महिन्यात हिटलरने आत्महत्या करून स्वतःला संपविले तो महिनाही एप्रिलच होता.

20 एप्रिल 1889, संध्याकाळचे 6.30वाजलेले. ऑस्ट्रियातील एक लहानसे खेडे. नाव ब्रानऊ. हे गाव जर्मन सीमेपलीकडे होते. मात्र गावाचे जास्तीत जास्त व्यावसायिक संबंध जर्मनीतील मोठमोठ्या शहराशी संलग्न असलेले.

ब्रानऊमध्ये एलोइस नावाचे एक गृहस्थ राहत. त्यांचा जन्म झाला होता 1837 मध्ये. त्यांच्या आईचे नाव मारिया ऐना शिकलग्रुबर. एलोइसचा बाप कोण हे कोणाला माहीत नव्हते. कोणी त्याविषयी मुद्दाम विचारपूस अगर चौकशी केली नाही.



काहीतरी कामकाज करावे म्हणून तेरा वर्षांचा एलोइस व्हिएन्नात आला. तो पाचच वर्षांचा असताना त्याची आई मारिया ऐना शिकलग्रुबर हिने जोहन जॉर्ज हाइडलर याच्याशी विवाह केला. केवळ पाच वर्षांच्या वैवाहिक सुखोपभोगानंतर मारिया स्वर्गवासी झाली. एलोइस आपल्या काकाकडे जाऊन थांबला. तो काकाच्या शेतीची देखरेख करू लागला. त्याचा काका घमेंडी होता.

एलोइसचे शेतीकामात लक्ष लागेना. उदरनिर्वाहासाठी साधनाच्या शोधात त्याने काकाचे घर-गाव सोडले. त्याला नक्की कुठे जायचे हे माहीत नव्हते. मात्र त्याची पावले व्हिएन्ना शहराकडे वळली. तेथे एका चांभाराकडे राहून तो काम शिकला. नंतर ऑस्ट्रियाच्या प्रशासकीय सेवेत भरती होऊन तो एक कनिष्ठ सीमा शुल्क अधिकारी झाला. 1875 पर्यंत मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर तो वरिष्ठ सहायक निरीक्षक पदापर्यंत पोहोचला.

एलोइसला बापाचा ठावठिकाणा माहीत नसल्याने स्वतःच्या नावाच्या अंतिम ठिकाणी तो आईचे आडनाव शिकलग्रुबर लावायचा. ग्रामीण ऑस्ट्रियात त्या काळी ही पद्धत होती. काकाने एलोइसला पटवले. स्वतःचे आडनाव बदलून ते 'हाईडलर' करण्यास राजी केले. रेकॉर्डला याची नोंद घेताना 'हिटलर' अशी घेतली जाऊन पुढे तेच नाव प्रचलित झाले.

1885पर्यंत एलोइसची बरीच प्रेम प्रकरणे आणि दोन अपयशी विवाह गाजले. शेवटी 48 वर्षीय विधुर एलोइस हिटलरने चाचा हाऊलरची 24 वर्षीय गर्भवती नात क्लारा पॉल्जल हिच्याशी विवाह केला. पूर्वीच्या विवाहसंबंधातून जन्मलेली त्याची मुले

एलोइस हिटलर ज्युनिअर आणि मुलगी एंजेला त्याच्या लग्नात सामील झाले.



क्लारा पॉल्जलची पहिली दोन मुले आणि एक मुलगी जगू शकली नाही. 20 एप्रिल 1889 रोजी सायंकाळी 6.30 वाजता क्लाराच्या चौथ्या अपत्याचा जन्म झाला. तोच अॅडॉल्फ! अॅडॉल्फ हिटलर. त्याचा नामकरण संस्कार रोमन कॅथॉलिक पद्धतीने करण्यात आला. तो एक सुंदर आणि सुदृढ बालक होता. यापूर्वीच्या तीन बालकांचा मृत्यू झालेला होता.

क्लारा अॅडॉल्फची खूप काळजी घ्यायची. त्याला जीव लावायची. तो आईचा अतिशय लाडका होता. लहानपणी सर्वजण कौतुकाने त्याला ‘एडी’ म्हणत. तो पाच वर्षांचा असताना 1893 मध्ये लहान भाऊ एडमंडचा आणि 1896 मध्ये लहान बहीण पॉलाचा जन्म झाला.

### खडतर बालपण

हिटलर सहा वर्षांचा असताना 1895 मध्ये ऑस्ट्रियातील लिंज शहराजवळच्या फिचहॅम नावाच्या गावच्या पब्लिक स्कूलमध्ये त्याला पहिलीत प्रवेश मिळाला.

याच वर्षी म्हणजे 1895 मध्ये हिटलरचे वडील म्हणजे एलोइस हिटलर ऑस्ट्रियाच्या प्रशासकीय सेवेतून निवृत्त होऊन पेन्शनमध्ये निघाले. नोकरीच्या काळात काही सवयी त्यांच्या अंगवळणी पडल्या होत्या. त्यांना आदेश देण्याची आणि समोरच्या माणसांवर ते सक्तीने लादण्याची शासकीय सवय किंवा शिस्त लागली होती.

ते अॅडॉल्फवर कडक नजर ठेवीत. प्रसंगी मारहाणही करीत. खास करून अॅडॉल्फचा सावत्र भाऊ एलोइस ज्युनिअरवर त्यांचा कोण जाणे का विशेष दात होता. त्यांच्याकडून सतत केल्या जाणार्या जाचाला शेवटी तो मनापासून उबगला. एके दिवशी तो घर सोडून पळून गेला. अॅडॉल्फला खूप वाईट वाटले; पण वडिलांच्या हेकट स्वभावापुढे कोणाचे काही चालत नसे.

वडील जिवंत असेपर्यंत तो भाऊ घरी परत आला नाही.

आता त्यांच्या नजरेसमोर होता अॅडॉल्फ. त्यांच्या शिस्तीची झळ त्याला बसू लागली; परंतु तक्रार न करता तो शांतपणे सर्व सहन करीत होता.

ऑस्ट्रियात लिंज शहराबाहेर हिटलर कुटुंबाची थोडीफार शेतीवाडी होती. ती सोडून संपूर्ण परिवार लंबाख शहराकडे निघून गेला. यानंतर ते कोठेही स्थायिक झाले नाहीत. वास्तव्याची शहरे एकसारखे बदलत राहिले. ती कुटुंबप्रमुख एलोइसची लहर होती. त्याला काहीच पर्याय नव्हता.

लंबाखला संत बेनेडिक्ट कॅथॉलिक यांचा चर्च आणि मठ होता. त्यांच्यामार्फत शाळाही चालवली जायची. वारंवारच्या स्थलांतरामुळे अॅडॉल्फच्या शिक्षणाची हेळसांडच सुरू होती. आता त्याचे नाव त्या मठाच्या शाळेत टाकण्यात आले. तेथे आधीचीच जी मुले होती ती शहरी असल्याने मुळातच हुशार होती. त्यांच्या तुलनेत

अ ॅडॉल्फ मागे पडायचा. त्यामुळे शिक्षकही त्याच्याकडे दुर्लक्ष करायचे. विद्यार्थी चिडवायचे. तसा हिटलरही इतका काही गरीब स्वभावाचा नव्हता. इतर मुलांची तोंडे बंद करण्याच्या दृष्टीने तो खूप मन लावून अभ्यास करायचा. तरीही तो नापास झाला.

वडिलांना चघळायला आयता चांगला विषय मिळाला.

त्या काळी मे नावाचा एक सुप्रसिद्ध लेखक होऊन गेला. त्याने लिहिलेली सर्व 70 पुस्तके अ ॅडॉल्फने पुन्हा पुन्हा वाचून काढली. लढायासंबंधीची पुस्तके संग्रहित ठेवली. पुढे सैन्याधिकारी झाल्यावर अधिकार्यांनी मेची ती पुस्तके स्वत:च्या संग्रही ठेवावीत म्हणून त्याने आदेशच काढला.

ती पुस्तके वाचल्याने लढण्यासाठी जोम येतो असा त्याचा दृढविश्वास होता.

1898 मध्ये ते पुन्हा लिंज जवळच्या लिओनडिंग गावात राहायला आले. गावाला खेटून एक अतिशय सुंदर बगीचा होता; पण एक विचित्र विरोधाभास म्हणजे त्या बगीच्याला लागूनच स्मशानभूमी होती.

वडिलांनी त्याचे नाव लिओनडिंगच्या शाळेत दाखल केले. तो नियमित शाळेत जाऊ लागला. त्याला तेथील अभ्यासक्रम बराच सोपा वाटला. त्यामुळे तो अभ्यासात रमला. एक गोष्ट त्याच्या लक्षात आली. त्याच्या मनाचा ओढा खास करून चित्रकारिता आणि वास्तुशिल्पाकडे फार होता.



एखादी वास्तू त्याने फक्त एकदा नजरेखालून घातली की, तिचा नकाशा कितीही कठीण आणि गुंतागुंतीचा असो त्याच्या मनात ठसायचा. घरी परतल्यावर केवळ स्मरणशक्तीच्या बळावर तो त्याचा हुबेहूब स्केच तयार करायचा. ती त्याला नैसर्गिकरीत्या प्राप्त झालेली एक फार मोठी देणगी होती.

जर तो राजकारणात गेला नसता तर कदाचित आज जगाला तो उत्कृष्ट वास्तुविशारद म्हणून माहिती झाला असता.

त्याच्या वडिलांचा ग्रंथसंग्रह विपुल होता. तो नेहमी त्यांच्याबरोबरच राहायचा. त्यात विविध विषयांवरची दुर्मीळ पुस्तके होती. युद्धविषयक पुस्तकांचा त्यात जास्त भरणा होता. शोधता शोधता एक पुस्तक हाती लागले. 1870-71 सालात फ्रान्स आणि जर्मनीमध्ये झालेल्या युद्धाचे ते सचित्र पुस्तक होते.

अ ॅडॉल्फने ते पुन्हा पुन्हा वाचले. त्याचे समाधान कसे ते होईचना. तो अत्यंत प्रभावित झाला. युद्ध आणि सैनिकांचा संदर्भ असलेली प्रत्येक गोष्ट त्याला उत्साहित करायची.

ॲडॉल्फ मनाला एकाग्र करण्यात यशस्वी होत होता. अचानक त्या परिवारात एक दु:खद घटना घडली. दिसायला अत्यंत नाजूक आणि सुंदर असा अ ॅडॉल्फचा लहान भाऊ होता; एडमंड त्याचे नाव. मोठ्या भावाचा खूप तो लाडका होता. तेव्हा त्याचे वय होते सहा वर्षे. तो किरकोळ आजारी पडला. पाहता पाहता त्या लहानग्यावर

काळाने झडप घातली.

भावाच्या आकस्मिक जाण्याचे दु:ख होतेच. त्यात पुन्हा दुर्दैव असे की, अॅडॉल्फची उठण्या-बसण्याची, रात्री झोपण्याची जी खोली होती तिची एक खिडकी एडमंडचा दफनविधी ज्या स्मशानभूमीत झाला होता, त्याच बाजूला उघडायची. त्या खिडकीत बसून अॅडॉल्फ स्मशानाकडे पाहत राहायचा. भावाची आठवण जास्तच अस्वस्थ करू लागली म्हणजे रात्री-बेरात्री केव्हाही उठून स्मशानाच्या भिंतीवर एकटाच जाऊन बसायचा. सारखा आकाशाकडे पहायचा. कोणी हटकलेच तर भावुकपणे म्हणायचा, ‘‘माझी आई म्हणते की, ज्या लहान-निरागस बालकांना परमेश्वर असा मधूनच बोलावून घेतो, त्यांना तारे बनवून, आकाशाच्या मंडपात टांगून ठेवतो म्हणे! मी त्या असंख्य तार्‍यात एडमंडचा तारा कोणता आहे हे शोधण्याचा प्रयत्न करतोय…’’

हटकणारा बिचारा काय उत्तर देणार! रात्रीच्या अंधारात खाली मान घालून तो गुपचूप निघून जायचा.

अॅडॉल्फचे एक स्वप्न होते-कलाकार बनण्याचे. पण वडील त्याच्या भावनांची कदर करीत नसत. सप्टेंबर 1900 मध्ये ते त्याला लिंजच्या औद्योगिक शाळेत टाकून त्यांनी आपला हेका पूर्ण केला. त्याला त्या शिक्षणात स्वारस्य नसल्याने तो इतर मुलांच्या मानाने मागे पडत गेला. वडिलांचा धाक असल्याने तक्रार करायची सोयच नव्हती.

हिटलर अत्यंत संतापी होता. पुढे युद्धखोर म्हणून त्याचा भरपूर दुर्लौकिक पसरला, मात्र संगीत-नाटके पाहण्याचाही त्याला सुरुवातीच्या काळात अतिशय छंद होता. संगीतकार रिचर्डवाग्नेरच्या संगीतनाट्याने अॅडॉल्फच्या मनावर चांगलाच पगडा बसविला.

बापलेकांचे विचार बर्‍याच वेळा एकमेकांना पटत नसत. तरीही अॅडॉल्फने एलोइसला कधी विरोध केला नाही. त्यांच्या आज्ञेचे कधी उल्लंघन केले नाही.

•••

# वंशद्वेषाचा आरंभ

याच काळात जर्मन राष्ट्रवादाचा जन्म झाला. ऑस्ट्रियाच्या ज्या भागात हिटलर अॅडॉल्फ वाढला, मोठा झाला तो भाग जर्मन सीमेला लागून होता. त्या परिसरातील बहुतेक रहिवासी स्वत:ला जर्मन-ऑस्ट्रियन नागरिक समजत. जर्मनीचा होहेनजोलर्न राजवंश आणि त्याचा सम्राट यांच्या प्रति त्या लोकांची नितांत श्रद्धा; तसेच निष्ठा होती. राजेशाहीवर लोकांचा इतर सत्तांपेक्षा जास्त विश्वास होता.

अॅडॉल्फच्या मनातही जर्मनीबद्दल हार्दिक आदर होता. त्याचबरोबर ऑस्ट्रियन हेप्सबर्ग राज्यप्रणालीविरुद्ध त्याच्या मनात कमालीची विरोधी भावना उपजतच भरून राहिली होती.

त्याच्या शाळेत इतिहासाचे शिक्षक होते डॉ. लियोपोल्ड पोत्श. ते जर्मनीच्या बिस्मार्क आणि फ्रेडरिक महानसारख्या वीरपुरुषांची गौरवगाथा अतिशय रंगवून शिकवीत. विद्यार्थी जागेवर खिळून बसत. त्यांचे विचार ऐकून अॅडॉल्फ स्वत: भारावला. त्याला जर्मन राष्ट्रवादाने झपाटले.

## अकाली प्रौढत्व

काळ कधी शांत बसत नाही. नेहमी काहीतरी घडवीत असतो. कधी चांगले, कधी वाईट. एक मात्र खरे, पूर्वसूचना देऊन किंवा सांगून काहीच होत नाही. एलोइस एक भारदस्त व्यक्तिमत्त्व होते; मात्र ते फुप्फुसाच्या आजाराने त्रस्त होते. त्यांचे वय होते 65 वर्षे.

सर्व युरोपियनांचे आवडते पेय म्हणजे दारू. एलोइसही सकाळ-संध्याकाळ एका ठराविक मर्यादेमध्ये दारू घ्यायचे. त्यांचा कोणाला काही त्रास नव्हता.

तारीख होती 3 जानेवारी, 1903 आणि वार शनिवार होता. सकाळची वेळ. नित्याप्रमाणे एलोइस अंथरुणातून उठले. दररोज फिरायला त्यांचा परिपाठ होता. ते रोजच्याप्रमाणे निघाले. एका नेहमीच्या सराफाजवळ थांबले. ठराविक दारूची ऑर्डर दिली. एका खुर्चीवर बसले. दारूचा ग्लास भरून समोरच्या टेबलावर येण्याआधीच ते खुर्चीवरून कोसळले. उपचाराची संधी न मिळता त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

सर्व विरोध गळून पडला

अॅडॉल्फचे वय त्या वेळी होते केवळ 13 वर्षे. इतक्या लहानशा वयात त्याच्यावर पूर्ण परिवाराची जबाबदारी येऊन पडली. फक्त आईच्या सल्ल्याने आणि संमतीने योग्य ते निर्णय घेण्यास तो आता मोकळा झाला. गुदमरलेले वातावरण नाहीसे झाले.

तसे एलोइसने परिवाराला काही हवेवर सोडले नव्हते. कुटुंबासाठी बरीच रक्कम ते सोडून गेले होते. त्यांनी वारसा हक्क प्रमाणपत्रही करून ठेवले होते. त्यानुसार अॅडॉल्फची आई क्लारा पॉल्जलला नवऱ्याची अर्धी पेन्शन मिळू लागली. अॅडॉल्फलाही दरमहा छोटीशी रक्कम मिळण्याची सोय झाली. वारसाहक्काने मालमत्तेचाही काही हिस्सा अॅडॉल्फला मिळाला.

अॅडॉल्फ लिंजच्या टेक्निकल हायस्कूलमध्ये शिकू लागला. तेथे तो एका

बोर्डिंगमध्ये राहायचा. आपला जास्तीत जास्त वेळ तो वाचन करण्यात आणि निसर्गचित्रांसह विविध प्रकारची चित्रे काढून ती रंगवण्यात घालवायचा. मात्र त्याचे अभ्यासाकडे फारसे लक्ष नसायचे. उलटसुलट तर्कवितर्कांनी तो शिक्षकांना खूप त्रास द्यायचा.

वास्तुशिल्प आणि चित्रकलेची अॅडॉल्फला फारच गोडी होती, हे तर या आधी सांगितलेच आहे.



स्वत:ला तो इतरांपेक्षा खूप श्रेष्ठ समजायचा. अगदी मरेपर्यंत त्याचा हा समज कायम होता. वर्गात इतर विद्यार्थ्यांनी विरोध न करता फक्त आपलेच ऐकावे, आपल्याला मान-सन्मान द्यावा असे त्याला वाटायचे. मग इतरांचा गैरसमज होणे ही एक सर्वसामान्य स्वाभाविक प्रतिक्रिया होती.

सप्टेंबर 1904 मध्ये लिंजपासून 25 मैल अंतरावर असलेल्या 'स्टिमर' नावाच्या लहानशा शहरातल्या शाळेत प्रवेश घेऊन अॅडॉल्फने आपले पुढचे शिक्षण चालू ठेवले.

सप्टेंबर 1905 मध्ये परीक्षा झाली. त्यात तो चांगल्या मार्कांनी पास झाला. मित्रांसोबत दारू पिऊन आनंदोत्सव साजरा करून त्याने प्रतिज्ञा केली,

"या निमित्ताने मी आज अशी प्रतिज्ञा करतो की, यानंतरच्या संपूर्ण आयुष्यात मी दारूच्या थेंबालादेखील स्पर्श करणार नाही."

मरेपर्यंत अॅडॉल्फने या प्रतिज्ञेचे पालन केले. तो मोठ्या पार्ट्यांत सामील व्हायचा; परंतु दारू न पिता.

## तारुण्याचे अवघड वळण

यानंतर वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने शिक्षणापासून फारकत घेतली. 'स्टिमर' सोडून तो परत लिंज शहरात आला. शिक्षणाला रामराम ठोकलेला. धंदापाणी काही नाही. दिवसभर मौजमजा करण्यात वेळ घालवायचा. पुढे काय वाढून ठेवलेले आहे, याबाबत पूर्ण बेफिकीर, निश्चिंत!

या काळात त्याला एक मित्र मिळाला - अगस्त कुबिजेक!

कुबिजेकची एक महान संगीतकार बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. अॅडॉल्फची त्याच्यावर श्रद्धा होती. तो फक्त त्याचेच म्हणणे कान लावून ऐकायचा. दुसऱ्याने कितीही जीव तोडून सांगितले तरी अॅडॉल्फला दुसऱ्याचे म्हणणे अजिबात पटत नसे.

अॅडॉल्फ हिटलरच्या प्रारंभिक जीवनात त्याची कोणीच प्रेयसी नव्हती असे म्हणतात, प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच होती. एक मुलगी होती, स्टिफेनी नावाची! ती अॅडॉल्फला फार आवडायची.

ती होतीच तशी. कोणालाही पाहताक्षणीच आवडू लागावी अशी! सोनेरी केसांची, गोरीपान, सुंदर स्टिफेनी तारुण्याने रसरसलेली होती. हिटलर नकळत तिच्यावर एकतर्फी प्रेम करू लागला होता. ती रस्त्याने जाऊ लागली की, तो तिचा पाठलाग करायचा. तिच्यासाठी अॅडॉल्फने बऱ्याच कविता, प्रेमगीते लिहिली. त्यातील एकही तिला देण्याची हिंमत मात्र केली नाही.

हिटलरने एकदा तिला प्रेमपत्र लिहिले. मात्र त्यावर सही केली नाही किंवा नाव लिहिण्याचेही धाडस त्याला झाले नाही. मात्र स्टिफेनीला दुसऱ्या एखाद्या तरुणाशी बोलताना पाहिले की, त्याच्या मनात ईर्षा दाटून यायची.

जर्मन जात आणि जर्मनीच्या प्रत्येक चीज-वस्तूंबाबत त्याच्या मनात प्रचंड आत्मीयता निर्माण झाली. ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याचे हॅप्सबर्ग राजघराणे तसेच त्या राज्यातील जर्मनांव्यतिरिक्तच्या इतर जनजाती याबद्दल त्याच्या मनात पराकोटीची घृणा निर्माण झाली. त्या साम्राज्याची राजधानी होती व्हिएन्ना. व्हिएन्नाला कला, संगीत आणि प्राचीन युरोपियन संस्कृतीचे जागतिक केंद्र समजले जाई.

वयाच्या सत्तराव्या वर्षी 1906 मध्ये वसंत ऋतूत अॅडॉल्फ व्हिएन्नाला गेला. त्या शहरातील वास्तुकलेने त्याला मोहित केले. निरनिराळ्या मॉडेलच्या इमारती नेहमीच त्याचे लक्ष वेधून घेत.

विचार करता करता त्याला शिक्षणाचे महत्त्व कळून चुकले. स्वत:ची प्रगती करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे कोणी न सांगताही त्याच्या लक्षात आले. आईची तब्येत जरा नाजूकच होती. तरीही तिच्या परवानगीने वयाच्या अठराव्या वर्षी 1907 मध्ये तो शिक्षणासाठी व्हिएन्नाला गेला.

### आईचा स्वर्गवास

क्लाराची तब्येत अलीकडे बिघडतच चालली होती. मात्र प्रापंचिक जबाबदारीच्या ओझ्यामुळे ती त्याकडे दुर्लक्ष करत होती.

तिची छाती जास्त दुखू लागली. क्लारा पॉल्जल आपल्या फॅमिली डॉक्टरकडे गेली. त्याने तपासून निदान केले,

“मॅडम तुम्हाला स्तनाचा कॅन्सर झाला असून तो शेवटच्या पातळीला पोहोचला आहे. अर्थात उपचाराच्या पलीकडे निघून गेला आहे.

आजार वाढतच गेला. शरीर अस्थिपंजर झाले. पायऱ्या चढून घरामध्ये जाण्याचीही शक्ती राहिली नाही. शेवटी नाइलाज म्हणून ते लिंजजवळच्या एका उपनगरात खालच्या मजल्यावर राहायला गेले. परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडतच गेली.

अॅडॉल्फ अॅकॅडमीच्या प्रवेश परीक्षेत नापास झाला. क्लारा पॉल्जलचे कॅन्सरसाठी केलेले ऑपरेशन अयशस्वी झाले होते. आईच्या आजारामुळे व्हिएन्नातून त्याचे मन उडाले. त्याचा तेथे जम बसेना. त्याने व्हिएन्ना सोडले. तो लिंजला आपल्या घरी परत आला.

तो आपल्या आईचा खूपच लाडका होता. आईबद्दल त्याच्या मनात अथांग भक्ती होती. घरी आल्यावर तो आजारी आईची मनापासून शुश्रूषा करू लागला. मन

लावून केलेल्या सेवेमुळे तो फारच समाधानी होता. त्यात दररोजच्या घरकामांचा समावेश होता. उदाहरणार्थ दोन्ही वेळचा स्वयंपाक, घरची झाडलोट, साफसफाई यावर तो जातीने लक्ष देऊ लागला.

अखेर तो दुर्दिन उगवला. 21 डिसेंबर, 1907. सर्वत्र पाच दिवसांवर आलेल्या ख्रिसमस सणाची धामधूम. सकाळीच क्लाराची तब्येत जास्तच बिघडली. उपचार सुरूच होते; पण उपयोग झाला नाही. त्या सकाळीच अॅडॉल्फची ममताळू आई क्लारा त्याला सोडून दूर निघून गेली. तिच्या सर्व यातना संपुष्टात आल्या.

लिओडिंगच्या स्मशानभूमीत ज्या ठिकाणी एलोइस आणि एडवर्ड या पिता-पुत्राचा दफनविधी झालेला होता, तेथेच क्लारा हिटलरचा दफनविधी आटोपण्यात आला.

आईच्या स्वर्गवासाने अॅडॉल्फ अत्यंत दु:खी आणि सैरभैर झाला. मृत्यू प्रमाणपत्रावर सही करताना क्लारावर उपचार केलेला डॉक्टर म्हणालादेखील,

‘‘अॅडॉल्फला त्याच्या आईच्या जाण्यावर जितके दु:खी झालेले मी पाहिले तितके इतर कोणाला त्याच्या आईच्या मृत्यूवर आक्रंदित होताना पाहिले नाही.’’



दुसऱ्या दिवशी डॉक्टरचे बिल भरण्यासाठी त्यांच्याकडे गेलेला अॅडॉल्फ साश्रूनयनांनी कृतज्ञतेने त्यांना म्हणाला,

‘‘डॉक्टरसाहेब! मी आपला अखंड ऋणी राहीन. आपले उपकार कधी विसरणार नाही.’’

आई गेल्याने अॅडॉल्फ खूपच अस्वस्थ आणि हवालदिल झाला. लिंजमध्ये राहिल्याने आईच्या आठवणी स्वस्थ बसू देईनात. त्याने कला अकादमीत प्रवेश घेण्याचा विचार केला. लिंजमध्ये ती व्यवस्था नसल्याने तो पुन्हा व्हिएन्नात आला. एलोइसने मरताना त्याच्यासाठी ज्या काही आर्थिक तरतुदी करून ठेवल्या होत्या त्यांचा वापर करून झाला होता.

•••

# कशासाठी? पोटासाठी!

व्हिएन्नात परत आलेल्या अॅडॉल्फच्या खिशात खर्चण्यासाठी दमडा नव्हता. त्याचे फार हाल झाले. थांबायला कुठेच जागा नव्हती. सार्वजनिक बागेत बसण्यासाठी जे सिमेंटचे बाकडे केलेले होते त्यावर थंडी, वारा, ऊन यांची पर्वा न करता झोपून त्याला अख्खी रात्र डासांच्या सहवासात घालवावी लागे.

रात्र अशा तऱ्हेने पार पडे; पण दुसरा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न होता - पोटापाण्याचा! अॅडॉल्फ अशी एखादी धर्मशाळा शोधायचा जेथे गरीब-अनाथांसाठी मोफतचे अन्नछत्र चाललेले असायचे, तेथे इतर लोकांत बसून तो पोटाची आग विझवून शांत करायचा. त्याची रोजच्या वापराच्या कपड्यांचीही खूप दैना झाली.

ऑस्ट्रो-हंगेरियाची राजधानी व्हिएन्ना असल्याचा उल्लेख या आधीही आलेला आहे. अॅडॉल्फला सावरण्यासाठी त्या शहराचाच आधार घ्यावा लागला. त्याचा एकुलता एक मित्र अगस्त कुबिजेक लिंजमध्येच मागे राहिला होता. नशीब अजमावण्यासाठी अॅडॉल्फपाठोपाठ तोही व्हिएन्नाला आला. दोघे एका खोलीत एकत्र राहू लागले.

कुबिजेकने हिटलरचा फार सूक्ष्मपणे अभ्यास केला होता. तो म्हणायचा,

"हिटलरची वागणूक डळमळीत होत चालली आहे. त्याच्या स्वभावाचे पैलू उलगडणे जरा जिकिरीचेच. तो कधी कधी एखाद्या शहाण्या माणसासारखा बोलतो, वागतो; पण अचानक त्याच्या रागाचा कधी कडेलोट होईल याचा भरवसा नाही. त्याची एखादी गोष्ट चूक असली आणि आपण तसे सांगितले तर मग त्याचा संताप पाहण्यासारखा असायचा."

स्वत:ला अति उच्च समजण्याच्या घमेंडीत त्याने स्वत:साठी एखादी चांगली आणि कायमस्वरूपाची नोकरीसुद्धा शोधण्याचा प्रयत्न केला नाही. कुबिजेक मात्र खूपच प्रयत्नवादी होता. त्याचे चांगले चालले होते. कोणाचे चांगले चाललेले आणि आपल्यापेक्षा व्यवस्थित झालेले अॅडॉल्फला सहन होत नसे.

नोव्हेंबर 1908 मध्ये कुबिजेक दोन महिन्यांचे सैनिकी प्रशिक्षण पूर्ण करून खोलीवर परत आला. पाहतो तर अॅडॉल्फ खोली सोडून गायब! आजूबाजूला, शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे चौकशी केली. अॅडॉल्फ कोणाला काही सांगून गेलाच नव्हता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिटलरवाचून कुबिजेकचे काही नडणार नव्हते.

अॅडॉल्फ एकटाच भटकत राहिला. जवळचे सर्व पैसे संपले. तेव्हा कधी कधी पैशासाठी अक्षरश: भीक मागून त्याला वेळ मारून न्यावी लागली.

फेब्रुवारी 1910 मध्ये हिटलरने एका दरिद्रीगृहात आश्रय घेतला. दिवसा मजुरी करून तो काही कमवायचा. त्याला बर्फ हटवण्याचे आणि रेल्वेस्टेशनवर सामान उचलून वाहून नेण्याचे काम करायला मिळायचे.

विचार करता करता त्याच्या मनाने असा कौल दिला की, व्हिएन्नातील प्रेक्षणीय स्थळांची चित्रे तयार करून ती विकून आपण गरजेपुरता पैसा मिळवू शकतो. तो पोस्टकार्डवर चित्रे तयार करून रेन्हॉल्ड हॅनिसमार्फत त्यांची विक्री करू लागला.

काही काळ त्याने दुकानांच्या खिडक्यांचे पोस्टर बनविण्याचे कामही केले.

अॅडॉल्फबाबत हॅनिसचे मत तितकेसे चांगले नव्हते. सन 1938 ची गोष्ट जेव्हा अॅडॉल्फ हिटलर जर्मनीचा सर्वेसर्वा झाला, तेव्हां हॅनिशने अॅडॉल्फच्या भूतकाळाबाबत वर्तमानपत्रवाल्यांकडे तोंड उघडले. हिटलरला त्याची ही कृती काही आवडली नाही. त्याने त्याच्या खास मारेकऱ्यांना आदेश दिला. हॅनिशचा निर्घृणपणे खून करण्यात आला.

## बदलाचे वारे

अॅडॉल्फला वाचण्याचा छंद होता. जर्मनीचा इतिहास आणि पौराणिक कथांची पुस्तके यांची त्याला विशेष गोडी होती. तो अत्यंत चिकित्सक वृत्तीचा होता. हव नियंत्शे, हेजिल, फिश्ते त्रेत्शके आणि इंग्रज तत्त्ववेत्ता ह्युस्टन एर्टीवार्ट चेंबरलेन या लेखकाच्या कठीण तत्त्वप्रणालीवर तो चिंतन करीत असायचा.

गरिबी आणि निर्धनावस्था, लहान वयातच आई-बाप आणि आवडत्या लहान भावावर मृत्यूने घातलेला घाला अनुभवावा लागल्याने दु:खाबरोबरच हिटलरच्या मन:स्थितीवर अनिष्ट परिणाम झाला. तो स्वभावाने कठोर आणि रुक्ष बनला. त्याच्या शब्दकोशातून दया-माया हे शब्द हळूहळू हद्दपार होऊ लागले.

21 वर्षे वय असताना त्याच्या मनात अचानक राजकारणाची ओढ निर्माण झाली. व्हिएन्नात त्याच्या सभोवती काय चालले आहे यावर तो लक्ष देऊ लागला.

व्हिएन्ना शहराची लोकसंख्या जवळपास 20 लाख होती. त्यात यहुदींची संख्या 2 लाख होती. काही यहुदी तरुणांचे आणि अॅडॉल्फचे संबंध खूप चांगले होते, तरीही यहुदीविरोधात निर्माण झालेली घृणा कमी न होता वाढतच चालली होती. यहुदींना तो फारच हलके समजायचा.

हिटलर बरेच दिवस व्हिएन्नात होता. त्याला अचानक व्हिएन्ना सोडावे लागले. ते साल होते 1913. अॅडॉल्फ 24 वर्षांचा झाला होता. पहिले विश्वयुद्ध लवकरच सुरू होणार आहे याची कोणाला कल्पना नव्हती. मात्र त्या काळात आजच्यासारखे स्वेच्छेने कोणी लष्करात जाण्याची हिंमत करीत नसत. जे सत्ताधारी असत ते सक्तीने तरुण मुलांना उचलून नेऊन लष्करात भरती करून घेत.

ऑस्ट्रियात अशी सक्तीची भरती सुरू झाली होती. त्यात गुंतावे लागू नये म्हणून तो व्हिएन्ना सोडून जर्मनीत पळून आला. ऑस्ट्रियन साम्राज्यासंबंधी त्याच्या मनात घृणा निर्माण होऊ लागली.

## जर्मनीशी नाते जुळले

मे 1913 मध्ये ऑस्ट्रियातून पळून आलेल्या हिटलरने जर्मनीच्या म्युनिच शहरात प्रवेश केला. आता त्याला सक्तीच्या लष्करी भरतीची भीती बाळगण्याचे कारण राहिले नाही.

म्युनिचमध्ये त्याने आपली चित्रकारिता पुन्हा सुरू केली. प्रसिद्ध आणि ऐतिहासिक स्थळांची चित्रे काढून तो स्वत:च ती चित्रे दुकानांवर नेऊन विकायचा. त्यात बऱ्यापैकी कमाई होऊन त्याच्या गरजा भागून जायच्या.

1 ऑगस्ट, 1914 रोजी म्युनिचमध्ये एक विशाल सभा झाली. हिटलरही त्या सभेच्या

गर्दीत हजर होता. ती विराट सभा अत्यंत गुप्तपणे विशिष्ट कारणासाठी बोलावण्यात आलेली होती. जर्मनीकडून युद्धाच्या घोषणेचा आनंदोत्सव साजरा केला जात होता.

दोन दिवसांनंतर हिटलरने जर्मन सेनेत भरती होण्याची इच्छा व्यक्त केली आणि तो बवेरियन रेजिमेंटमध्ये भरती झाला. बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर त्याच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले.

28 जून, 1914 रोजी पहिल्या विश्वयुद्धाचा भडका उडाला. त्यासाठी अनपेक्षित निमित्त किंवा कारण घडले, सर्बियाच्या एका आतंकवादी तरुणाने ऑस्ट्रियाचा राजकीय वारस आर्क ड्युक फ्रांज फर्डिनंडची गोळी मारून हत्या केली. जर्मन सम्राट विल्यमने ऑस्ट्रियाला सर्बियावर हल्ला करण्यास उकसावले. येथूनच घटनाक्रमाने गती घेतली. रशियाला हे समजले. रशियाने ऑस्ट्रियाविरुद्ध मोर्चेबांधणी सुरू केली. मग जर्मनीने रशियाविरुद्ध रणशिंग फुंकले. फ्रान्स आणि इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्धाचा बिगुल वाजवला. संपूर्ण युरोप आणि इंग्लंडमध्ये युद्धज्वर पसरला.

### अंधत्वातून नवी दृष्टी

युद्ध सुरू झाले. ते अल्पावधीतच संपेल असे सर्वांना वाटत होते. मात्र तसे झाले नाही. युद्ध बरेच लांबले. खूप दिवस चालले. सैन्याचा विनाश झाला. लाखो सैनिकांचे बलिदान चढवले गेले. तरुणांची एक अख्खी पिढी बरबाद झाली.

युद्धात अत्याधुनिक शस्त्रसाधनांचा वापर करण्यात आला. हिटलरच्या रेजिमेंटमध्ये आणि ब्रिटिश बेल्जियम सैन्यात साईप्रसजवळ पहिले युद्ध झाले. हिटलरच्या रेजिमेंटच्या 3000 जवानांपैकी 2500 सैनिक युद्धात ठार झाले. स्वत: हिटलर नशिबाने थोडक्यात वाचला. ऑक्टोबर 1918 मध्ये सायप्रसजवळ ब्रिटनने केलेल्या क्लोरिन गॅसच्या हल्ल्यामुळे तो काही दिवस आंधळा झाला. युद्धकाळात त्याच्याकडे टपाल वाहतुकीचे काम होते.

7 ऑक्टोबर, 1916 रोजी सोग्याच्या युद्धात त्याचा पाय जखमी झाल्याने त्याला जर्मनीच्या दवाखान्यात भरती करण्यात आले. चांगला झाल्यावर म्युनिचमध्ये त्याच्यावर साधी कामगिरी सोपविण्यात आली.

जर्मनीच्या वरिष्ठाधिकाऱ्यांच्या मनात हळूहळू युद्धाविषयी विरोधी भावना आणि उदासीनता निर्माण होऊ लागली. हे लक्षात आल्यावर अॅडॉल्फ खूप दु:खी झाला. त्याच्या दृष्टीने जर्मनीत अशांती पसरवून युद्धात जर्मनीला कमजोर करण्याचे कारस्थान यहुदींनी सुरू केले होते. युद्धविरोधी कटात यहुदींचा हात आहे, अशी त्याची पक्की धारणा झाली होती. त्यामुळे यहुदींबाबत त्याच्या मनात कमालीची घृणा निर्माण झाली.

मार्च 1917 मध्ये तो पुन्हा युद्धाच्या मोर्चावर हजर झाला.

वास्तविक अॅडॉल्फच्या मनात घृणाच घृणा भरून राहिली होती; तरीही आश्चर्याची गोष्ट म्हणजे ऑगस्ट 1918 मध्ये केवळ एका यहुदी लेफटनंटच्या शिफारशीमुळे हिटलरला मिलिटरीच्या पहिल्या क्रमांकाचे आयरन क्रॉस हे पदक मिळाले.

10 नोव्हेंबर, 1918 रोजी एक वयोवृद्ध धर्मगुरू दवाखान्यात आला. तो हिटलरला

म्हणाला,



“आता युद्ध थांबले आहे. जर्मन सम्राटांच्या हालेंजोलर्न वंशाचे पतन झाले आहे. त्यांच्या मातृभूमीचा पराभव झाला आहे. जर्मनीत राजेशाहीचा बीमोड होऊन लोकशाही उदयाला आली आहे.”

ब्रिटनचा वेढा, त्यांचा आणि फ्रान्सचा जबरदस्त संयुक्त सामना, अमेरिकेने युद्धात घेतलेली उडी, देशांतर्गत पसरलेली राजकीय अशांती, दुष्काळ, विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था, नेव्हीच्या सैनिकांचे बंड, युद्धभूमीवर लागोपाठ होणारे पराभव यामुळे 11 नोव्हेंबर, 1918 रोजी जर्मन सेनापती दोस्त राष्ट्रांबरोबर युद्धविराम करण्यास विवश झाले. त्या करारावर सह्या करणाऱ्या जर्मन राजनीतिज्ञांना ‘नोव्हेंबर आरोपी’ म्हटले जाऊ लागले.

•••

# राजनीतिक जागृती

जर्मनीची लोकसत्ताक राज्यघटना सकृद्दर्शनी अत्यंत उदार आणि आदर्श भासत होती. त्यानुसार सर्वांभूती समानता, राजसत्ता केवळ जनतेच्या हातात, लोकसभेत राजकीय अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व, लोकसभेत (राइशस्टॅग) बहुमताच्या आधारावर गठित मंत्रिमंडळ, चान्सलर आणि निवडणुकीद्वारा निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष किंवा राष्ट्रपती अशी ही घटनेतील तरतूद होती.

सन 1919 च्या ग्रीष्मऋतूत हिटलर लष्करातच होता. त्याची नेमणूक सध्या म्युनिचला झालेली होती. तो माफीचा साक्षीदार झाला. म्युनिचमध्ये आंदोलन करणाऱ्या आणि आंदोलनाला समर्थन देणाऱ्या बॅरॅकमधील सर्व मार्क्सवादी आंदोलकांची नावे त्याने वरिष्ठांना सांगून टाकली. त्यांना तातडीने फासावर लटकवण्यात आले.

याच्यानंतर अॅडॉल्फ जर्मन सैन्याच्या गुप्तचर विभागाचा सदस्य झाला. त्याच्यावर खालीलप्रमाणे जबाबदारी सोपविण्यात आली-

• सैन्यातील मार्क्सवाद समर्थक सदस्यांना शोधून काढणे.

• राजकीय विरोधक संघटनांचा तपास करणे.

1919 मध्ये त्याच्यावर आणखी एक जबाबदारी सोपविण्यात आली. युद्धभूमीवरून परत येणाऱ्या युद्धबंदींना साम्यवाद, शांतीवाद आणि लोकशाहीचे धोके समजावून सांगण्यासाठी तो अतिशय परिणामकारक भाषण द्यायचा. त्यामुळे त्याचे महत्त्व वाढले. त्याची 'एक जन्मजात वक्ता' अशी सगळीकडे कीर्ती पसरली.

सप्टेंबर 1919 मध्ये म्युनिचमधील 'जर्मन वर्कर्स पार्टी' नावाच्या गटाच्या गुप्त चौकशीचे काम त्याच्यावर सोपवले गेले. यातील कामगार 'वर्कर्स' - या शब्दाने सैन्याचे लक्ष वेधून घेतले; कारण सैन्य तर मार्क्सवादी विरोधकांचा बीमोड करण्याच्या प्रयत्नात गुंतले होते.

12 सप्टेंबर, 1919 रोजी सर्वसामान्यासारखा साधे कपडे घालून अॅडॉल्फ त्या संस्थेच्या एका सभेला हजर राहिला. ही सभा म्युनिच बीअर हॉलच्या एका मागच्या भागात घेण्यात आली. प्राथमिक अवस्थेतील या सभेला साधारणपणे 25 सभासद उपस्थित होते.

गॉटफ्राइड फेडर नावाच्या वक्त्याचे अर्थशास्त्रीय 'केव्हा आणि कोणत्या उपायांनी भांडवलशाही नाहीशी करता येऊ शकेल?' या विषयावर प्रभावी भाषण झाले.

भाषण ऐकून झाले. हिटलर स्वत: एक शब्दही न बोलता उठून जाण्याच्या तयारीत असताना आणखी एक वक्ता स्वत:ची विद्वत्ता प्रकट करीत म्हणाला,

''जर्मनीला संलग्न असलेले जर्मनीचे बवेरियन राज्य जर्मनीपासून विभक्त करून त्याला ऑस्ट्रियाशी संलग्न करावे, जेणेकरून एका स्वतंत्र दक्षिण जर्मन राज्याची निर्मिती होईल.''

त्याचे ते आगाऊ बोलणे ऐकून हिटलर मागे वळला. तो अतिशय संतप्त झाला. तो न

थांबता, न अडखळता त्या माणसाविरुद्ध 15 मिनिटे ताडताड बोलत राहिला. सभास्थानी उपस्थित असलेले सर्वजण आश्चर्यचकित झाले.

जर्मन कामगार पार्टीच्या संस्थापकांपैकी एक असलेला अँटन डेक्स्लर आपल्या एका साथीदाराच्या कानात हळूहळू कुजबुजला.



"या माणसात प्रभावी बोलण्याची विलक्षण क्षमता आहे. आपण आपल्या कामासाठी त्याचा वापर करू शकतो."

तो कोण आहे हे त्यांना काय माहीत!

हिटलरचे भाषण संपले. तो जायला निघाला. जवळ जाऊन डेक्स्लरने त्याच्या पाठीवर हात ठेवला. हिटलरने उलटून मागे पाहिले. त्याला चाळीस पानी एक पुस्तक भेट देऊन डेक्स्लर म्हणाला,

**"महोदय, आपल्याला भेटून आनंद झाला. हे पुस्तक निवांतपणे वाचा. आणि हो, मी आपल्याला पक्षात येण्याचे निमंत्रण देत आहे. कृपया त्याचा विचार करा."**

"धन्यवाद!" एवढे बोलून हिटलरने पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहिले. नाव होते

**'माझी राजनीतिक जागृती...'**

दुसऱ्या दिवशी हिटलरने एका बैठकीत ते पुस्तक वाचून काढले.

राष्ट्रवाद आणि सैन्य समर्थक श्रमिकवर्गाची एक मजबूत विरोधी पार्टी स्थापन करण्याच्या त्याच्या विचारांशी डेक्स्लरचे विचार बऱ्याच मोठ्या प्रमाणात मिळतेजुळते होते.

## राजकारणात प्रवेश

काही दिवस मागे पडले. त्याला त्या पार्टीचे (जर्मन वर्कर्स पार्टी) एक पत्र मिळाले. त्याची संमती न घेताच त्याला पार्टी सदस्य बनवून घेण्यात आले होते. त्याने त्या पार्टीला सक्षम आणि यशस्वी करण्यासाठी त्वरित प्रयत्न करण्याचे ठरवले. दोन दिवस मनातल्या मनात साधकबाधक विचार करून त्याने जर्मन कामगार पार्टीच्या समितीत सामील होण्याचा निर्णय घेतला.

हाच त्याचा राजकारणात प्रवेश होता.

16 ऑक्टोबर 1919 रोजी म्युनिचमधील एका बीअर गोदामात एक सभा आयोजिली गेली होती. सभेला फारसे कोणी येणार नाही, अशी कल्पना होती. प्रत्यक्षात मात्र चांगलाच प्रतिसाद मिळाला. 100 पेक्षा जास्त लोकांनी त्या सभेला हजेरी लावली.

हिटलर त्या सभेत सलग तीस मिनिटे बोलत होता. दिवसेंदिवस त्याचे मनोबल आणि आत्मबल वाढत चालले होते. उपस्थितांपैकी काही सदस्यांनी नियमित खर्चासाठी स्वखुशीने देणगी दिली. पाहता पाहता 300 मार्क जमा झाले. पार्टीच्या प्रचाराच्या

जाहिरातीसाठी त्या रकमेचा वापर करण्यात आला.

यानंतर जर्मन कामगार पार्टी भाषणासाठी नेहमी अॅडॉल्फला पुढे करू लागली. त्याने पहिल्या विश्वयुद्धानंतर व्हर्सायचा जो तह मित्रराष्ट्रांनी जर्मनीवर लादला, त्याच्याविरुद्ध आपल्या भाषणात भरपूर आगपाखड केली. जर्मनीच्या सर्व अडचणी आणि संकटांना यहुदीच जबाबदार आहेत, असा त्याने सर्रास आरोप केला.

जानेवारी 1920 मध्ये पार्टीची संपूर्ण जबाबदारी हिटलरने स्वत:कडे घेतली. लष्करात ज्या लोकांशी परिचय झालेला होता, त्यातील तरुणांना पार्टीत सामील करून घेतले. एक सदस्य कप्तान - अर्नस्ट रॉहम याने हिटलरच्या प्रगतीसाठी महत्त्वाची भूमिका निभावली.

विविध प्रकारचे लोक जर्मन कामगार पार्टीत सहभागी होऊ लागले. तरीही लोकांवर मार्क्सवादाचा नोंद घेण्यासारखा प्रभाव होता. त्यामुळे जर्मनीत रशियासारखी व्यापक प्रमाणात साम्यवादी क्रांती होण्याची भीती होती. हिटलर मार्क्सवादाचा संबंध यहुदींशी जोडायचा. स्वाभाविकच तो त्या गटाची खूप निंदा करायचा.

24 फेब्रुवारी, 1920 रोजी हिटलरने म्युनिचच्या सभागृहात एका सभेचे आयोजन केले. त्या सभेला 2000 प्रेक्षक हजर होते. तेथे जर्मन कामगार पार्टी समर्थक आणि साम्यवादी यांच्यात भांडण जुंपले. हिटलरच्या वक्तव्याने ते भांडण शांत झाले. त्याने खालील मुद्दे मांडले :

• जर्मनीचे एक विशाल शक्तिशाली राज्य व्हावे.

• सर्व जर्मनवासीयांचे ऐक्य व्हावे.

• व्हर्सायचा तह मोडीत काढावा.

• जर्मनीच्या सर्व लोकांच्या वास्तव्यासाठी अधिक राज्यक्षेत्राची मागणी!

• जातीच्या आधारावर तरुणांना नागरिकत्व देण्यात यावे.

• यहुदींना कधीच जर्मन समजण्यात येऊ नये.

• काम न करता मिळवलेले सर्व उत्पन्न जप्त करणे.

• राष्ट्रीय शिक्षणप्रणालीचे संपूर्ण पुनर्गठन करणे.

• धार्मिक स्वतंत्रता प्रदान करणे.

• एक सशक्त असे केंद्रीय सरकार स्थापन करणे.

हिटलरने वरील मुद्यांवर सर्वांची संमती घेतली. कोणीही इतक्या चांगल्या विचारांना विरोध करण्याचे कारणच नव्हते. 1920 च्या ग्रीष्म ऋतूत त्याच्या पार्टीसाठी प्रतीक म्हणून त्याने स्वस्तिक चिन्हाची निवड केली. त्यावरून हिटलरच्या पार्टीला तत्काळ लोकप्रियता प्राप्त झाली. त्याने पार्टीचे नाव बदलून ‘राष्ट्रीय समाजवादी कामगार पार्टी’ (नाझी) ठेवले.

## हुकूमशाहीची नांदी

डिसेंबर 1920 अखेर पार्टीची सदस्यसंख्या 3000 झाली.

नाझी पार्टी म्युनिचमध्येच केंद्रित होती. उर्वरित जर्मनीत पार्टीचा प्रसार करण्यासाठी राष्ट्रवादी संघटनांशी संपर्क साधावा म्हणून 1921 मध्ये हिटलर बर्लिनला आला.

त्याच्या अनुपस्थितीत म्युनिचमध्ये त्याच्या स्वत:च्या नाझी पार्टीच्या नेत्यात अप्रत्यक्ष विद्रोहाची ठिणगी पडली.

नाझी पार्टीचे कामकाज एका कार्यकारी समितीमार्फत पाहिले जात होते. समितीचे काही महत्त्वाचे सदस्य हिटलरवर जळत. त्यांना त्याचे वर्चस्व सहन होत नव्हते. ते मनातून त्याला हुकूमशाही वृत्तीने वागणारा आणि विनाकारण रुबाब करणारा समजत. तो म्युनिचमध्ये नसल्याचा फायदा उचलण्याचा कट त्याच्या विरोधकांनी रचला. काहीही करून ते त्याचे पार्टीतील महत्त्व आणि वर्चस्व संपविण्याच्या प्रयत्नात होते.

विरोधकांनी ऑगस्बर्गच्या समाजवाद्यांच्या एका गटाशी संधान साधले. हिटलर काही बेखबर नव्हता. शिजू घातलेल्या कटाची कुणकुण त्याला बर्लिनमध्ये लागली. आपल्या गैरहजेरीत काहीही उलटसुलट होऊ शकते अशी त्याची खात्री झाली. बर्लिनचे काम अर्धवटच सोडून तो म्युनिचला परतला. आल्या आल्या त्याने विरोधकांना आणि पार्टी सदस्यांना धक्का देण्याचे ठरविले.

**11 जुलै 1921** रोजी म्युनिचमध्ये आलेल्या हिटलरने जाहीर केले, ‘‘मी पार्टी सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे.’’

हे ऐकून सर्वांची हवाच निघून गेली. समर्थकच नव्हे तर विरोधकांच्याही डोळ्यावरचे झापड झटक्यात दूर झाले. त्यांची खात्री झाली की, हिटलर नसलेली नाझी पार्टी अस्तित्वात राहूच शकणार नाही. ती नाहीशी होऊन जाईल.

हिटलरने संधीचा फायदा घेण्याचे ठरवले. त्याने पार्टी सदस्यांची बरोबर नस पकडली. त्याने राजीनामा परत घ्यावा म्हणून काहींनी त्याची आर्जवे सुरू केली. तेव्हा तो म्हणाला, ‘‘मी पार्टीत परत येतो; पण माझ्या काही अटी आहेत.’’

‘‘कोणत्या?’’ एंटन डेक्स्लरने विचारले.

**‘‘मला पार्टीचा अध्यक्ष बनवावे लागेल. बंधनात जखडून न ठेवता मला निरंकुश अधिव प्रदान करावे लागतील.’’**

याच काळात लेखकाचे नाव न देता एका वर्तमानपत्रात एक लेख छापून आला. त्याचे शीर्षक होते-

**‘अॅडॉल्फ हिटलर हुकूमशहा आहे’**

या लेखात हिटलरवर सत्तालोलूपपणाचा आरोप करण्यात आला होता. इतरही आरोप होते. आपसात तडजोड होऊन अॅडॉल्फला नुकसानभरपाई मिळाली.

त्याच्या नेतृत्वाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी कार्यकारिणी समितीने मतदान घेतले. हिटलरला 543 मते पडली. फक्त एकुलते एक मत विरोधात पडले. ‘विरोधकांचे चेहरे नीट लक्षात ठेवा. ते आपल्या कामात येतील…’ अॅडॉल्फने अनुयायांना आदेश दिला.

29 जुलै, 1921 रोजी हिटलरने पुन्हा कार्यकारिणीची सभा बोलाविली. त्या सभेत अॅडॉल्फला सर्वानुमते नाझी पार्टीचा फ्यूहरर (नेता) निवडण्यात आले. तशी उघड घोषणा करण्यात आली.

•••

# क्रांतीचा बिगुल

एप्रिल 1921 मध्ये फ्रान्स आणि इंग्लंडने जर्मनीकडे पहिल्या विश्वयुद्धात झालेल्या आर्थिक नुकसानीची व्हर्सायच्या तहात ठरल्याप्रमाणे मागणी केली. ती रक्कम होती 33 अब्ज डॉलर! जर्मनीच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा न भूतो न भविष्यती असा विपरीत परिणाम झाला. कारण वरील नुकसानीची-दंडाची घोषणा होईपर्यंत जर्मनीचे 4 मार्क एका अमेरिकी डॉलरबरोबर होते.

नंतर डॉलरच्या तुलनेत मार्कची किंमत खालीलप्रमाणे घसरगुंडीला लागली.

| | | |
|---|---|---|
| 1921 | 1 डॉलर | 4 मार्क |
| 1921 | 1 डॉलर | 75 मार्क |
| 1922 | 1 डॉलर | 400 मार्क |
| 1923 | 1 डॉलर | 18000 मार्क |
| जुलै 1923 | 1 डॉलर | 1,60,000मार्क |
| ऑगस्ट 1923 | 1 डॉलर | 10,00,000 मार्क |
| नोव्हेंबर 1930 | 1 डॉलर | 40,00,000 मार्क |

याचा एक परिणाम असा झाला की, जर्मनीत महागाई प्रचंड वाढली. गगनाला भिडली. लोकांना जगणे अशक्य झाले. उपासमारीने सर्वत्र दंगे भडकले. लोकांच्या मनात संताप खदखदू लागला. फ्रान्स आणि इंग्लंडला दंडाची रक्कम अदा करू नये असे सर्वांचेच म्हणणे आणि मत होते. अतिरेकी राजकीय गटांना ही पर्वणीच वाटली. त्यांनी गोंधळलेल्या परिस्थितीचा फायदा उचलून वातावरण बिघडवून अराजकसदृश निर्मिती करून ठेवली.

नोव्हेंबर 1923 पर्यंत नाझींना 55000 अनुयायांचे पाठबळ प्राप्त झाले. आता जर्मनीत जे निरनिराळे गट होते, त्यात नाझींचाच गट सर्वांत मोठा आणि प्रभावी होता. पार्टी सदस्य प्रत्यक्ष कृतीकरिता आसुसलेले होते. अॅडॉल्फला त्यांचा उत्साह समजत होता. त्याने सभासदांच्या संगनमताने एक कट रचला.

बवेरियन सरकारच्या पुढाऱ्यांचे अपहरण करायचे. बंदुकीच्या धाकाने त्यांना अॅडॉल्फ हिटलरचे नेतृत्व स्वीकारायला मजबूर करायचे.

पहिल्या महायुद्धात एरिक ल्युडेंड्रॉफ या सेनापतीने खूप पराक्रम गाजवला होता. त्याच्या मदतीने जर्मन सैन्याला आपल्याकडे वळवून घेणे, राष्ट्रव्यापी बंड पुकारणे, बर्लिनमधील लोकशाही सरकारची सत्ता उलथवणे असे त्या कटाचे स्वरूप होते.

म्युनिचमधील एका मदिरालय इमारतीत दिनांक 8 नोव्हेंबर 1923 रोजी व्यापारी, सावकार, पुढारी यांची सभा होती. तेथूनच नाझींच्या कटाची अंमलबजावणी करण्याचे ठरले. हरमन गोरिंगच्या नेतृत्वाखालील सैन्याने त्या इमारतीभोवती वेढा दिला. रात्री 8.30 वाजता हिटलर आपल्या विध्वंसक टोळीसह सभास्थानी मोठ्या हॉलमध्ये प्रवेश करता झाला. पूर्वीच ठरल्याप्रमाणे त्यांनी तेथून गोंधळाला सुरुवात

केली. हिटलरने छताकडे पाहत एक गोळी झाडली.

गोंधळ सुरू होताच त्याने कठोरपणे आदेश दिला,

शांत रहा !

सुरू झालेल्या गोंधळामुळे राज्य आयुक्त गुस्ताव वॉन कॉहर यांचे भाषण अपुरेच राहिले. त्याने मंच सोडला. स्वत: हिटलरने मंच ताब्यात घेतला. तो संतप्त आवाजात म्हणाला,

“राष्ट्रीय क्रांतीचा बिगुल वाजला आहे. कोणीही हॉलमधून बाहेर जाण्याचा प्रयत्न करू नये. सर्वजण त्वरित शांत न झाल्यास मी गॅलरीत मशीनगन लावून देईन. बवेरियन आणि राईक (जर्मन साम्राज्य)ची सरकारे बरखास्त करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत एक तात्पुरते राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात आले आहे.

जर्मन सैन्य - राईकस्वेहर - आणि पोलीस बॅराक्सवर कब्जा करण्यात आला आहे. सैनिक आणि पोलीस स्वस्तिक चिन्हांकित ध्वजासह शहराच्या रस्त्यांवर संचलन करीत आहेत.”

यातील एकही गोष्ट खरी नव्हती. सर्व काही खोटे होते.

राज्य आयुक्त कॉहर, राज्य पोलीसप्रमुख कर्नल हंस वॉन सैसर आणि बवेरियातील जर्मन सैन्याचा कमांडर जनरल ऑटो वॉन लसाव यांना अॅडॉल्फची साथ द्यायला लाचार करण्यात आले. त्यासाठी त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकण्यात आला. तरीही आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते हिटलरच्या चेहऱ्यावर दृष्टी गाडून एकाग्रतेने पाहत राहिले. अॅडॉल्फला तो स्वत:चा मोठा अपमान वाटला. तो चिडून खेकसला,

“महाशय! लक्षात ठेवा, माझ्या पिस्तुलात फक्त चार गोळ्या आहेत. त्यातील तीन तुमच्यासाठी आहेत. शेवटची गोळी मी माझ्यासाठी सांभाळून ठेवली आहे...”

हिटलरच्या वतीने ल्युडेंड्रॉफने त्या तिघांचे मन वळवले. मग त्यांनी तिघांनी स्वत: मंचवर सर्वांसमक्ष हिटलरचे समर्थन केले. तेव्हा त्याने प्रतिज्ञा केली,

“मी, अॅडॉल्फ हिटलर सर्वांसमोर प्रतिज्ञा करतो की, नोव्हेंबर अपराध्यांना समूळ नष्ट केल्याशिवाय शांत बसणार नाही. सध्याच्या विस्कळीत झालेल्या जर्मनीला पुन्हा पूर्ववत शक्ति गौरवपूर्ण, स्वतंत्र आणि आदर्श जर्मनीत बदलून टाकीन...”

हिटलरची काही महत्त्वाची खास माणसे हॉलच्या मागील बाजूस हिटलरने शिकवून ठेवल्याप्रमाणे खलबत करण्यात गुंतली होती. हिटलर अचानक आत गेला. झटक्यात बाहेर येऊन मंचवर उभा राहून म्हणाला,

“मी तुम्हा सर्वांच्या वतीने जाहीर आश्वासन देत आहे की, नोव्हेंबर अपराधींचे सरकार आणि जर्मन साम्राज्याचा राष्ट्रपती यांनी बडतर्फ करण्यात आले आहे. म्युनिचमध्ये तूर्त आजच एका नवीन राष्ट्रीय सरकारची स्थापना करण्यात येत आहे. जर्मन राष्ट्रीय सेनेच्या नावाने तातडीने एक नवीन सेना उभारली जाईल. तात्पुरत्या जर्मन राष्ट्रीय सरकारचे काम बर्लिनच्या उंच बॉबेल इमारतीवर हल्ला करून जर्मन लोकांना वाचवणे हे असेल.

उद्या जर्मनीत आपल्याला एक तर राष्ट्रीय सरकार दिसेल किंवा आम्हाला मेलेले

पाहावे लागेल.”

याच वेळेस बातमी येऊन धडकली की, बरेच सैनिक बॅरॉक्सवर कब्जा करण्याचा अयशस्वी प्रयत्न होत आहे. त्यावर नियंत्रण म्हणून त्याने बीअर हॉल सोडला. संधी साधून बवेरियन सरकारचे तिन्ही पुढारी कॉहर, लसाव आणि सॅसर यांनी तेथून पळ काढला. त्यांनी ल्युडेंड्राफला खोटे आश्वासन दिले की ते आजन्म हिटलरच्या प्रति प्रामाणिक राहतील.

## अटक व माईन काम्फ चा जन्म

अ ॅडॉल्फ सरकारी जर्मन सैनिकांवर नियंत्रण मिळवू शकला नाही. तो तसाच बीअर हॉलमध्ये परत आला.

अर्नस्ट रॉहम आणि त्याच्या काही समर्थक सैनिकांनी केवळ एक इमारत ताब्यात घेतली होती. ती युद्ध मंत्रालयाच्या मुख्यालयाची होती.

1 नोव्हेंबर, 1923 रोजी आयुक्त कॉहरने एक प्रकटीकरण जाहीर करून हिटलर आणि ल्युडेंड्राफची पोल खोलली -

“मी स्वत:, जनरल लसॉव आणि रुर्नल वॉन सैसर अशा तिघांकडून बंदुकीच्या धाकाने करून घेतलेल्या घोषणा शुद्ध बेइमानी आहे. क्रांतीचा मूर्खतापूर्ण आणि उद्देशहीन प्रयत्न यशस्वी झाला असता तर म्युनिच आणि त्याच्याबरोबर बवेरियाही संकटाच्या दरीत कोसळला असता.”

कॉहर एवढ्यावरच थांबला नाही. त्याने नाझी पार्टी आणि तिच्या भांडकुदळ टोळ्या विघटित करण्याचा आदेश जारी केला.

जनरल लसॉवनेही हिटलरची साथ सोडून दिली. म्युनिचमधील नाझींचा उपद्रव मोडून काढण्यासाठी त्याने अतिरिक्त सैन्यदल पाठवले. त्यांनी युद्ध मंत्रालय भवनला वेढा घातला. हिटलर समर्थक रॉहमही त्यात घेरला गेला. रात्रभर अ ॅडॉल्फ अस्वस्थ होता. आता काय करावे? तो सारखा विचार करीत होता. जनरल ल्युडेंड्रॉफने त्याला दिलासा दिला, तो म्हणाला,

“नाझी सैनिक म्युनिचच्या मधोमध केवळ संचलन करतील. असे करता करताच ते शहरावर ताबा बसवतील. प्रथम विश्वयुद्धातील माझ्या शौर्याच्या प्रसिद्धीमुळे माझ्यावर गोळी झाडण्याची कोणी हिंमत करणार नाही. पोलीस आणि सैन्यही आपल्याला साथ देतील.”

9 नोव्हेंबर, 1923 रोजी सकाळी 11.00 वाजेच्या सुमारास हिटलर, गोरिंग, ल्युडेंड्रॉफ, हेनरिक हिमलर यांच्या नेतृत्वात 3000 नाझींची एक तुकडी म्युनिचच्या युद्ध मंत्रालयाकडे चालून आली. 100 पोलिसांनी त्यांना अडवले. दोन्ही बाजूने गोळीबार सुरू झाला. 16 नाझी आणि 3 पोलीस मारले गेले. गोरिंगला गोळी लागली.

हिटलर ओणवा होऊन सरकत सरकत कसाबसा धोक्याच्या बाहेर पडला. आपल्या अनुयायांना तेथेच सोडून एका कारमध्ये बसून हिटलर संघर्ष स्थळापासून पसार झाला. त्याच्या माणसांपैकी काही पळून गेले. ल्युडेंड्रॉफसह काही पकडले गेले.

अ ॅडॉल्फ लपतछपत मित्र हंपस्तेंग्लोच्या घरी पोहोचला. झालेल्या लांडगेतोडीमुळे त्याच्या मनात आत्महत्येचा विचार आला. कारण आता तो खूपच

निराश झाला होता. सरकारविरोधी कटाचा प्रयत्न केल्याबद्दल सरकारनेही त्याला गोळ्या घालण्याचे आदेश जारी केले होते. तिसऱ्या दिवशी पोलिसांनी रात्रीच्या वेळी हंपस्तेंग्लोच्या घरी छापा मारला.

लपून बसलेला हिटलर पकडला गेला. त्याला अटक करून लँडस्बर्गच्या कारागृहात पाठवण्यात आले. त्याला वाटले होते की आता फक्त एका गोळीचे काम तेवढे बाकी राहिले. मात्र त्याला सांगण्यात आले की, त्याच्यावर उघड खटला चालवण्यात येईल तेव्हा त्याच्या जिवात जीव आला.

राजकीय विश्लेषकांना वाटले की, हिटलरचे राजकीय जीवन आणि नाझी आंदोलन संपुष्टात आले आहे.

त्याच्यावर देशद्रोहाचा दावा दाखल करण्यात आला. त्याचा उलट फायदाच झाला. तो त्याच्या राजनैतिक जीवनाचा शेवट किंवा अंत नव्हता. सुरुवात होती. एकाच रात्रीत हिटलर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीप्राप्त व्यक्ती होऊन बसला.

हिटलरच्या दृष्टीने 1918 चे जर्मन राजनीतिज्ञ देशद्रोही होते. त्यांनी देशाच्या पाठीत खंजीर खुपसला. लोकांचा असा समज होता की, युद्धात जर्मन सैन्याची हार झालीच नव्हती. सैन्याला धोक्याने हरवले गेले. वस्तुस्थिती अशी होती की युद्धात जर्मनीचा पराभव होणार हे उघड उघड दिसू लागल्यानेच सेनाधिकाऱ्यांनी दोस्तराष्ट्रांशी संपर्क साधून शस्त्रे खाली ठेवली.

अॅडॉल्फच्या खटल्याचा झटपट निर्णय लावावा म्हणून न्यायमूर्ती नेमण्यात आले. 24 दिवस जाबजबाब होत राहिले. कारवाई संपली. त्याला फाशी होऊ शकत होती. न्यायमूर्तींनी खैर केली. सहा महिन्यानंतर जामिनावर सुटका होऊ शकेल या अटीवर त्याला पाच वर्षांची शिक्षा सुनावली.

1 एप्रिल 1924 रोजी त्याला लँडस्बर्गच्या जुन्या किल्ल्यात एका मोठ्या हॉलमध्ये ठेवण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे त्याला बरीच मोकळीक देण्यात आली. त्याचा सेक्रेटरी रुडॉल्फ हॅसही त्याच्याबरोबर होता. जेलमध्ये असूनही हिटलरने बाह्य लोकांशी संपर्क चालू ठेवला होता.

हॉलमध्ये शतपावली करता करता तो काही विचार व्यक्त करायचा. रुडॉल्फ हॅस ते जसेच्या तसे उतरून घ्यायचा. त्यातूनच 'माईन काम्फ-माझा संघर्ष' पुस्तकाचा पहिला खंड तयार झाला. त्यात हिटलरचे राजनैतिक आणि स्वत:चे विचार विस्तृत प्रमाणात उद्धृत करण्यात आले आहेत.

### लोकसभेत शिरकाव

अॅडॉल्फ नऊ महिने जेलमध्ये होता. डिसेंबर 1924 मध्ये त्याची जेलमधून सुटका झाली.

बाहेर येताच त्याने विचार केला की, लोकशाही सरकार हटवून जर्मनीवर नियंत्रण मिळवायचे असल्यास लोकशाहीची काही चांगली मूलभूत तत्त्वे अंगीकारावी लागतील. अर्थात, निवडणुकीच्या माध्यमातून आधी राईचस्टॅग जर्मन लोकसभा मध्ये शिरकाव करणे आवश्यक आहे. स्वाभाविकच या प्रक्रियेत बराच वेळ जाईल; परंतु हाच मार्ग सनदशीर असेल आणि यानंतर बहुमताच्या जोरावर जर्मनीवर

नाझींचा आपोआप कब्जा होईल.

हिटलरचे हे एक स्वप्न होते; परंतु त्याच्यापुढे काही अडचणीही होत्या. नाझी पार्टीत अलीकडे अव्यवस्था माजली होती. नेतेमंडळीत आपसात भांडत होती. सत्तास्पर्धेमुळे कलहाला तोंड फुटले होते.

थोडीशी माघार घेऊन हिटलरने बवेरियाच्या प्रधानमंत्र्याची भेट घेतली. ही घटना आहे जानेवारी 1925 ची. बवेरियन, जर्मन राज्य सरकारने नाझी पार्टी आणि पार्टीचे वर्तमानपत्र 'वॉल्काश्शर क्योबॅक्टर (जन प्रेक्षक)' वर बंदीहुकूम जारी केलेला होता. दोघांच्या भेटीदरम्यान हिटलरने धूर्तपणे सद्वर्तनाचे आश्वासन दिले. पक्षावरील आणि वर्तमानपत्रावरील बंदी उठवून घेण्यात तो यशस्वी झाला.

अॅडॉल्फने असाही करार केला की, नाझी समर्थक जर्मनीच्या घटनात्मक लोकशाही चौकटीत राहूनच काम करतील.

27 फेब्रुवारी 1925 रोजी नाझींनी एका मोठ्या सभेचे आयोजन केले. त्यात पार्टीचा सर्वोच्च, सर्वमान्य नेता म्हणून हिटलरच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सभेतील भाषणात हिटलरने लोकशाही, मार्क्सवाद आणि यहुदींविरुद्ध आगपाखड केली. याचा परिणाम म्हणून बवेरियन सरकारने त्याच्यावर दोन वर्षांसाठी बवेरियात भाषणबंदी लागू केली.

हिटलरने आपली समर्थक सेना म्हणजे 'निगरानी फौज' अर्थात एस.ए. निर्माण केली. तशी उपद्रवी नाझींच्या संघटनेच्या रूपाने ती आधीच अस्तित्वात आलेली होती. काही काळ ही संस्था हिटलरच्या हातातील मुख्य हत्यार होती. तिचे मुख्य काम होते मार्क्सवाद्यांचे उद्योग आणि कारवायांवर गुप्त पाळत ठेवून वेळोवेळी आपला अहवाल हिटलरला सादर करणे.

या काळात जर्मनीचा राष्ट्राध्यक्ष होता वयोवृद्ध पॉल वॉन हिंडेनबर्ग! पहिल्या जागतिक महायुद्धात फिल्ड मार्शल म्हणून तो प्रसिद्धी पावलेला होता.

व्हर्सायच्या तहातील अटींनुसार जर्मनीने एक लाखापेक्षा जास्त सैन्य तसेच युद्धविषयक आधुनिक उपकरणे, विमाने वगैरे न बाळगण्याचे बंधन घालण्यात आले होते. तरीही जर्मनीचे सैन्य गुप्तरूपाने रशियाच्या कारखान्यात नवीन शस्त्रास्त्र टेक्नॉलॉजी आत्मसात आणि विकसित करण्यात मग्न होते. तद्वतच रशियन सैन्याबरोबर सैनिकी शिक्षण आणि डावपेचाचा अभ्यास करीत होते. जर्मन राज्य लोकशाहीचा पुरस्कार करून वाटचाल करीत असले तरी लोकांच्या मनात असंतोष धुमसत होता.

जर्मन गणराज्य उधारीच्या पैशांवर जगत होते. मौजमजा करीत होते. हिटलर ओळखून होता की ही परिस्थिती कायम राहणार नाही. ती बदलेल. मग लोकांना समजेल आणि त्याच्या विचाराचे महत्त्व कळेल. त्यानंतर ते त्याला शोधत फिरतील.

सध्या त्याला वातावरण अनुकूल होईपर्यंत प्रतीक्षा करावीच लागेल. तो वाट पाहत होता.

## नाझींचा विजय

**वर्ष 1930 उजाडले** . निवडणूक आली. हिटलरचा झंझावात सुरू झाला. त्याने

संपूर्ण देश पायाखाली घातला. त्याचा प्रचारप्रमुख होता गोबेल्स. त्याने मोठ्या हुशारीने प्रचार मोहीम राबवली.

हिटलरच्या भाषणात प्रत्येकाला देण्यासाठी काही ना काही होते. तो जर्मनीला पुनश्च एक प्रभावशाली राष्ट्र बनवणार होता. दोस्त राष्ट्रांनी सुरू केलेले दंडाचे हप्ते थांबवणार होता. एकंदरीत व्हर्सायचा तहच ठोकरून लावणार होता. भ्रष्टाचार मुळापासून उखडून ठेवण्याचे आश्वासन हिटलर आपल्या प्रत्येक भाषणात ठासून सांगत होता. मार्क्सवाद आणि यहुदींवर नियंत्रण ठेवणार होता.

जर्मनवासीयांना अजून काय पाहिजे होते?

14 सप्टेंबर 1930 रोजी निवडणूक झाली. नाझींना 63,71,000 मते मिळाली. त्याचे प्रमाण एकूण मतदानाच्या 18 टक्क्यांपेक्षा जास्त होते. जर्मन राईचस्टॅग (जर्मन लोकसभा) मध्ये 107 नाझी खासदारांना प्रवेश मिळाला.

हिटलरच्या दृष्टीने तसा हा चमत्कारिक विजय होता. एका रात्रीत नाझी पार्टी जर्मनीची दुसरी सर्वांत मोठी पार्टी झाली. त्यामुळे हिटलरला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली.

13 ऑक्टोबर 1930 रोजी नवनिर्वाचित खासदारांचा राईचस्टॅगमध्ये शपथविधी होता. हजेरी देताना ते म्हणाले,

**‘आम्ही हजर आहोत! हिटलरचा विजय असो, हेल हिटलर!”**

त्यांची सत्तारूढ लोकतांत्रिक शासनप्रणालीला सहकार्य करण्याची अजिबात इच्छा नव्हती. हिटलरचे महत्त्व वाढविण्यासाठी ते जर्मनीची परिस्थिती जास्तीत जास्त बिघडण्याची प्रतीक्षा करीत होते.

नाझींचा मुळातच यहुदींवर दात होता. आता तर काय, निवडणुकीत घवघवीत नसले तरी बऱ्यापैकी यश मिळाले होते. त्यामुळे नाझींच्या टोळ्या बेफाम झाल्या. त्यांच्यावर कोणाचे बंधनच राहिले नाही. त्या शहरात बेलगाम संचार करू लागल्या. त्यांनी यहुदींची दुकाने, हॉटेल्स आणि डिपार्टमेंटल स्टोअर्स यांची उन्मत्तपणे तोडफोड करून आनंदोत्सव साजरा केला. यहुदींचा कोणताच दोष नसताना त्यांचे भरपूर आर्थिक नुकसान केले.

लडखडत अस्तित्व टिकवून असलेल्या जर्मन लोकतंत्रच्या शेवटच्या क्षणाची घटिका जवळ आल्याचे, तर सर्व राजकारण हिटलरच्या बाजूला वळू लागल्याचे स्पष्ट दिसत होते.

1930 आणि 1931 हे वर्ष राजकीय दृष्टीने हिटलरसाठी चांगले गेले. त्याच्या ‘माइन कॉफ-माझा संघर्ष’च्या लाखो प्रती हातोहात विकल्या गेल्या. म्युनिचमध्ये नाझी पार्टीला ब्राउन हाऊस नावाचे आकर्षक मुख्यालय मिळाले.

भविष्यात नाझीच सर्वसत्ताधीश होतील, अशी खात्री बाळगणाऱ्या कारखानदारांकडून पार्टीला मोठ्या प्रमाणात देणग्या प्राप्त होत होत्या. त्यामुळे पक्षाला आर्थिक चणचण जाणवत नव्हती.

### हळवा कोपरा

1928 च्या उन्हाळ्यात हिटलरने बर्शतिस्गाडेनमध्ये एक लहानसे निवासस्थान भाड्याने घेतले. तेथून बवेरियन पहाडाचे सौंदर्य दूरदूरपर्यंत दृष्टीस पडायचे. हिटलरला ते स्थळ खूप आवडायचे. पुढे तेथे त्याने एका विस्तृत आणि सर्व सुखसोयींनीयुक्त असा बंगला बांधला.

हिटलरचे वय तेव्हा 39 वर्षे होते.

तो बर्शतिस्गोडन बंगल्यातच स्थायिक झाला. त्याची सावत्र मावसबहीण होती एंजेला. ती व्हिएन्नाला राहायची. त्याने तिला बोलावून घेतले. तिला दोन मुली होत्या. फ्रेडिल आणि गेली. भाऊ अॅडॉल्फचा निरोप मिळताच एंजेला आपल्या दोन्ही कन्यांना घेऊन बर्शतिस्गोडनला येऊन पोहोचली.

गेली रॉबल 24 वर्षीय हसतमुख प्रसन्न चेहऱ्याची तरुणी होती. तिचे केस सोनेरी होते. चेहऱ्यावर खास व्हिएन्नी आकर्षण होते. हिटलरच्या मनात तिच्याबद्दल निस्सीम प्रेम निर्माण झाले. त्याच्या आजवरच्या आयुष्यात असे पहिल्यांदा घडत होते; परंतु गेली स्वत: उथळ विचारांची होती. तिला तरुणांचा सहवास फारच हवाहवासा वाटायचा. तिच्यातला हा दोष हिटलरलाही माहीत होता. तिची कित्येक प्रेम प्रकरणे होती. त्यातील एकतर हिटलरच्या ड्रायव्हरबरोबरच रंगत होते. मात्र प्रेम आंधळे असते म्हणतात तेच खरे!

हळूहळू स्वत: हिटलरही ईवा ब्रॉन या तारुण्यात नुकतेच पदार्पण करणाऱ्या सतरा वर्षे वय असलेल्या पिंगट केसांच्या मुलीच्या प्रेमात गुंतून पडला. ती त्याच्या खासगी फोटोग्राफर असलेल्या हेन्रिक हॉफमॅन यांच्या फोटोग्राफीच्या दुकानावर काम करायची.

हिटलर गेलीवर सक्त नजर ठेवायचा. तो तिच्यावरही खूप प्रेम करायचा. मात्र तिच्या स्वैर वर्तनामुळे तो तिच्यावर मनातून नाराजही राहायचा. सप्टेंबर 1931 मध्ये एके दिवशी तो तिला म्हणाला,

‘‘मी कामानिमित्त बाहेर जात आहे. मी परत येईपर्यंत तू फलॅटमध्येच थांबायचे. व्हिएन्नालाही जायचे नाही...’’

तो एस.ए.च्या सभेसाठी निघून गेला. दुसऱ्या दिवशी रुडॉल्फ हॅसने त्याला फोन केला-

‘‘हां! बोल हॅस...’’

‘‘फ्यूहरर! आपल्यासाठी एक अत्यंत वाईट बातमी आहे.’’

‘‘मी ऐकतोय’’, हिटलरने उत्तर दिले.

‘‘गेलीने छातीत गोळी मारून आत्महत्या केली.’’

‘‘क् क् ऽ क् क् क ऽ काय?’’

‘‘होय फ्यूहरर..!’’

तो तातडीने म्युनिचला परतला.

हिटलरने गेलीवर निस्सीम प्रेम केले होते. तिच्या मृत्यूने तो कल्पनातीत दु:खी

झाला. तिची आठवण म्हणून त्यानंतर त्या दिवसापासून त्याने मांसाहार कायमचा सोडून दिला. मागे अशाच एका दु:खद क्षणी त्याने पुढील आयुष्यात दारू न पिण्याची प्रतिज्ञा केली होती. मरेपर्यंत तिचे पालन केले.

गेलीच्या फोटोवर तो नेहमी पुष्पमाला चढवायचा. तिची आठवण येताच तो सैरभैर व्हायचा. त्याच्या दोन्ही डोळ्यांतून आपोआप झरझर आसवे ओघळू लागायची.

•••

# लोकशाहीचा अस्त

हिटलरने जर्मनीचे चौऱ्याऐंशी वर्षीय राष्ट्रपती पॉल वॉन हिंडेनबर्ग यांची भेट घेतली. त्याचे बोलणे ऐकून हिंडेनबर्ग प्रभावित न होता म्हणाला,

“हिटलर, पोस्टमास्तर बनण्याच्या लायकीचा होऊ शकतो; परंतु तो जर्मनीचा चान्सलर होण्याच्या योग्यतेचा होऊ शकत नाही…”

राईचस्टॅग (जर्मनीची लोकसभा, संसद) मध्ये 107 निर्वाचित नाझी सदस्य होते. हरमन गोरिंगच्या नियंत्रणाखाली ते संसदेत सदैव हुल्लडबाजी करून पार्लमेंटच्या दैनंदिन कामकाजात अडथळा आणून सर्व व्यवस्थेलाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न करीत, जेणेकरून जर्मनीत लोकशाहीचा पाया ठिसूळ व्हावा.

जर्मनीत दोन वर्षे आलेल्या आर्थिक महामंदीने जनता त्रस्त झाली होती. सभ्यता वेशीला टांगली गेली होती. सर्वत्र अराजकता पसरली होती. त्या परिस्थितीत लोकांच्या मनात हिटलरच्या विचारांचा पगडा बसून त्याच्या विषयीचा ओढा आपोआप वाढत गेला.

कायद्यातील आणि त्या अनुषंगाने संसदेने मंजूर केलेल्या घटनेच्या तरतुदींनुसार 1932 मध्ये राष्ट्रपतीची निवडणूक व्हावयाची होती. ही निवड 7 वर्षांसाठी म्हणजे 1939 पर्यंत होती. तोपर्यंत हिंडेनबर्ग 92 वर्षांचा झक्क म्हातारा होणार होता. म्हणून ही निवडणूक लढवण्यास तो फारसा उत्सुक नव्हता.

जानेवारी 1932 मध्ये जर्मन चान्सलर बुरनिंगने हिटलरला बर्लिनला बोलावले. या निमंत्रणाने हिटलर फारच खूश झाला. तो ब्रुनिंगच्या इच्छेनुसार बर्लिनला गेला. दोघांत सविस्तर चर्चा झाली. बुरनिंगची इच्छा होती की, निवडणूक न घेता हिंडेनबर्गचाच कालावधी वाढवून द्यावा.

हिटलरने ब्रुनिंगचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. चेहऱ्यावरही कोणतेच भाव प्रकट होऊ दिले नाहीत.

फेब्रुवारी 1932 मध्ये हिंडेनबर्ग राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवायला तयार झाला. हिटलरनेही कंबर कसली. हिंडेनबर्गच्या विरोधात त्याने प्रचंड तयारी केली. जोसेफ गोबेल्सने ‘स्वातंत्र्य आणि रोटी..’ हे तत्त्व पायाभूत धरून प्रचार यंत्रणा राबवली.

13 मार्च, 1932 रोजी निवडणूक झाली.

हिटलरला 30 टक्के म्हणजे 1,13,39,446 मते मिळाली, तर हिंडेनबर्गला 49 टक्के म्हणजे 1,86,57,497 मते मिळाली.

जर्मनीच्या घटनेनुसार हिंडेनबर्गला पूर्ण बहुमत न मिळाल्याने निवडणूक प्रक्रिया चालू ठेवावी लागली. मतदानाची नवीन तारीख 10 एप्रिल 1932 ठरली. त्या तारखेला झालेल्या मतदानात हिटलरला 36 टक्के म्हणजे 1,34,18,547 मते मिळाली, तर हिंडेनबर्गला 53 टक्के म्हणजे 1,93,59,983 मते मिळून तो पूर्ण बहुमताने पुढील 7 वर्षांसाठी राष्ट्रपती म्हणून निवडून आला.

बर्लिनमध्ये भीती, कट, कारस्थाने, अफवा आणि अराजकता यांना ऊत आला. या

वातावरणात एका व्यक्तीचा उदय झाला. त्याचे नाव होते कुर्ता वॉन श्लाइशर. तो एक अतिशय महत्त्वाकांक्षी सेनाधिकारी होता. जर्मनीचा सर्वेसर्वा बनण्यासाठी तो एखाद्या संधिसाधू बगळ्याप्रमाणे टपून बसला होता.

हिंडेनबर्गचे वय झाले असले तरी तो अत्यंत दूरदर्शी आणि बुध्दिमान होता. हे दोघे म्हणजे हिटलर आणि श्लाइशर त्याला बिलकूल आवडत नसत. तो त्या दोघांच्या विरोधात होता. त्यांच्यावर त्याचा विश्वासही नव्हता.

एस.ए. प्रमुख अर्नस्ट रोहमच्या नियंत्रणात 4.00 लाखांपेक्षा जास्त तुफानी सैनिकांच्या तुकड्या होत्या. त्यातले कित्येक स्वतःलाच खरे क्रांतिकारी सैनिक समजायचे. हिटलरला त्यांच्या हालचालींकडेही लक्ष ठेवावे लागे. कारण ते केव्हा स्फोटक परिस्थिती निर्माण करून वातावरण बिघडवून टाकतील याची खात्री नसे.

एप्रिल 1932 च्या निवडणुकीनंतर घटनेच्या कलम 48 प्रमाणे चान्सलर हेन्रिक ब्रुनिंगने संपूर्ण जर्मनीत एस.ए. आणि एस.एस. या नाझी समर्थक संघटनांवर बंदी घातली.

8 मे 1932 रोजी कारस्थानी कुर्त वॉन श्लाइशरने हिटलरशी एक गुप्त करार केला. दोघेही आपापल्या परीने धोक्याची चाल चालत होते. लोकसभा भंग करून नव्याने निवडणुका घेण्यास व राष्ट्रवादी सरकार स्थापन करण्यास हिटलर सहमत झाला. त्या बदल्यात दोन्ही प्रतिबंधित संघटनांवरील बंदी उठविण्याचे आश्वासन मिळाले.

सर्वप्रथम राष्ट्रपती हिंडेनबर्गचा दीर्घकालीन सहकारी जनरल विल्यम ग्रोनरला अपमानित करून श्लाइशरने राजीनामा देण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकला. 13 मे 1932 रोजी ग्रोनर नाइलाजाने राजीनामा देऊन मोकळा झाला.

श्लाइशरचे पुढचे लक्षय होते चान्सलर ब्रुनिंग. हिटलरचा शेवटचा विरोधक हेन्रिक ब्रुनिंगच होता. त्याने जर्मनीच्या पुनरुत्थानासाठी कठोर परिश्रम केले होते.

श्लाइशर आणि हिटलर दोघेही त्याला त्यांच्या मार्गातील अडथळा समजत असत. त्यांनी त्याच्याविरुद्ध व्यवस्थित बदनामीचे जाळे लावले. हिंडेनबर्गकडे त्यांच्याविरुद्ध खूप तक्रारी आल्या. 29 मे, 1932 रोजी हिंडेनबर्गने हेन्रिक ब्रुनिंगला बोलावून घेतले. तो भेटायला आल्यावर सरळ त्याच्याकडे त्याचा राजीनामा मागितला. त्याने आढेवेढे न घेता दुसऱ्याच दिवशी 30 मे, 1932 रोजी राजीनामा सादर केला.

जवळजवळ याच क्षणी जर्मनीत लोकशाहीचा अंत झाला.

## खुनी रविवार

देशाची सर्व सूत्रे श्लाइशरच्या हातात आली. त्याने चान्सलर म्हणून फ्रॉज वॉन पपेन नावाच्या व्यक्तीची वर्णी लावली. त्याच्याकडे फक्त एकच गोष्ट होती. अमाप पैसा! तो गर्भश्रीमंत होता. एरव्ही त्याचा स्वतःच्या लायकीवरच विश्वास नव्हता.

पपेनने त्याच्यासारख्याच भांडवलदारांचे मंत्रिमंडळ गठित केले.

4 जून, 1932 रोजी संसद (राईचस्टॅग) विसर्जित करण्यात आली. जुलैच्या शेवटी नवीन निवडणुका घेण्याचे जाहीर करण्यात आले. 15 जून, 1932 ला एस.ए. आणि एस.एस. या दोन्ही नाझी समर्थक संघटनांवरील बंदी हटविण्यात आली.

नाझी टोळ्या वाटच पाहत होत्या. त्यांनी जर्मनीत हिंसा, हत्या, झगडा-तंटा यांचा धुमाकूळ घातला. 17 जुलैला नाझी कार्यकर्ते प्रशिया राज्याच्या हॅम्बुर्गजवळ एका कम्युनिस्ट मोहल्ल्यात शिरले. प्रचंड गोळाबारी झाली. 19 लोक मारले गेले. 300 जखमी झाले.

या घटनेला 'खुनी रविवार' म्हटले जाऊ लागले.

## इच्छापूर्तीतील अडथळे

पपेन हळूहळू मार्गस्थ होऊ लागला होता. त्याने चांगला अभ्यास केला आणि घटनेतील नियम 48 मधील तरतुदींनुसार बर्लिनमध्ये 'मार्शल लॉ' (सैनिक शासन) लागू केला. प्रशिया जर्मन राज्यावर कब्जा केला. स्वत:ला संपूर्ण जर्मन साम्राज्याचा 'आयुक्त' घोषित केले.

हिटलरने मनातल्या मनात निश्चित केले की, आता त्याच्या उन्नतीत खरा अडथळा पपेनचाच राहिला आहे. तो पपेनला स्पष्ट भाषेत म्हणाला,

"तुमचे मंत्रिमंडळ म्हणजे एक तात्पुरती व्यवस्था आहे. मी माझ्या पार्टीला देशातली सर्वाधिक शक्तिशाली पार्टी बनविण्याचा प्रयत्न चालूच ठेवीन. त्यानंतर जर्मनीचे चान्सलर पद आपोआप माझ्या पायाशी लोळण घेईल..."

31 जुलै, 1932 रोजी मतदान झाले. नाझींना 1,37,45,000 म्हणजे 37 टक्के मते आणि 230 जागा मिळाल्या. नाझी पार्टी जर्मनीत सर्वांत मोठी तसेच अत्यंत प्रभावशाली पार्टी म्हणून उदयाला आली.

5 ऑगस्ट, 1932 रोजी हिटलरने श्लाइशरकडे आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यातील मागण्या अशा :

त् चान्सलर पद

• स्वत:च्या मर्जीनुसार राज्यकारभार करण्याचा अधिकार

• कॅबिनेट मत्र्यांत नाझींना 3 जागा

• प्रचार मंत्रालयाची निर्मिती

• आंतरिक कार्य मंत्रालयावर नियंत्रण

• प्रशियावर नाझींचे नियंत्रण

• श्लाइशरच्या अखत्यारीत सुरक्षा मंत्रालय देण्यात यावे.

श्लाइशरने या मागण्यांवर लगेचच कोणताच निर्णय दिला नाही. फक्त नंतर पाहू, असे उत्तर देऊन त्याने वेळ मारून नेली.

नाझी एस.ए. पार्टी सदस्य सत्ताग्रहणाचे स्वप्न पाहत बर्लिनमध्ये जमा होऊ लागले; परंतु वयोवृद्ध राष्ट्रपती हिंडेनबर्गने हिटलरसह सर्वांच्या स्वप्नांवर पाणी फिरवले. त्याला हिटलरचा विश्वास वाटत नव्हता, म्हणून तो हिटलरला चान्सलर बनविण्याचा धोका पत्करायला थोडा मागेपुढे करीत होता.

श्लाइशर आणि पपेनने 13 ऑगस्ट रोजी हिटलरची भेट घेऊन त्याला ही दुर्वार्ता

ऐकवली. सहानुभूतीचे नाटक करीत हेही सांगून टाकले की, ते त्याला व्हाईस चान्सलरचे पद आणि प्रशियाचे अंतर्गत कार्य मंत्रालय देऊ शकतात.

सर्वांनाच हिटलरच्या वर्चस्वाची भीती वाटत होती. कसेही करून त्याला डोईजड होऊ द्यायचे नाही असा बाकीच्यांचा प्रयत्न होता. दोघांचे बोलणे ऐकून हिटलर अपमानित आणि संतप्त झाला. तो खूप चिडला. त्याने सरळ सरळ धमकी दिली,

“मी एस.ए. गटाला पूर्ण जर्मनीत तीन दिवस हिंसा आणि हत्या यांचा आतंक माजविण्याचा आदेश देईन...”

त्याच दिवशी राष्ट्रपती हिंडेनबर्गने हिटलरला भेटीला बोलावून घेतले. मागण्यासंदर्भात तसेच पपेन आणि श्लाइशरला सहकार्य करण्याऐवजी दमदाटी करण्याबाबत खूप फटकारले.

हिटलरने त्याच्या समर्थकांना पंधरा दिवसांची सुटी दिली. स्वत: अशितिस्गोडनला निघून गेला.

12 सप्टेंबर, 1932 रोजी पपेनने राइचस्टॅग भंग करून पुन्हा नव्याने निवडणुका घेण्याचा हरमन गोरिंगला सल्ला दिला. प्रचार सुरू असताना हिटलरची प्रेयसी ईवा ब्रॉन हिने स्वत:च्या मानेत गोळी मारून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवाने ती वाचली; पण या घटनेचा हिटलरच्या प्रचारावर परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. 6 नोव्हेंबर, 1932 रोजी झालेल्या मतदानाचा लोकांना आता खरे म्हणजे कंटाळाच आलेला होता.

पूर्वीच्या तुलनेत नाझी पार्टीला 20 लाख मते कमी मिळाली. संसदेतही नाझींच्या 35 जागा कमी झाल्या. याचा परिणाम म्हणजे

• नाझींचा प्रभाव कमी होऊ लागला.


• हिटलर निरुत्साही झाला.

• बर्लिनमध्ये एकही काळजीवाहू सरकार राहिले नाही.

• चान्सलर म्हणून पपेनचा दबदबा राहिला नाही.

• श्लाइशर पपेनचा प्रभाव कमी व्हावा म्हणून गुप्त कारवाया करायला लागला.

17 नोव्हेंबर, 1932 रोजी राष्ट्रपती हिंडेनबर्गची भेट घेऊन पपेनने आपल्या चान्सलरपदाचा राजीनामा देऊन टाकला. 19 नोव्हेंबर, 1932 रोजी हिटलर हिंडेनबर्गला भेटला. त्याने मागची चान्सलरपदाचीच मागणी पुन्हा पुढे रेटली.



हिंडेनबर्गने त्याची मागणी तर स्वीकारलीच नाही उलट त्याची परीक्षा पाहण्यासाठी त्याच्यासमोर प्रस्ताव मांडला की, इतर राजकीय पक्षांबरोबर खांद्याला खांदा भिडवून आघाडी सरकार स्थापन करावे.

हिटलरने हिंडेनबर्गचा हा ठराव फुटबॉलप्रमाणे ठोकरून लावला.

21 नोव्हेंबर, 1932 रोजी हिटलरने पुन्हा हिंडेनबर्गची भेट घेतली. नाझींच्या बाजूच्या एका निवेदनावर सही घेण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रपतींनी सही करण्यास नकार दिला.

मात्र यानंतर देशातील उद्योगपती, बँकर्स आणि व्यावसायिकांच्या नेत्यांनी राष्ट्रपती हिंडेनबर्गकडे संयुक्त याचिका दाखल करून हिटलरला चान्सलर बनविण्याची मागणी केली.

आपण केलेली टाळाटाळ जनता जास्त दिवस खपवून घेणार नाही, अशी हिंडेनबर्गचीही खात्री झाली. त्याने पपेन आणि श्लाइशरला निरोप पाठवला. ते लगोलग धावून आले. प्राप्त परिस्थितीत काय करायला पाहिजे, असा सरळ सवाल हिंडेनबर्गने विचारला.

पपेनने पदाचा एकदा राजीनामा दिलेला होता, तरीही त्याला लहर आली. तो म्हणाला,

“संधी मिळाली तर मी चान्सलरपदाची जबाबदारी पुन्हा सांभाळायला तयार आहे...”

हे ऐकताच श्लाइशरचे डोके गरम झाले. तो म्हणाला,

“पपेन नाही. मी स्वत: चान्सलर बनण्यास उत्सुक आहे. मीच शासनप्रमुख बनून सरकार स्थापन करीन...”

त्या दोघांत सत्तालालसा उद्भवण्याची गोष्ट नवीन किंवा आश्चर्य वाटण्याजोगी नव्हती. मात्र या डावपेचात हिंडेनबर्गची या वयात मानसिक कोंडी होऊ लागली, तर हिटलर थोडा बाजूला फेकला जाऊ लागला.

श्लाइशरचे सैन्यांवर नियंत्रण होतेच, तरीही गुप्तपणे सैन्यांवरची पकड आणखी मजबूत करण्याचा त्याचा प्रयत्न सुरूच होता. पपेन हिंडेनबर्गला भेटण्यासाठी एकटाच गेला. तेव्हा डोळ्यात आसवे आणून तो राष्ट्रपती म्हणाला,

“माझ्या प्रिय पपेन, आता अगदी नाइलाज झाला. श्लाइशरला चान्सलर बनवणे एक लाचारी आहे. मी खूप वृद्ध झालो आहे. राष्ट्राला मी इतके काही दिले आहे की, आणखी एखाद्या गृहयुद्धाची जबाबदारी स्वीकारण्याचे सामर्थ्य माझ्या अंगात राहिले नाही. श्लाइशरला त्याचे नशीब अजमावू देणे हाच एकुलता एक मार्ग उरला आहे...”

2 डिसेंबर 1932 रोजी कुर्त वॉन श्लाइशर जर्मनीचा चान्सलर झाला.

•••

# दुर्दम्य इच्छाशक्तीचा विजय

श्लाइशरने राष्ट्रपतीला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे नाझांमध्ये आपसात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू केला. नेहमीप्रमाणे कट-कारस्थानांना ऊत आला. हिटलरचा एक सुरुवातीपासूनचा साथीदार होता ग्रगोर स्टॉसर! श्लाइशरने त्याच्याशी गुप्त समझोता केला. त्याला व्हाईस चान्सलर पद आणि प्रशियाचे नियंत्रण सोपविण्याचे आश्वासन दिले.

पपेनला हे सर्व माहीत होते. त्याची चान्सलरपदाची संधी हुकल्यावर त्याने ते सर्व हिटलरला सांगितले.

हिटलरचा आणि स्टॉसरचा वादविवाद झाला. स्टॉसरने सरळ आरोप केला की, हिटलरने नाझी पार्टीचा सत्यानाश केला आहे. हिटलरनेही मग त्याच्यावर विश्वासघाताचा दोष लावला. स्टॉसरने पार्टी सोडत असल्याचे पत्र देऊन टाकले. तो एवढ्यावरच थांबला नाही, सरळ इटलीला निघून गेला.

पपेनने एकदा संपूर्ण सत्तेचा उपभोग घेतल्याने त्याला त्याची चटक लागली होती. तो श्लाइशरला सत्ताभ्रष्ट करण्यासाठी मनातून टपून बसला होता. त्याने आपल्याला विश्वासात घेऊन शेवटी फसविले, हा विचार त्याच्या डोक्यातून जाईना आणि त्याला स्वस्थ बसू देईना. रक्त‘माला चटावलेल्या वाघासारखा तो अस्वस्थ झाला!

4 जानेवारी, 1933 रोजी हिटलर पपेनला भेटण्यासाठी गेला. ही भेट बँकर कुर्त वॉन शोएडरच्या घरी झाली. श्लाइशरला हटवून पपेन-हिटलर भागीदारीत संयुक्त सरकार स्थापन करण्याची पपेनची कल्पना नाखुशीने का असेना हिटलरला स्वीकारावी लागली.

श्लाइशरच्या गुप्तचरांनी या गुप्तभेटीची आणि त्यात घेतल्या गेलेल्या निर्णयाची माहिती त्याला सांगितली. त्याने तातडीने हिंडेनबर्गकडे धाव घेतली. पपेनविरुद्ध त्याचे कान भरण्याचा खूप प्रयत्न केला; पण तो सर्व निष्फळ ठरला. कारण श्लाइशरवर कोणाचाच विश्वास राहिला नव्हता.

15 जानेवारी, 1933 रोजी एक लहानसे जर्मन राज्य लिप्पेमध्ये निवडणूक झाली. पद्धतशीर प्रचारामुळे मागच्या वेळेपेक्षा या निवडणुकीत मिळालेल्या मतात काही प्रमाणात वाढ झाली. नाझींच्या या यशाने राष्ट्रपती हिंडेनबर्गही प्रभावित झाला.

रविवार, दिनांक 22 जानेवारी, 1933 रोजी जोशिम वॉन रिबेनट्रॉप याच्या घरी एक गुप्त बैठक झाली. त्या बैठकीला पपेन, हिंडेनबर्गचा पुत्र ऑस्कर, स्वत: हिटलर आणि गोरिंग हजर होते.

हिटलरने ऑस्करला पटवले की, तो सांगेल त्या अटींवर नाझी पक्ष सरकारात सामील व्हायला तयार असतील.

पपेनने हिटलरला धोका न देण्याचे तसेच त्याच्याशी सदैव प्रामाणिक राहण्याचे वचन दिले. अर्थात ते एक राजकारण्याने दुसऱ्या राजकारण्याला दिलेले वचन होते, ज्याचे पालन होणे एक अशक्यप्राय गोष्ट होती.

राजकारण्यांनी कोणतेही वचन गांभीर्याने घ्यायचे नसते.

चडफडणाऱ्या श्लाइशरने नाझींवर नियंत्रण आणण्यासाठी हिंडेनबर्गला सल्ला दिला की,

• राइचस्टॅग (जर्मन संसद) विसर्जित करण्यात यावी.

• देशात आणीबाणी लागू करावी.

हिंडेनबर्गने त्याच्या सूचना नाकारून असे भलतेसलते काही करू देणार नाही, असे स्पष्ट सुनावले.

28 जानेवारीला श्लाइशरने पुन्हा केलेला प्रयत्न अपयशी झाल्याने त्याने राजीनामा देऊन टाकला.



30 जानेवारी, 1933 रोजी राष्ट्रपती हिंडेनबर्गने हिटलरला जर्मनीचा चान्सलर घोषित केले. त्याच दिवशी दुपारी हिटलरला चान्सलरपदाची शपथ दिली गेली. चान्सलर बनून तो छाती पुढे काढून राष्ट्रपती भवनातून रुबाबात बाहेर पडला. अत्यानंदामुळे त्याच्या दोन्ही डोळ्यांत आनंदाश्रू जमा झाले.

रस्त्यावर त्याची शोभायात्रा निघाली. दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या स्त्री-पुरुषांनी त्याच्या नावाचा उत्स्फूर्तपणे जयजयकार केला.

हिटलर 11 सदस्यीय मंत्रिमंडळाचा अध्यक्ष झाला.

फ्राँज वॉन पपेनला व्हाईस चान्सलरपदाची शपथ देण्यात आली. तो आपल्या एका राजनैतिक सहकाऱ्याजवळ बढाई मारून म्हणाला,

“दोन महिन्यांच्या आत आपण हिटलरला एखाद्या अशा सांधीकोपऱ्यात लाथाडून देऊ की तो उंदराच्या पिलासारखा नुसता चिंऽचिंऽऽ करीत राहील...”

जनता जर्मनीची घालवली गेलेली प्रतिष्ठा आणि सम्राटाचे वैभव पुन्हा प्राप्त करू इच्छित होती. हिटलरच्या माध्यमातून आणि त्याच्या धोरणानेच हे शक्य होऊ शकेल, असा सर्वांना विश्वास वाटत होता.

मोठे बँकर्स आणि उद्योगपती स्वत:चे हितसंबंध जोपासण्यासाठी हिटलरला समर्थन देत होते. तो जर्मन सैन्याची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित करण्याचे आणि जर्मनीसाठी अत्यंत मानहानीकारक असलेला व्हर्सायचा तह मोडीत काढण्याचे वारंवार आश्वासन देत असल्यामुळे संपूर्ण लष्कर त्याच्याकडे वळले.

## भयाचे सावट

काही आठवड्यातच हिटलर जर्मनीचा हुकूमशहा बनला. पुढे चालून त्याच्या अट्टहासापायी द्वितीय विश्वयुद्धाचा भडका उडाला, ज्यात 5 कोटी लोकांचा बळी

गेला.

जर्मन संसदेत (राइचस्टॅग) निवडून आलेल्या नाझी सदस्यांचे बहुमत सिद्ध करण्याची हिटलरची योजना होती. त्यामुळे जर्मन लोकसभा केवळ एक रबरी शिक्का होणार होती. तो आपल्या मर्जीनुसार कोणताही कायदा पास करून घेऊ शकत होता.

पदग्रहणाच्या पहिल्याच दिवशी हिटलरने राष्ट्रपती हिंडेनबर्गला दोन गोष्टींसाठी राजी करून घेतले.

• जर्मन लोकसभा विसर्जित करणे.

• नव्याने निवडणूक घेणे.

त्याच दिवशी संध्याकाळी लष्कराच्या जेवणाच्या कार्यक्रमात हिटलरने जाहीर केले -

• जर्मनी जगात आपला पूर्वीचा दबदबा कायम करील.

• त्यासाठी आपली अस्त्र-शस्त्र शक्ती वाढवील.

• पूर्वेकडील राष्ट्रांवर आक्रमण करून त्यांच्यावर कब्जा करील.

• जिंकलेल्या राष्ट्रांचे सक्तीने जर्मनीकरण केले जाईल.

• नियमित सेनेच्या ठिकाणी एस.ए.च्या तुफानी टोळ्यांना कोणताच वाव दिला जाणार नाही.

राष्ट्रपती हिंडेनबर्ग पूर्णपणे हिटलरच्या आहारी गेला. हिटलरने चान्सलर या नात्याने तातडीने एक आदेश जारी केला. त्यानुसार जर्मनीचे सर्वांत मोठे राज्य प्रशिया व्हाईस चान्सलर पपेनच्या नियंत्रणात देऊन टाकले. राजधानी बर्लिनही प्रशियातच सामील होती.

लोकशाहीशी एकनिष्ठ असणाऱ्या अनेक पोलीस अधिकाऱ्यांना हटवून गोरिंगने त्यांच्या जागी निष्ठावान नाझी अधिकारी नेमले. त्यांना खूप सक्त ताकीदवजा सूचना दिल्या.

22 फेब्रुवारीला गोरिंगने 50,000 जवानांचे एक पोलीस दल स्थापित केले. त्यात एस.ए. आणि एस.एस.च्या सदस्यांचाच जास्त भरणा होता. 24 फेबुरवारीला गोरिंगच्या या पथकाने बर्लिनमधील कम्युनिस्टांच्या मुख्यालयावर हल्ला चढवला.

हिटलरच्या संमतीने गोरिंग आणि गोबेल्सने जर्मन संसद भवनला आग लावून दिली. मात्र ती आग कम्युनिस्टांनी लावली, अशी हाकाटी पिटण्यात आली. हे कार्यालय बर्लिनमध्ये होते. कट करून या आगीचा संपूर्ण दोष कम्युनिस्टांवर लादण्यात आला.

27 फेब्रुवारीला ही कार्यवाही पूर्ण झाली.

हिटलरने मोठा नाटकी आवेश आणून कम्युनिस्टांची झडती घेतली.

28 फेब्रुवारी, 1933 रोजी मंत्रिमंडळाची बैठक होती. त्या बैठकीत देशात आणीबाणी लागू करण्याचे ठरले. हिटलर आणि पपेनने राष्ट्रपती हिंडेनबर्गची भेट घेतली. त्याला एका आदेशावर सही करायला भाग पाडले. त्या आदेशाचे शीर्षक होते, ‘जनता

आणि राज्याच्या सुरक्षिततेसाठी..!’

या आदेशानुसार व्यक्तिगत स्वातंत्र्य, विचार, अधिकार, वर्तमानपत्र, टपाल, तार, फोन इत्यादांवर बंधने घातली गेली. नाझींनी अचानकपणे कम्युनिस्टांची आणि विरोधकांची धरपकड सुरू केली. 51 नाझीविरोधी नेत्यांना ठार मारण्यात आले.

नाझींच्या वर्तमानपत्रात कम्युनिस्टांच्या कट-कारस्थानांच्या निखळ खोटचा बातम्या छापून आणण्याचा धूमधडाका चालू झाला. सरकारी रेडिओ गोबेल्सच्या नियंत्रणात होता. त्या काळात इतिहासात त्याच्याइतका खोटारडा कोणीही नव्हता. तो हिटलरचा आणि नाझींचा सदैव उदोउदो करायचा.

सर्वांचे लक्ष 5 मार्चला, व्हावयाच्या मोकळ्या निवडणुकीकडे लागले. उद्योगपतींनी हिटलरच्या निवडणूक खर्चाप्रीत्यर्थ 30 लाख मार्क इतका निधी जमा करून दिला.

ठरल्याप्रमाणे 5 मार्च 1933 रोजी मतदान झाले. हिटलरला बहुमत काही मिळाले नाही. त्यामुळे हिटलर चिडला. त्याने राजकीय विरोधकांना शत्रू समजून अटकसत्र आरंभले. कैदेत त्यांना इतक्या यातना दिल्या की, कित्येकांचा कैदेतच मृत्यू झाला.

## फ्यूहररने पाश आवळले

हिटलरने जर्मनीतून लोकशाहीचे उच्चाटन करून ती समाप्त करण्याची योजना बनवली. प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्सने नवनिर्वाचित लोकसभेच्या (जर्मन संसद) उद्घाटनप्रसंगी एक भव्य प्रदर्शन आयोजित केले. प्रदर्शनाने लोक खूप प्रभावित झाले.

या समारंभात राष्ट्रपती हिंडेनबर्गला अॅडॉल्फ हिटलरने फारच मान-सन्मान दिला. त्या प्रसंगाची चित्रफीत बनवून प्रसारित करण्यात आली. जगातल्या सर्व वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींनी त्या प्रसंगाचे फोटो घेतले. ती हिटलरची आणि गोबेल्सची विलक्षण चाल होती. हिंडेनबर्गला सर्वांसमोर इतका जो मान-सन्मान देण्यात आला त्यामागे हिटलरचा स्वार्थ दडला होता.

त्याच दिवशी राष्ट्रपती हिंडेनबर्गच्या सहीने हिटलरने खालीलप्रमाणे दोन आदेश जारी केले -

- **जेलमधील सर्व नाझी कैद्यांना संपूर्ण क्षमा.**
- **नाझी विरोधकांना तात्काळ अटक.**

आणखी एक तिसरा आदेश जारी करण्यात आला; पण त्यावर राष्ट्रपतीची सही नव्हती. फक्त हिटलर आणि पपेनने सह्या केलेल्या होत्या. त्याचे शीर्षक असे होते -

**राजकीय अपराध्यांच्या निवाड्यासाठी स्वतंत्र न्यायालये**

ज्यात बचावासाठी ना ज्युरीची तरतूद, ना वकिलाची व्यवस्था! खरा मान जजचाच! त्याच्याकडून न्याय मिळण्याची कदापिही शक्यता नाही.

23 मार्चला नवनिर्वाचित संसद सदस्यांचे बर्लिनच्या क्रॉल ऑपेरा हाऊसमध्ये अधिवेशन बोलाविण्यात आले. त्यात हिटलरचे संपूर्ण समर्थन करणारा म्हणजेच त्याला हुकूमशहा म्हणून सर्वंकष सत्ता सोपविणारा कायदा सक्तीने पास करून घेतला जाणार होता.

सोशल डेमोक्रॅटस्चा नेता ऑटो बेल्सचा याला विरोध होता. त्यावर संतापलेल्या हिटलरने त्याला दम दिला,

“आता तुमची आवश्यकता संपली आहे. जर्मनीचा तारा बुलंद होईलच; पण ते पहायला तुम्ही नसाल. कारण तुमचा तारा अस्तास गेलेला असेल, तुमची मृत्युघंटा वाजली आहे…”

त्या कायद्यावर सर्वानुमते मतदान घेण्याचे ठरले. मतदान प्रक्रिया नियमांनुसार पार पडली. मतमोजणी झाली. संसदेत नाझींचे बहुमत नसूनही ठरावाच्या बाजूने 441 तर विरोधात 84 मते पडली. नाझींच्या आनंदाला पारावार राहिला नाही. ते जल्लोषात मग्न झाले.

दुसऱ्या विश्वयुद्धानंतर जर्मनीत पाय रोवण्याच्या प्रयत्नात असलेल्या लोकतंत्र शासनप्रणालीचा शेवट झाला. व्यक्तिस्वातंत्र्यास कोणतीच किंमत राहिली नाही. जन्मल्याबरोबर दोन गोष्टींचे बंधन आले -

- **देशाची सेवा**
- **फ्यूहररचे - हिटलरचे कारण न विचारता आज्ञापालन**
- **अवज्ञा करणाऱ्यांचा शेवट**

ज्यांना ही व्यवस्था मान्य नव्हती त्यांनी देशाचा त्याग केला. त्यात अनेक दिग्गज होते, जसे- लेखक टॉमस मन, निर्देशक फ्रिट्ज लंग, अभिनेत्री मर्लिन डाइट्रिच, वास्तुकार वाल्टर ग्रोपियश, संगीतज्ञ ओटोक्लेंफरर, कुर्ल वेइल, रिचर्ड टॉबर, मनोवैज्ञानिक अल्बर्ट आइन्स्टाइन.

## यहुदी विरोध

हिटलर हुकूमशहा झाला. त्या भागात आता दोन हुकूमशहा झाले. इटलीचा फॅसिस्ट मुसोलिनी आणि दुसरा जर्मनीचा नाझी हिटलर.

एक आठवड्यानंतर प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्सच्या आदेशावरून यहुदीयांविरुद्ध सार्वजनिक बहिष्कार चळवळ चालवली गेली. 1 एप्रिल, 1933 रोजी शनिवारी सकाळी 10 वाजता बहिष्काराची सुरुवात झाली.

‘खरेदी फक्त जर्मन दुकानांवरूनच करा.’

असे बोर्ड सर्वत्र झळकले.

गोबेल्सने यहुदींच्या अत्याचाराविरुद्ध कपोलकल्पित प्रचार सुरू केला. जर्मन रेडिओवरून तो देशभर प्रसारित करण्यात आला. नाझी विरोध बंद झाला नाही तर यहुदींना धडा शिकविला जाईल, अशी धमकी गोबेल्सने दिली. तो कमालीचा प्रचारक होता.

वास्तविक यहुदी स्वत:ला जर्मन समजत. ते उदार स्वभावाचे होते. पहिल्या विश्वयुद्धात लाखो जर्मन यहुदींनी आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी स्वत:च्या प्राणाच्या आहुती दिल्या. हिटलरला आयरन क्रॉस - सन्मानाचे पदक - प्रशिया आणि ऑस्ट्रियाचा युद्धचिन्ह - देण्याची शिफारस करणारा एक यहुदी अधिकारीच होता.

असे असूनही हिटलरच्या दृष्टीत यहुदी केवळ जर्मनांचे चिरंतन शत्रू होते.

हळूहळू असे कायदे पास करण्यात आले, ज्यामुळे यहुदींचे सर्व अधिकार संपुष्टात आले. हिटलरच्या 12 वर्षांच्या काळात यहुदींविरुद्ध एकूण 400 पेक्षा जास्त कायदे पास करण्यात आले.

सिव्हिल सेवेत पदग्रहणासाठी आर्यवंशीय असणे बंधनकारक करण्यात आले.

•••

# मृत्युघंटेचा गजर

अशातच एस.एस. प्रमुख हेन्रिक हिमलरच्या डोक्यातून 'जेस्टेपो' नावाच्या संघटनेची उत्पत्ती झाली. हिटलरच्या राजकीय विरोधकांना चिरडण्यासाठी याचा वापर केला जाऊ लागला. 10 फेब्रुवारी, 1936 रोजी नाझी लोकसभेने 'जेस्टेपो कायदा' पारित केला. त्यानुसार जेस्टेपोच्या कोणत्याही कृतीविरुद्ध कायदेशीर अपील करण्यास बंदी घालण्यात आली.

जेस्टेपो स्वत:च कायदा झाली. कोणालाही अटक करणे, बंदिस्त करणे, जेलमध्ये डांबणे, फाशी देणे याकरिता आणखी दुसऱ्या कायद्याची कलमे शोधीत बसण्याची गरज राहिली नाही.

जेस्टेपो संघटनेचे सदस्य हेर आणि खबऱ्यांच्या एका मोठ्या गटात राहून काम करीत होते. त्यांचे कार्य अतिशय गुप्तपणे चालायचे. प्रत्येकाच्या मनात रात्रंदिवस भीती भरून राहायची. सर्वसामान्य जनता तोंडाला कुलूप लावून असायची कारण चुकून जरी नाझींविरुद्ध कोणी काही बोलले की त्याने आपल्या मृत्यूला स्वत:च्या तोंडाने निमंत्रण दिले, असाच त्याचा अर्थ व्हायचा. कारण विचारपूस करताना संशयिताला खालीलप्रमाणे यातना दिल्या जायच्या. त्याकरिता बर्लिनच्या मध्यवर्ती ठिकाणी मुद्दाम विशिष्ट प्रकारचे जेल बांधण्यात आले. दिल्या जाणाऱ्या प्राणांतीत यातनांचे स्वरूप असे होते -

• बर्फाच्या पाण्याने भरलेल्या टबात पुन्हा पुन्हा बुडवणे

• हात, पाय, कान आणि जननेंद्रियाला तार गुंडाळून विजेचा शॉक देणे.

• पुरुषांच्या अंडकोषाला विशेष चिमटयाच्या पकडीत दाबणे.

• हात पाठीमागे बांधून त्याला हातांवर लटकवणे. त्यामुळे खांदे निष्क्रिय होऊन जात.

• रबरी बेताने किंवा गाईच्या कातडीपासून बनविलेल्या चाबकाने फोडून काढणे.

• आगपेटी आणि डागणीने चटके देणे.

ते फक्त नावाला जेल होते. खरे तर ते यातनागृह होते. कारण त्यांच्या आजूबाजूच्या रस्त्यांवरून जाणाऱ्या-येणाऱ्यांना दिवसरात्र आतून जनावरांप्रमाणे हंबरण्याचा, आक्रंदण्याचा आवाज यायचा आणि ऐकताना अंगावर भीतीने काटा उभा राहायचा.

## बुद्धिवादाची होळी

सन 1942 मध्ये हिटलरने 'रात्र आणि धुके' नावाचा कायदा पास केला. हा कायदा म्हणजे भुताच्या हातात कोलीत देण्याचाच प्रकार होता. आधीच जेस्टेपोला अनधिकृत अधिकार देऊन ठेवले होते. नवीन कायद्याने त्यांना अमर्याद सत्ता प्रदान केली.

'रात्र आणि धुके' कायद्यातहत चौकशीसाठी पकडून नेलेल्या विरोधकाचा कधीच तपास लागत नसे. तो कधीच घरी परत येत नसे.

हिटलरच्या उत्थानापूर्वी शंभर वर्षे आधी जर्मन-यहुदी कवी हेन्रिक व्हाइनने मत नोंदवून ठेवले होते -

**“जेथे पुस्तकांची होळी केली जाते तेथे माणसांच्या नशिबातही जळणे लिहिले जाते...**

10 मे 1933 रोजी अशी एक दुर्घटना घडली -

विश्वविद्यालयात (अर्थात जर्मनीच्या) शिकणारे विद्यार्थी जर्मनविरोधी विचारांच्या पुस्तकांची होळी करण्यासाठी बर्लिनमध्ये एकत्र आले. त्यांनी सारासारविचार न करता ग्रंथालयाला आग लावली. 20,000 पुस्तके आगीच्या ज्वाळात स्वाहा झाली. त्यात अल्बर्ट आइन्स्टाइन, सिग्मंड फ्राइड, मॅक्सिम गॉर्की, अर्नेस्ट हेमिंग्वे, हेलेन केलर, कार्ल मार्क्स, एच.जी. वेल्स, ऐमिल जोला इत्यादी लेखकांच्या मौल्यवान साहित्यकृतींचा समावेश होता.

खोटारडा प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्सने जाहीर केले,

“परंपरागत यहुदी प्रणालीचा शेवट होऊन नवीन प्रकाशकिरणे तेजाळू लागली आहेत. भविष्यात जर्मन नागरिक केवळ पुस्तकी किडा न राहता चारित्र्यसंपन्न व्यक्ती म्हणून लौकिक प्राप्त करतील.”

हिटलरच्या काळात जर्मनीची बौद्धिकता लोप पावू लागली. विद्यार्थी आणि प्रोफेसरांनी नाइलाजाने नाझी विचारधारेचा स्वीकार करून स्वत:ला त्यात वाहवून टाकले.

पूर्ण जर्मनीत प्राथमिक शाळेपासून विश्वविद्यालयापर्यंतच्या सर्व यहुदी शिक्षकांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. वास्तविक ते खूप हुशार, मेहनती, अभ्यासू आणि प्रामाणिक होते. त्यांचे प्रमाण 10 टक्क्यांच्या आसपास होते. त्याचा भौतिक आणि गणित विषयावर आणि त्यांच्या शिक्षणावर अतिशय अनिष्ट परिणाम झाला. बरेच विद्वान हिटलरच्या जर्मनीचा त्याग करून अमेरिकेत स्थायिक झाले. म्युनिच युनिव्हर्सिटीत व्हाइट रोज नावाचा एक ग्रूप गट निर्माण झाला होता. त्याच्या सदस्यांनी धाडस करून मनातील क्षोभ व्यक्त करणारी पत्रके वाटली -

“अॅडॉल्फ हिटलर! आम्हाला आमचे व्यक्तिगत स्वातंत्र्य परत करा. हा आमचा अधिकार आहे. तो अत्यंत निर्दयीपणे आमच्यापासून हिरावून घेतला गेला आहे.”

या गटाचे दोन प्रमुख सूत्रधार आणि नेते होते हेन्स तसेच सोफी शोल. हिटलरने त्याच्या कमांडोंना गुप्तपणे आदेश दिला,

“हेन्स आणि सोफी शोल ही नावे मिटली पाहिजेत.”

झाले. स्वत: फ्यूहररचा आदेश. दोघांना अचानक अटक करण्यात आली. ज्यांना अशी अटक करण्यात येई त्यांचे भवितव्य ही काळ्या दगडावरची रेघ असे.

हेन्स आणि सोफी शोला फाशी देण्यात आले.

अॅडॉल्फ हिटलरच्या शाळेचे विद्यार्थी शरीराने आणि आरोग्याने सुदृढ होते. त्यांच्या मनात नाझी विचारसरणी ओतप्रोत भरलेली होती. मात्र विज्ञान आणि गणिताचे त्यांना अगदी प्राथमिक ज्ञानसुद्धा नव्हते. हिटलरला असेच तरुण पाहिजे होते, जे मरेपर्यंत प्रश्नोत्तर न करता आदेशाप्रमाणे मातृभूमीची सेवा करण्यास

अखंड तयार असतील.

•••

# अराजकाचा विजय

हिटलरला हुकूमशहा बनविण्यात अर्नेस्ट रोहमचा मनापासून सहभाग होता. त्याच्याकडे एस.ए.चे नेतृत्व होते. त्याला चीफ ऑफ स्टाफ हा हुद्दा होता. त्याच्या नियंत्रणात 1,00,000 प्रशिक्षित सैनिक होते. ते हिटलरच्या हुकूमशाहीला कोणत्याही क्षणी गुंडाळून ठेवू शकतील इतके सामर्थ्यशाली होते.

रोहम आणि त्याचे जवान स्वत:ला 'नवीन जन सेने'चे निर्माते किंवा संस्थापक समजू लागले होते. नेपोलियनच्या क्रांतिकारी सैन्याप्रमाणे जर्मनीच्या परंपरागत सैन्याचे स्थान प्राप्त करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

या ओढाताणीमुळे त्यांच्यात आणि हिटलरमध्ये सरळ संघर्षाची स्थिती येऊन ठेपली. हिटलरच्या दृष्टीने एस.ए.जवानांची वागणूक सर्वांसाठीच त्रासदायक होऊ लागली.

शेवटी फेब्रुवारी 1934 च्या अंतिम आठवड्यात हिटलरने एक बैठक बोलावली. तिला एस.ए.चे नेता, सेनानायक, अर्नेस्ट रोहम, जर्मनीचा संरक्षणमंत्री जनरल वस्नर वॉबब्लॉम्बर्ग हे उपस्थित होते. हिटलरने रोहमला सर्वांसमक्ष गोड शब्दांत ताकीद दिली,

"माझ्या प्रिय रोहम, एस.ए.ला जर्मनीत सैन्यशक्तीचे स्वरूप प्राप्त होऊ दिले जाणार नाही."

रोहमने बैठकीत ही गोष्ट कबूल केली. मात्र बैठक संपल्यावर त्याने गुण उधळायला सुरुवात केली. त्याने आपल्या विश्वासू मित्रांना सांगितले,

"हिटलर देशद्रोही आहे. बैठकीत ठरलेल्या निर्णयावर मी प्रत्यक्षात अंमलबजावणी करणार नाही इत्यादी..."

एका खबऱ्याने ही गोष्ट हिटलरच्या कानावर घातली.

बर्लिनमध्ये दोन महिन्यांनंतर प्रेस कॉन्फरन्स घेऊन रोहमने जाहीर केले -

"एस.ए. हीच राष्ट्रीय समाजवादी क्रांती आहे."

त्या काळात अत्यंत शिस्तबद्ध अशी एस.एस. नावाची दुसरी संघटना होती. तिच्या प्रमुखाचे नाव होते - हेन्रिक हिमलर. ही वेगळी संघटना 'अॅडॉल्फ हिटलर' या व्यक्तीची निस्सीम भक्त होती.

हिमलरने आपला विश्वासू सहकारी राइन्हर्ड हेड्रिक आणि नाझी हरमन गोरिंग यांच्या सहकार्याने रोहमविरुद्ध आघाडी उघडली. हिटलरची आणि रोहमची 5 तास भेट झाली. रोहमने जाहीर केले,

'प्रकृती अस्वास्थामुळे मी पदाचा राजीनामा देत आहे...'

त्याने योग्य निर्णय घेतला. हिटलरशी झालेला विरोध एव्हाना जवळच्या काही लोकांना समजला होता. पद सुरक्षित ठेवण्याच्या नादात प्राण गमवावे लागणार होते कारण तो विरोध कोण्या ऐऱ्यागैऱ्याचा नव्हता. प्रत्यक्ष यमालाही थरथर कापायला लावील, अशा क्रूरकर्म्याशी वैर.

राजीनामा देऊन रोहमने स्वत:चा जीव वाचवला.

जर्मनीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

### विरोधकांची कत्तल

21 जून रोजी वयोवृद्ध राष्ट्रपती पॉल वॉन हिंडेनबर्गच्या खेड्यातील घरी जाऊन हिटलरने त्याची भेट घेतली. त्याच्यासोबत जनरल ब्लॉम्बर्गही होता. राष्ट्रपतीने हिटलरला सरळ तंबी दिली.

''एस.ए.चा प्रश्न तातडीने हाताळून त्यांच्या कारवायांना आळा घाला. तसे केले नाही तर मी स्वत: देशात लष्करी शासन लागू करीन. देश सैन्याच्या ताब्यात दिला जाईल. नाझी राजवट संपूर्णपणे संपलेली असेल.''

शुक्रवार, 29 जूनला हिटलरने वेस्टफैलियाचा दौरा केला. रात्री तो बॉनजवळच्या एका हॉटेलात मुक्कामाला थांबला. हिमलर आणि गोरिंगकडून त्याला रात्रभर फोन येत राहिले की, एस.ए. सैनिकांना त्यांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या कारवाईचा सुगावा लागला आहे, तसेच ते प्रतिहल्ला करण्याच्या तयारीला लागले आहेत.

रात्री 2 वाजता हॉटेल सोडून हिटलर विमानाने म्युनिचकडे निघून गेला. तेथे त्याला रोहम आणि इतर एस.ए. नेत्यांची व्यक्तिगतरीत्या भेट घ्यायची होती.

30 जून, शनिवारी सकाळी हिटलर म्युनिचला पोहोचला.

गाऊलाइटर अॅडॉल्फ वॅगनरने त्याला सांगितले की, एस.ए. च्या लोकांनी रात्रभर विरोधी घोषणा देत रस्त्यावर गोंधळ घातला. ते ऐकून हिटलर अतिशय संतापला. त्याला संतापायला तर काय किरकोळातले किरकोळ कारणही पुरेसे होत असे. अंगरक्षकांसह राज्य मंत्रालयाच्या (मिनिस्ट्री ऑफ स्टेटस्) आणि कार्यालयात गेला. तीन एस.ए. उच्चाधिकाऱ्यांच्या गणवेशावरून त्याने नाझी



बक्कल ओरबाडून घेतले. ही घटना म्युनिचमध्ये घडली.

यानंतर रोहमचा नंबर होता.

आपल्या ताफयासह सकाळी 6.30 वाजता रोहमला भेटण्यासाठी हिटलर बॉड विएसी रिसॉर्टमध्ये पोहोचला. तेथे रोहमनेच दरवाजा उघडला. संतापलेला हिटलर त्याच्यावर लगेच भडकला,

''धोकेबाज, अर्नेस्ट रोहम! तुम्हाला अटक करण्यात येत आहे.''

एक एस.ए. नेता एडमंड हाइसला गलिच्छ वागणुकीमुळे हिटलरने फासावर लटकावण्याचा आदेश दिला.

शनिवारी सकाळी 10 वाजता हिटलरने बर्लिनमध्ये गोरिंगला पूर्ण शुद्धीकरणाची परवानगी दिली. जेस्टेपो, गोरिंगचे पोलीस आणि एस.एस.चे खुनी कमांडो यांनी

एस.ए.च्या नेत्यांची भरमसाट कत्तल केली.

गत चाळीस तासांत एक क्षणही न झोपलेला हिटलर विमानाने बर्लिनला पोहोचला. विमानतळावरच त्याला गोरिंग आणि हिमलर भेटले. ते रोहमला ठार मारण्याचा आग्रह करू लागले. स्टेडिल्हॅम जेलमध्ये बसलेल्या रोहमला आत्महत्येचा निर्णय घेण्यासाठी फक्त 10 मिनिटे देण्यात आली. पंधरा मिनिटांनंतर दोन एस.एस. अधिकारी त्याच्या कोठडीत शिरले. त्यांनी अत्यंत जवळून गोळ्या झाडून रोहमला ठार केले.

हिटलरचा अंगरक्षक एस.एस. दलाचा नियंत्रक होता हायड्रिच. त्याच्या लोकांनी जेलमधील इतर एस.ए. नेत्यांना हिटलरचे नाव सांगून ठार मारले.

1 जुलै, रविवारी हिटलरने लोकांना भुलविण्यासाठी बर्लिनच्या राइक चान्सलरी उद्यानात मंत्रिमंडळ सदस्य आणि त्यांच्या परिवारांसाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला.

सोमवार, दिनांक 2 जुलै रोजी सकाळी 4 वाजता 72 तासांपासून सुरू केलेली ‘शुद्धीकरण’ मोहीम थांबविण्यात आली. त्यात हजारो विरोधकांचे शिरकाण केले.

हिटलर, गोरिंग, हिमलर, हेड्रिक यांनी या शुद्धीकरण मोहिमेच्या निमित्ताने स्वत:चे वैयक्तिक वैर साधून घेतले.

राष्ट्रपती हिंडेनबर्ग हिटलरच्या या कारवाईवर खूपच खूश झाला. त्याने हिटलरचे अभिनंदन करणारी तार पाठवली. जर्मन सेनाधिकाऱ्यांनीही हिटलरच्या या शुद्धीकरण मोहिमेचे मनापासून समर्थन केले.

काही दिवसांनंतर हिटलरने हिमलरला एस.एस. संघटनेचा प्रमुख बनविले. योजनेचा दुसरा सूत्रधार राइन्हर्ड याला लेफ्टनंट जनरल बनवून टाकले. विरोधकांना प्रत्यक्ष गोळ्या घालणाऱ्या एस.एस. सैनिकांना विशेष चिन्हाची कट्यार हिटलरकडून भेट दिली गेली.

•••

# निरंकुश सर्वसत्ताधिकारी

आता हिटलरच्या संपूर्ण सत्ताग्रहणात केवळ एकच अडथळा राहिला होता, 87 वर्षांचा वयोवृद्ध राष्ट्रपती पॉल वॉन हिंडेनबर्गचा. खरे म्हणजे तो खेड्यातील त्याच्या व्यक्तिगत घरी मरणासन्न अवस्थेत पडून होता. ते वर्ष होते 1934.

हिंडेनबर्गच्या वृद्धावस्थेमुळे त्याच्या अटळ मृत्यूची सर्वांनाच प्रतीक्षा होती. तो पूर्व प्रशियातील त्याच्या ग्रामीण जहागिरीच्या ठिकाणी शेवटच्या घटका मोजत होता.

हिटलरला जर्मनीचा केवळ राष्ट्रपती व्हायचे नव्हते. हिंडेनबर्गनंतर ते पद तर प्रयत्न न करताही त्याच्या पायांवर आपोआप लोळण घेणार होते. त्याला व्हायचे होते जर्मनीच्या जनतेचा फ्यूहरर! सर्वोच्च नेता बनण्याची त्याची अत्यंत महत्त्वाकांक्षा होती.

जर्मनीत काही रूढिवादी (काँझर्वेटिव्ह) विचारसरणीचे लोक होते. लोकशाही मान्य नसली तरी त्यांना त्यांची मातृभूमी हिमलर आणि हेड्रिकसारख्या खुनी रक्तपिपासू लोकांच्या हाती जावी हेही त्यांना पसंत नव्हते. यात जर्मनीचा व्हाईस चान्सलर फ्रांज वॉन पपेन आघाडीवर होता, तसेच तो राष्ट्रपती हिंडेनबर्गचा विश्वासपात्र होता.

हिटलरने एका कायद्याचा आराखडा तयार केला. त्याअंतर्गत जर्मनीच्या राष्ट्रपतीचे पद समाप्त करून स्वत:ला जर्मनीचा फ्यूहरर घोषित करण्यात आले.


2 ऑगस्ट, 1934 रोजी सकाळी हिंडेनबर्गची प्राणज्योत मालवली. ही खबर जाहीर होऊन सर्वत्र प्रसारित होण्याच्या काही तास आधी नाझी संसदेने एक दिवस आधीची 1 ऑगस्ट, 1934 ही तारीख टाकून खालील कायदा लागू केला -

• राईक अथवा जर्मन साम्राज्याचे राष्ट्रपतीचे पद यापुढे जर्मन चान्सलरच्या पदात समाविष्ट राहील. त्यामुळे सध्याच्या राष्ट्रपतीचे सर्व अधिकार फ्यूहरर आणि राईक चान्सलर अॅडॉल्फ हिटलर याच्याकडे वर्ग होतील. व्हाइस चान्सलरची निवड चान्सलर स्वत: करतील...”

• याची अंमलबजावणी जर्मनीचे राष्ट्रपती हिंडेनबर्ग यांच्या मृत्यूनंतर लगेचच केली जाईल.

## सक्तीची शपथ

नवीन फ्यूहरर कायदा लागू होताच जर्मन सैन्याच्या प्रत्येक सैनिकाला गोपनीयतेची आणि एकनिष्ठतेची शपथ देण्यात आली.



“मी परमेश्वराला स्मरून पवित्र शपथ घेत आहे की, जर्मन साम्राज्य आणि जर्मनीच्या जनतेचे सशस्त्र सैन्याचे सर्वोच्च कमांडर अॅडॉल्फ हिटलरच्या प्रति विनाअट आज्ञाकारी राहीन. या शपथेचा मान ठेवण्यासाठी आपले जीवन संकटात घालण्यास मी तयार राहीन...”

ही अभूतपूर्व शपथ वैयक्तिकरूपाने हिटलरसाठी होती. एकप्रकारे जर्मन सैन्याला फ्यूहररचे खाजगी हत्यार बनविले गेले. हिंडेनबर्गच्या अंत्यविधीनंतर नाझींनी हिटलरच्या समर्थनार्थ राष्ट्रव्यापी जनमत संग्रह कार्यक्रम हाती घेतला.

हिंडेनबर्गने पपेनमार्फत हिटलरला सोपविलेले मृत्यूपत्र समोर आले. त्यात सम्राटाचे राज्यतंत्र जर्मनीत पुन्हा अमलात आणण्याची सूचना केलेली होती.

हिटलरने जास्त बोंबाबोंब होण्याआधी ते मृत्युपत्र नष्ट करून टाकले. त्याच्याऐवजी एक खोटे मृत्युपत्र तयार करून ते प्रकाशित केले. त्यात हिटलरची खूप प्रशंसा करण्यात आलेली होती.

19 ऑगस्ट 1934 रोजी जर्मनीत मतदान झाले. 95 टक्के! त्यात हिटलरला 3.8 कोटी म्हणजे 90 टक्के मते मिळाली.

दुसऱ्याच दिवशी 20 ऑगस्टला जर्मनीच्या सर्व सरकारी पदाधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे शपथ सक्तीची करण्यात आली-

“मी वचन देतो की, मी जर्मन राज्य आणि जर्मन राज्याच्या प्रजाजनांचे फ्यूहरर अ ॅडॉल्फ हि यांच्याशी एकनिष्ठ आणि आज्ञाकारी राहीन. कायद्याचे पालन/आदर करीन. कर्तव्य प्रामाणिकप पार पाडीन. त्यात कोणतीही कसूर होऊ देणार नाही.”

पूर्ण सत्ता हस्तगत करून हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला.

दोन आठवड्यांनंतर न्यूरेंबगमध्ये नाझींची प्रचंड रॅली निघाली. हिटलरने एक उदयोन्मुख फिल्म निर्देशक लेनी राइफेंस्टॉलला बोलवले. पूर्ण आठवडाभर चालणाऱ्या न्यूरेंबर्ग रॅलीची फिल्म बनवून घेतली. तिला शीर्षक दिले -

### इच्छाशक्तीचा विजय

हिटलरच्या बारा वर्षांच्या प्रशासकीय काळात यहुदींना जखडून ठेवण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे एकूण 400 कायदे पास करण्यात आले.

1933 मध्ये जर्मनीत 5,03,000 यहुदींपैकी 70 टक्के बर्लिन, फ्रँकफूर्ट, ब्रेसनाक इत्यादी मोठ्या शहरांत राहत असत. त्यातील बऱ्याच यहुदी तरुणांनी गैरयहुदी परिवारात विवाह केले होते. जर्मनीच्या 5.5 कोटी लोकसंख्येत यहुदी 1 टक्क्यापेक्षाही कमी प्रमाणात होते, तरीही हिटलर त्यांना जर्मनांचा भयानक शत्रू मानायचा. समाजात आर्यवंशच सर्वश्रेष्ठ आहे, असे त्याचे मत होते.

आता निरंकुश सत्ता हातात होती. हिटलरचे संपूर्ण लक्ष राजनैतिक कामकाज आणि सैन्यशक्तीचे सबलीकरण याकडे लागले. कारण त्याला जर्मन साम्राज्याचा विस्तार करायचा होता.

•••

# विश्वयुद्धाचा बिगुल वाजला

जानेवारी 1936

हिटलरने आपले खरे दात दाखवायला सुरुवात केली. जर्मनीचा एक भाग होता राईन लँड. तो सैन्यविरहित करण्यात आलेला होता. राज्यविस्तार तर हिटलरला करायचाच होता. राईन लँडचा संपूर्ण भागावर कब्जा करण्यासाठी हिटलरने युद्धाचे रणशिंग फुंकले. त्याने आपल्या सैन्याला कुच करण्याचा आदेश दिला.

नाझींनी अचानक धोका देऊन सक्तीने ताब्यात घेतलेला तो पहिला प्रदेश होता.



दक्षिण - पूर्व बहेरियात बर्शतिस्गडेन शहराच्या पहाडावर हिटलरने विश्रांतीस्थळ बांधून ठेवले होते. तेथून आल्प्युस पर्वताची शिखरे आणि खाली खोलच खोल दऱ्याखोऱ्या यांचे मोठे नयनरम्य दृश्य दिसायचे. येथेच बसून हिटलर जर्मनीच्या भवितव्याचा निवांतपणे विचार करायचा आणि अवघडातल्या अवघड समस्येवर तोडगा काढायचा.

आताही त्याने तेच केले.

### 1919 च्या तहाला आव्हान

15 मार्च, 1935 ला त्याने सेनानायकांसह बर्लिनमध्ये बैठक बोलावून जाहीर केले -

“व्हर्सायच्या तहानुसार जर्मनीवर सैनिकांच्या संख्येच्या मर्यादेबाबत जे बंधन लादण्यात आले आहे, ते आपण झुगारून देत आहोत. आम्ही आमची सैन्यशक्ती आणि शस्त्रास्त्र भांडार यात भरपूर वृद्धी करणार आहोत...”

सभागृहात उपस्थितांपैकी कोणीही यावर हरकत घेतली नाही किंवा चिंता व्यक्त केली नाही.

गोबेल्सने पत्रकार परिषद बोलावून जाहीर केले -

‘फ्यूहररने निर्णय घेतला आहे की, जर्मन सैन्यात नवीन भरती करून वाढ केली जाणार आहे. नव्या सैन्याचे 36 विभाग असतील. सैनिक संख्या असेल 5,50,000.’

प्रथम विश्वयुद्धात (1919) पराजित झालेल्या जर्मनीविरुद्ध दोस्तराष्ट्रांनी व्हर्सायचा जो तह केला होता, त्यातील पाचव्या भागाचे फ्रान्स आणि इंग्लंडच्या नाकावर टिचून केलेले हे उघड उघड उल्लंघन होते.

फ्रान्स आणि इंग्लंडचे काही आंतरिक प्रश्न होते. काही अडचणी होत्या. हिटलरने बरोबर वेळ साधली. त्याने बिनदिक्कत व्हर्सायच्या तहातील अटींना हरताळ फासण्याचा उद्योग सुरू केला. आपल्या निर्णयाविरुद्ध एखादा देश सैनिकी कारवाई करील अशी भीती त्याला अजिबात वाटली नाही.

## धूर्त राजकारण

21 मेला बर्लिनमध्ये विरोधकांच्या जखमांवर मलम लावण्यासाठी हिटलर जर्मन संसदेसमोर हजर झाला. त्याने एक नाटकीय भाषण ठोकले-

“जर्मनीला शांतता हवी आहे. आमच्यातून कोणीही कोणालाही धमकावू इच्छित नाही...”

यानंतर त्याने एक तेरासूत्री शांती कार्यक्रम वाचून दाखवला. त्यात सर्वच प्रकारची प्रलोभने देण्याचा वायदा केलेला होता. उदाहरणार्थ,

• जर्मनी व्हर्सायच्या तहातील इतर सर्व अटींचा आवर्जून मान करील. राइनलँडमधून सैन्य माघारी बोलावून घेतले जाईल.

• युरोपात शांतता रक्षणासाठी निर्माण होणाऱ्या सामुदायिक व्यवस्थेत जर्मनी सहभागी होईल.

• आपल्या शेजारी देशांशी अनाक्रमण करार करण्यास जर्मनी प्राधान्य देईल.

बहुतेक कारस्थानी घोषणा हिटलर शनिवारी करायचा.

हिटलरच्या कृतीत आणि उक्तीत नेहमीच तफावत असे.

शनिवार, 7 मार्च 1936 रोजी सकाळी जर्मन सेनेच्या 3 बटालियन र्‍हाईन नदीवरचे पूल ओलांडून औद्योगिक केंद्र राइनलँडमध्ये घुसल्या.

या सैन्यविरहित क्षेत्रात राईनच्या पश्चिमेपासून फ्रान्सच्या हद्दीपर्यंतचा भाग तसेच पूर्वेकडील कोलोज, डसेलडोर्फ आणि बॉन या शहरांचा समावेश होता.

सकाळी 10 वाजता हिटलरचा परराष्ट्रमंत्री कांस्तेंतीन वॉन न्यूरथ याने फ्रान्स, ब्रिटन आणि इटलीच्या राजदूतांना बोलावून घेतले. अत्यंत सौम्य आणि सभ्य भाषेत तो त्यांना म्हणाला,

“राईनलँडचा सैन्यविरहित भूभाग जर्मन साम्राज्यात पूर्णपणे विलीन करण्यात येत आहे...”

व्हर्साय तहाचे हे एक आणखी उल्लंघन होते.

राईनलँडच्या सैनिकांना ताकीद दिलेली होती की, फ्रान्सचे सैन्य विरोधासाठी उतरल्यास र्‍हाईन नदीवरचा पूल ओलांडून त्वरित परत यावे. कारण व्हर्साय तहानुसार त्या भागाचे संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटन आणि फ्रान्स या दोघांची होती.

29 मार्चला राष्ट्रव्यापी जनमत अजमावले गेले. 99 टक्के मतदारांनी मतदान केले. राईनलँडवरील हिटलरच्या आक्रमणाला 98.8 टक्के जनतेने पाठिंबा दिला.

जर्मनीत आगामी ग्रीष्मऋतूत व्हावयाच्या ऑलिंपिक खेळांची धूमधडाक्यात तयारी सुरू होती. हिटलरला त्यात मुळीच स्वारस्य नव्हते. प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्सने हिटलरची मनधरणी केली.

नाझी प्रशासनाने विविध खेळांच्या स्पर्धांसाठी 325 एकर जमिनीवर 1,10,000 प्रेक्षक बसू शकतील असे भव्य स्टेडियम तयार केले. हिटलर आणि इतर

उच्चपदस्थांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. तो संपूर्ण कार्यक्रम अत्यंत भव्यदिव्य स्वरूपात पार पडला; पण हिटलरने या कार्यक्रमाचे नियोजन केवळ आपल्याबद्दलचे मत चांगले व्हावे म्हणून केले.

समज आल्यापासून स्वत:हून प्रत्यक्ष मृत्यूला कवटाळेपर्यंत अॅडॉल्फ हिटलरचे दोनच मुख्य उद्देश होते -

• जर्मन लोकांच्या उपजीविकोपार्जनासाठी जबरदस्तीने साधन प्राप्त करणे.

• यहुदींविरुद्ध अत्यंत घृणा बाळगणे.

म्हणूनच त्याने मोठ्या प्रमाणावर सैन्य भरती सुरू केली. त्याने अत्यंत गतीने सैन्याचे आधुनिकीकरण करण्यास प्रारंभ केला. ब्रिटनसोबत नौसेना आणि पाणबुड्यांबाबत करार केला. वरकरणी कितीही खोटी आश्वासने देत असला तरीही हिटलरच्या मनात भयानक वादळ थैमान घालीत असायचे. त्याचे बोलणे ऐकून कोणाचाही त्याच्यावर पटकन विश्वास बसायचा. मात्र त्याच्या जिभेवर साखर तर पोटात विष असायचे. वर वर तो एखाद्या धूर्त कोल्ह्याप्रमाणे शांतिपाठ आळवत राहायचा.

## सत्तापिपासूचे वर्चस्व

5 नोव्हेंबर 1937 रोजी दुपारी 4.15 वाजता बर्लिनच्या जर्मन साम्राज्याच्या चान्सलरी भवनात हिटलरने जर्मन सैन्याच्या उच्चपदस्थांची बैठक बोलावली. त्या बैठकीत त्याने मनातली खळबळ जाहीर केली - तत्पूर्वी सर्व उपस्थितांना गोपनीयतेची शपथ दिली गेली -

“डाव्या राष्ट्रांचा बळी घेऊन जर्मन साम्राज्याचा विस्तार करायचा आहे...”

बैठकीच्या थोडेसे आधी पोलंडच्या राजदूताबरोबर सही केलेल्या करारात आश्वासन दिले होते -

“जर्मनी पोलंडच्या सरहद्दीचा नेहमी आदर करील.”

हिटलरने Living Space ची खालीलप्रमाणे व्याख्या केली. Living Space म्हणजे उपजीविकोपार्जनच्या साधन प्राप्तीच्या हेतूने जबरदस्ती प्रदेश ताब्यात घेणे किंवा क्षेत्र विस्तार करणे. त्याने आपले म्हणणे अधिक स्पष्ट करताना सांगितले -

“जर्मनीच्या जनतेला इतर देशांतील लोकांपेक्षा जीवननिर्वाहासाठी अधिक जागा मिळाली पाहिजे. युद्धातील दोन विरोधक ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या डोळ्यांत आमचा महान देश जर्मनी एखाद्या काट्यासारखा खुपत असतो. जर्मनीचे प्रश्न बळाचा वापर केल्यानेच सुटू शकतील.”

1943 ते 1945 या काळातच जबरदस्ती भूमी अधिग्रहणाचा कार्यक्रम पार पडला पाहिजे, असे हिटलरचे मत होते. रशियाचा भूभाग ताब्यात घेऊन पूर्वेला मुसंडी मारण्याचा त्याचा हेतू होता; परंतु पूर्व आणि दक्षिणेच्या तटवर्ती भागांचे संरक्षण व्हावे म्हणून ऑस्ट्रिया आणि झेकोस्लोव्हाकियावर ताबा असणे आवश्यक होते.

आपली (जर्मनीची) सैन्यशक्ती ब्रिटन आणि फ्रान्सपेक्षा जास्त होईपर्यंत संयम बाळगायला हवा होता. साधारणपणे 1943 पर्यंत काही करता येणार नव्हते. फ्रान्सची

शक्ती गृहयुद्धात कमजोर होताच तो झेकास्लोव्हाकियावर आक्रमण करणार होता.

पहिल्या विश्वयुद्धातील सुप्रसिद्ध सेनानायक तथा एकेकाळचा नाझी समर्थक एरिक ल्युडेंडार्फ डिसेंबर 1937 मध्ये मरण पावला. हिटलर त्याच्या अंत्ययात्रेत सामील झाला; पण त्याच्या मनात मृतकाबद्दल सुप्त घृणा होती. राष्ट्रपती पॉल वॉन हिंडेनबर्गने हिटलरला चान्सलर नियुक्त केले तेव्हा एरिक ल्युडेंडॉर्फने राष्ट्रपतीला तार पाठवून कळविले होते -

"आपण पवित्र जर्मन मातृभूमी आतापर्यंतच्या सर्वांत मोठ्या बाजारू नेत्यांच्या, लोकांच्या भावना भाषणातील शब्दफेकीमुळे उद्दीपित करण्यात प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीच्या हातात सोपवून दिली आहे. मी आपल्याला खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, हा दुष्ट माणूस आमच्या जर्मन साम्राज्याला खड्ड्यात ढकलल्याशिवाय राहणार नाही. त्याच्यापायी आमच्या देशाला भयानक आपत्तीला तोंड द्यावे लागेल."

ल्युडेंडॉर्फ आणि इतर सेनानायकांनी प्रशियाच्या संपन्न आणि कुलीन परिवारात जन्म घेतला होता, ज्यांचा सैनिकी परंपरांशी अनेक पिढ्यांपासूनचा संबंध होता. ते वरकरणी विरोध करीत नसले तरी हिटलरची रक्तपिपासू धोरणे आणि विचार यांचा त्यांना मनापासून तिटकारा होता. हिटलर स्वत: ही गोष्ट ओळखून होता. तरीही ते त्याच्या कामाचे असेपर्यंत त्यांचा आंतरिक तिरस्कार सहन करण्याची त्याची तयारी होती.

राईनलँड कारवाईप्रसंगी या लोकांनी फ्रान्सच्या हल्ल्याच्या भीतीने जर्मन सैन्याला मागे बोलावून घेण्याचा आग्रह केला होता. कारण बहुतेकांना द्वितीय युरोपीय विश्वयुद्धाची आणि त्याच्या परिणामांची भीती वाटत होती.

एक हिटलरच अशी व्यक्ती होती ज्याला कोणत्याच दुष्परिणामांची पर्वा नव्हती. त्याच्या मनात एकदा जो विचार यायचा तो पूर्ण करणे ही त्याची जिद्द असायची. कोणी कितीही विरोध केला तरीही काहीच उपयोग होत नसे.

## हायकमांड

राष्ट्रपती हिंडेनबर्गच्या काळापासून दोन उच्चपदस्थ अधिकारी खुर्च्या दाबून बसले होते. जर्मन सशस्त्र सेनेचा प्रमुख सेनापती अर्थात कमांडर - इन - चीफ फिल्ड मार्शल वेर्नर वॉन ब्लॉम्बर्ग आणि कमांडर-इन-चीफ जनरल वेर्नर वॉन फ्रिट्श अशी त्यांची नावे होती.

आपल्याला कोणी हलवू शकत नाही, अशी त्यांना घमेंड होती. ते उर्मटपणे वागत.

हिटलरचे त्यांच्याकडे लक्ष होते. तो फक्त योग्य वेळ येण्याची वाट पाहत होता. ती वेळ येताच हिटलरने आधी ब्लॉम्बर्गला पदच्युत केले. हिटलरने त्याला खोटे आश्वासन दिले -

"सध्या जर्मनीत जरा गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. वातावरण बदलले म्हणजे तुम्हाला परत बोलावून घेतले जाईल..."

हिटलरचे बरेचसे डावपेच बुद्धिवंतांना एव्हाना समजू लागले होते. मात्र तोंडाला लावलेले कुलूप चुकून उघडले तर डोळे कायमचे बंद होण्याची भीती.

आपल्याला आता पुन्हा परत बोलावले जाणार नाही, हे ब्लॉम्बर्गला माहीत होते. तो इटलीला निघून गेला, न परतण्यासाठी. हिटलरनेही त्याला कधीच बोलावले नाही.

आता नंबर होता जनरल फ्रिट्शचा!

हिमलर आणि हेड्रिकला 1935 मध्ये फ्रिट्शच्या विरोधात जेस्टेपोने तयार केलेली एक गुप्त फाईल मिळाली. ती त्यांनी गोरिंगला सोपवली. गोरिंगने हिटलरच्या हाती सोपवली. फ्रिट्शच्या एका अनैसर्गिक कृत्याचा त्यात उल्लेख केलेला होता. हिटलरने संपूर्ण फाईल वाचून घेतली. फ्रिट्शला आदेश मिळाला,

''फ्यूहररने तुम्हाला संध्याकाळी चान्सलरच्या कार्यालयात बोलावले आहे...''

वेळ सांगितली गेली. फक्त ऐकायचे. आदेशाचे पालन करायचे. हे तर आधीच ठरलेले की प्रश्न विचारायचा नाही.

संध्याकाळ झाली. धडधडत्या हृदयाने फ्रिट्श चान्सलरीत पोहोचला. हिटलरशिवाय तेथे आणखी दोन व्यक्ती आधीपासूनच उपस्थित होत्या - हिमलर आणि गोरिंग!

फ्रिट्शने हिंमत केली. हिटलरने त्याला त्याच्या विरुद्धचे आरोपपत्र वाचून दाखवले. त्यावर फ्रिट्शने राजीनामा द्यावा, असे सुचविले. त्याने त्याच्यावरील आरोप ठामपणे फेटाळले. राजीनामा देण्यासाठी त्याने स्पष्टपणे नकार दिला. शेवटी हिटलरने त्याला सक्तीने अनिश्चित कालावधीसाठी रजेवर पाठवून दिले. यानंतर हिटलरने जर्मनीच्या जनतेची दिशाभूल व्हावी आणि स्वत:वर काहीही येऊ नये म्हणून घोषित केले,

''ब्लॉम्बर्ग आणि फ्रिट्श दोघांवर बराच ताण पडल्याने त्यांची प्रकृती नाजूक-साजूक झाली आहे व त्यांनी त्याच्या पदांचे राजीनामे मोठ्या कष्टाने सादर केले असून आपणही दु:खाने ते स्वीकारत आहोत...''

बर्लिनमध्ये अफवांचे पेव फुटले. 30 जानेवारीला विरोधाचा स्फोट होण्याचे गृहीत धरले गेले. मात्र प्रत्यक्षात तसे काहीच घडले नाही. 4 फेब्रुवारी 1938 ला हिटलरने मंत्रिमंडळाची बैठक बोलाविली. सर्व संमतीने हिटलरने खालील आदेश जारी केला -

**''मी या क्षणापासून संपूर्ण सशस्त्र सैन्य दलाचे सूत्रसंचलन स्वत:च्या ताब्यात घेत अ**

हिटलरने पूर्ण युद्ध मंत्रालय नष्ट करून नवीन सर्वोच्च सत्ता प्रस्थापित केली आणि स्वत:ला 'हायकमांड' म्हणून घोषित केले. त्याअंतर्गत पायदळ, नाविकदळ आणि वायुदळ यावर हायकमांडचे पूर्ण नियंत्रण होते. या व्यवस्थेचा अध्यक्ष या नात्याने हिटलर सर्वांच्या वर आणि प्रमुख होता. त्याने चीफ ऑफ स्टाफच्या पदावर जनरल काईटेलची नियुक्ती केली. फ्रिट्शच्या जागेवर आर्मी कमांडर म्हणून जनरल वॉल्टर वॉन ब्राडकिट्शची नियुक्ती केली.

गोरिंगला पदोन्नती देण्यात आली. त्याचा नवीन हुद्दा होता फिल्ड मार्शल.

इतर 16 वरिष्ठ सेनापतींनाही नोकरीवरून हाकलण्यात आले. त्यात रंडस्टेड, वॉन क्लूज, वॉन क्लेस्टसहित इतर नावाजलेल्या सेनापतींचा समावेश होता.

अननुभवी ऑस्ट्रियायी नागरिक-हिटलरवर जर्मन सैनिक अधिकाऱ्यांचा विश्वास नव्हता; परंतु विरोध प्रकट करण्याची कोणातच क्षमता नव्हती.

हिटलरचाही आपल्या सेनापतींवर विश्वास नव्हता. काईटेलसारखे दबून राहणारे

चापलुसीखोर लोक त्याला फार आवडत. तेही सदैव त्याच्या अवतीभोवतीच पिंगा घालीत असत.

•••

# दबावतंत्र

1938 च्या वसंत ऋतूत राष्ट्रपती हिंडेनबर्गच्या काळात नियुक्त केल्या गेलेल्या सैन्याधिकाऱ्यांना हिटलरने काढून टाकले. त्यात अनेक मंत्री आणि राजदूतांवर गंडांतर आले. जर्मन राष्ट्र आणि संपूर्ण सशस्त्र सैनिक दले हिटलरच्या मुठीत होती.

हिटलरने विचारपूर्वक ठरविलेल्या योजनेनुसार आक्रमणाचा पहिला शिकार ऑस्ट्रिया होता. कोणालाच कल्पना नव्हती की, ऑस्ट्रियाविरुद्धची ही कारवाई दुसऱ्या विश्वयुद्धाकडे टाकलेले पहिले पाऊल ठरेल; पण ती एक म्हण आहे ना,

जे घडणार आहे ते कुणीही टाळू शकत नाही.

हिटलरने जर्मन साम्राज्याचा विस्तार करण्याच्या हेतूने डाकू - लुटारूसारखा मार्ग हाताळला. निरनिराळ्या युरोपियन नेत्यांना त्याने फसविले. काहींना उघड उघड धमकावले. कधीच खरे बोलला नाही. सदैव खोटे बोलत राहिला.

त्याचा सर्वप्रथम बळी होता ऑस्ट्रियाचा चान्सलर डॉ. कुर्त वॉन स्कुशनिग. ऑस्ट्रियात अंतर्गत फूट पाडण्याचे काम नाझी करीतच होते. स्कुशनिगने बर्शतिस्गडेनमध्ये हिटलरशी शांतिवार्ता करण्याचे ठरविले. बैठकीची व्यवस्था ऑस्ट्रियाचा माजी राजदूत फ्रान्स वॉन पपेनने केली.
12 फेब्रुवारी, 1938 रोजी कडाक्याच्या थंडीत सकाळी ही भेट झाली. भेटीप्रसंगी जर्मन सैन्याचे तिन्ही जनरलही हजर होते.

हिटलर स्कुशनिगला बंगल्याच्या मजल्यावरील एका सुसज्जित मोठ्या हॉलमध्ये घेऊन गेला. तेथून एका बाजूस पर्वताचे हिरव्यागार शिखरांचे सुंदर दृश्य दिसत होते. दुसरीकडे दूर अंतरावर दिसत होता ऑस्ट्रिया. हिटलर स्कुशनिगला नकळत त्याच्या चेहऱ्यावरचे भाव टिपत होता. त्याला खूश करण्यासाठी म्हणा की अंत:प्रेरणेने म्हणा, स्कुशनिग अचानक उद्गारला,

"किती सुंदरऽऽ!"

हिटलरला काही ते आवडले नाही. बेपर्वाईने आणि विक्षिप्त आवाजात तो ताडकन म्हणाला,

"चान्सलर ऑफ ऑस्ट्रिया! आम्ही येथे सुंदर दृश्ये पाहण्यासाठी आणि वातावरणाचे कौतुक करण्यासाठी - गोडवे गाण्यासाठी एकत्र आलेलो नाही..."

दोन तास! हिटलर विनाकारण आडवेतिडवे ऐकवत राहिला. स्कुशनिग शांत बसून ऐकत होता. बरीच खरीखोटी ऐकवल्यावर चिडचिड करीत हिटलर म्हणाला,

"जर्मन साम्राज्य एक महान शक्ती आहे. जर्मनी आपला सीमा तंटा सोडविण्यासाठी काही हालचाल करणार असेल तर कोणीही त्याविरुद्ध अकांडतांडव करण्याची हिंमत करू नये..."

स्कुशनिगने हिटलरला शांत करण्याचा प्रयत्न केला; पण त्याला तर निमित्त पाहिजे होते. बहाणा हवा होता. शांत होण्याऐवजी तो जास्तच चिडला. त्याने स्कुशनिगला दम दिला :

"मी हुकूम दिला तर अर्ध्या तासात सर्व होत्याचे नव्हते करू शकतो."

"शेवटी आपले म्हणणे आणि अटी आहेत तरी काय?"

त्रासलेल्या स्कुशनिगने विचारले. त्यावर

"आपण दुपारनंतर विचार करू..." हिटलर म्हणाला.

### दहशतीचा विजय

दुपारनंतर 41 वर्षांच्या स्कुशनिगची आणि जर्मनीचा नवनियुक्त परराष्ट्रमंत्री जोशिम रिबेनट्रॉप यांची भेट घडविण्यात आली. त्याने हिटलरच्या मागण्यांचा एक दोन पानी करारनामा स्कुशनिगला सोपवला. त्यातील अटींचा संक्षिप्त मथितार्थ खालीलप्रमाणे होता -

• ऑस्ट्रियाच्या जेलमधील सर्व नाझींची विनाअट सुटका

• ऑस्ट्रियाई नाझी पार्टीवर घातलेले निर्बंध दूर करणे

• नाझी समर्थक वकील डॉ. आर्थर सेयस इंक्वार्टला नवा राज्यमंत्री बनवून पोलिसांचे संपूर्ण नियंत्रण त्याच्यावर सोपवणे.

• युद्धमंत्री आणि अर्थमंत्रीपदांवर नाझी व्यक्तींची नियुक्ती

• ऑस्ट्रियाची पूर्ण अर्थव्यवस्था जर्मन साम्राज्यात विलीनीकरणाची तयारी करणे.

यावर कोणत्याही तऱ्हेची चर्चा न करता ऑस्ट्रियाचा राष्ट्रपती विल्यम मिक्लम्स याची तीन दिवसांच्या आत सही झाली पाहिजे, अन्यथा जर्मन सेना ऑस्ट्रियावर आक्रमण करील.

जनरल काईटेलाही या बनवाबनवीत सामील केले गेले.

स्कुशनिग बर्शतिस्गाडेनहून परत फिरला. पपेनही त्याच्या बरोबर होता.

बहुतेक राज्यांच्या राजनैतिक नेत्यांना ही दबावतंत्राची (दादागिरीची) भाषा ऐकायला मिळाली. 'हिटलर' नावाची सर्वत्र दहशत निर्माण झाली. पहिल्या विश्वयुद्धाच्या जखमांची खपलीही अद्याप कोरडी झाली नव्हती.

हिटलरला जे पाहिजे असायचे त्याच्यासाठी काहीही करण्यात त्याला अजिबात वाईट वाटत नसे.

हिटलरच्या जर्मनीने युद्धाची तयारी चालवली होती. रात्रंदिवस नवनवीन हत्यारांची निर्मिती सुरू होती. गोरिंगच्या चारवर्षीय योजनेनुसार कारवाई अमलात आणण्याचे चालले होते. युवक सहायक सेना संघटनेतहत युवकांना पोलाद बनविले जात होते. त्याच्या दृष्टीत हिटलर देवतुल्य ठरला होता. तो कर्तव्य आणि बलिदानाला सर्वोच्च महत्त्व द्यायचा.

तिकडे ऑस्ट्रियन राष्ट्रपती मिक्लम्सने बहुतेक मागण्या अमान्य केल्या. हिटलरलाही लगेचच युद्ध नको होते. फक्त युद्धाचा आभास निर्माण करायचा होता. त्याने जर्मन सेनेचा जनरल काईटेलला बोलावून आदेश दिला,

"जनरल! तुमचे सैन्य ऑस्ट्रियाच्या सीमेवर घ्या. तेथे लढाईच्या कवायती सुरू करा.

आदेश मिळेपर्यंत प्रत्यक्ष युद्ध सुरू करायची आगळीक करायची नाही.''

काईटेलने त्वरित अंमलबजावणी केली. हिटलरची चाल यशस्वी ठरली. मिक्लम्सने पुढील अनर्थ टाळण्याच्या उद्देशाने हिटलरने करारनाम्यात घातलेल्या सर्व अटी स्वीकृत केल्या.

20 फेब्रुवारीला रात्री हिटलरने बर्लिनमध्ये एक भाषण दिले. संपूर्ण ऑस्ट्रियातही रेडिओवर त्याचे प्रसारण करण्यात आले. त्यानंतर चान्सलर स्कुशनिगने व्हिएन्नात हिटलरच्या भाषणाच्या उत्तरात जाहीरपणे सांगितले,

''ऑस्ट्रियाने आतापर्यंत नाझींच्या बाबतीत खूप उदार धोरण अवलंबिले आहे. मात्र कोणत्याही किमतीवर ऑस्ट्रिया आपल्या सार्वभौमत्वाचा आणि स्वातंत्र्याचा बळी देणार नाही. बस! आतापर्यंत जे झाले ते झाले! यापुढे आणखी सहन केले जाणार नाही...''

परंतु नाझींची हिंमत वाढली होती. त्यांनी ऑस्ट्रियाचा ध्वज पोलिसांसमोर फाडून जर्मनीचा ध्वज फडकावला.

## ऑस्ट्रियाचे विलीनीकरण

वाढलेल्या राजकीय अशांतीमुळे आर्थिक खळबळ माजली.

स्कुशनिगने एक डाव टाकला. त्याने घोषणा केली,



''ऑस्ट्रियाला जर्मनीपासून स्वतंत्र ठेवायचे की नाही, याचा निर्णय घेण्यासाठी 13 मार्चला एक राष्ट्रीय सर्वेक्षण घेतले जाईल.''

हिटलरला हे माहीत होताच तो संतापाने लालीलाल झाला. त्याच्या तळपायाची आग मस्तकात जाऊन भिडली. हे मतदान उधळून लावण्यासाठी त्याने सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला. जनरल काईटेल आणि जनरल मेस्टाईन यांनी ऑस्ट्रियावर हल्ला करण्याची तातडीने व्यवस्था केली.

यात एक अडचण होती - इटलीचा शक्तिशाली फॅसिस्ट नेता बेनिटो मुसोलिनी! हिटलरने त्याच्या स्वभावाला आणि वृत्तीला अनुसरून ऑस्ट्रियाविरुद्ध खोटया तक्रारींचे पत्र पाठवून बेनिटो मुसोलिनीची ऑस्ट्रियावरील हल्ल्याला सहमती घेऊन टाकली.

11 मार्चच्या सकाळपर्यंत या हालचालींची खबर चान्सलर स्कुशनिगला मिळाली. तेव्हा त्याने दुपारी 2.00 वाजता व्हिएन्नात असलेल्या रोईस इंक्वार्टला फोन करून सांगितले की, पुढील संकट टाळण्यासाठी 13 तारखेचे जनमत सर्वेक्षण रद्द करण्यात येत आहे.

गोरिंगने आधी स्कुशनिगला राजीनामा देण्यास भाग पाडले. नंतर त्याने सेईसला ऑस्ट्रियाचा नवा चान्सलर नियुक्त करण्याबाबत राष्ट्रपती मिक्लासवर दबाव

आणून पाहिला. सैनिकी कारवाईचा धाक दाखवला. मिक्लासने ती मागणी धुडकावून लावली.

हिटलरच्या चिडण्याची परिसीमा झाली. रात्री 8.45 वाजता त्याने सैन्याच्या जनरल्सना बोलावून दुसऱ्या दिवशी सकाळीच आक्रमण सुरू करण्याचा आदेश दिला. मुसोलिनीने टेलिफोनवर सांगितले,

"इटलीच्या हुकूमशहासाठी ऑस्ट्रिया महत्त्वहीन विषय आहे. नाझी आक्रमणात इटली हस्तक्षेप करणार नाही..."

मध्यरात्रीच्या सुमारास ऑस्ट्रियाचा राष्ट्रपती मिक्लास याला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. तो सेड्सची ऑस्ट्रियाचा नवा चान्सलर म्हणून नियुक्ती करण्यास तयार झाला.

शनिवार, दिनांक 12 मार्च 1938, वेळ सकाळची.

जर्मन सैन्याची ऑस्ट्रिया सीमेवर गस्त सुरू झाली. ब्रिटन आणि फ्रान्सनेही या आक्रमणाची दखल घेतली नाही.

इंग्लंडचा प्रधानमंत्री नेविल चेंबरलेन शांतीचा पुरस्कर्ता होता. त्याने आपले धोरण आधीच जाहीर केले होते.

## नियतीची करामत

ऑस्ट्रियात हिटलरच्या सैन्याचे शानदार स्वागत झाले.

हिटलर आपले जन्मस्थान ब्राउनाड एमइन आणि लिंजला गेला. तो तेथील एका शाळेचा विद्यार्थी होता. लियोडिंगमध्ये त्याच्या माता-पित्याची समाधी होती. तेथे दर्शनाला जाऊन त्याने समाधीवर फुले वाहिली.

रविवार, 13 मार्च 1938 ला एका कायद्याने ऑस्ट्रियाचे स्वतंत्र अस्तित्व समाप्त करण्यात आले. या कायद्याने त्याचे जर्मनीत विलीनीकरण करण्यात आले. आता ऑस्ट्रिया जर्मन साम्राज्याचा केवळ एक प्रांत झाला.

सोमवारी दुपारनंतर हिटलरने मोठ्या रुबाबात व्हिएन्ना शहरात प्रवेश केला. हे तेच शहर होते ज्याच्या सडकांवर एकेकाळी तो अनाथासारखा वणवण भटकत राहिला होता. त्याची थांबण्याची व्यवस्था सर्वांत भव्यदिव्य इंपिरियल हॉटेलमध्ये करण्यात आली.

हॉटेलमध्ये प्रवेश करताना त्याला त्याचा भूतकाळ आठवला. याच हॉटेलात अर्धपोटी उपाशी राहून सामान्य मजुराप्रमाणे मेहनत करून आपण कष्टात दिवस घालवले होते. हॉटेलच्या दरवाजासमोर सतत पडणारा बर्फ हटविण्याचे काम तो करायचा. येणाऱ्या-जाणाऱ्यांपुढे डोक्यावरची हॅट अर्धवट उचलून कमरेत वाकून चार्ली चापलीनप्रमाणे अभिवादन करावे लागे...

आणि आज!

किती विचित्र योगायोग होता! आज त्याच हॉटेलात तो मालकापेक्षाही जास्त सन्मानित होता. त्याच्या प्रत्येक पावलाच्या धक्क्याबरोबर आज इंपिरियल भूकंप झाल्याप्रमाणे हादरत होते.

10 एप्रिलला ऑस्ट्रियाच्या विलीनीकरणाबाबत जनमताचा कौल घेतला गेला. 99 टक्के लोकांनी या कारवाईच्या समर्थनार्थ मतदान केले.

व्हिएन्नात जवळजवळ 1,80,000 यहुदी होते. ऑस्ट्रियाच्या विलीनीकरणानंतर नाझींनी त्यांचा अनन्वित छळ केला.

ऑस्ट्रियाचा भूतपूर्व चान्सलर डॉ. कुर्त वॉन स्कुशनिगला जेस्टेपोने अटक केली. बरीच वर्षे तो नाझी बंदी शिबिरात यातना भोगत होता.

## झेकोस्लोव्हाकिया वर डोळा

झेकोस्लोव्हासीयांचा पश्चिम भाग म्हणजे स्युडेटेलँड. तो आपल्या ताब्यात असावा अशी हिटलरची फार इच्छा होती. म्हणून तो त्या दृष्टीने योजना आखू लागला. कारण त्या भागात 30 लाख जर्मनांचे वास्तव्य होते. वास्तविक भयातुर झेक सरकारला हरमन गोरिंगने एक महिनाआधीच स्पष्ट शब्दांत झेकोस्लोव्हाकियाला आश्वासन दिले होते -

“मी वचन देतो की, झेकोस्लोव्हाकियाला जर्मन साम्राज्यापासून (राईक) कोणताच धोका असणार नाही...”

## उतरणीकडे वाटचाल

हिटलर आपले आई-बाप आणि लहान भावाचा अचानक ओढवलेला मृत्यू कधीच विसरू शकला नाही. फुप्फुसातील रक्तस्रावामुळे एके दिवशी त्याचे वडील खाली कोसळले ते कायमचेच. नंतर छातीच्या कर्करोगाने त्याच्या मातेचा बळी घेतला, तेव्हा तो किशोरावस्थेतच होता.

हिटलर एकांतात एकसारखा विचार करायचा की “मी वृद्ध होणार नाही. तत्पूर्वीच एखादा मोठा असाध्य आजार माझा बळी घेईल.” मनातील या भीतीने तो अस्वस्थ व्हायचा आणि साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी सुरू करायची लढाई लवकरात लवकर आरंभ करून संपविली पाहिजे, असे त्याने मनाशी ठरविले. तेव्हा त्याचे वय होते 49.

त्याने सर्व वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांना बोलावून आदेश दिला,

“1 ऑक्टोबर, 1938 पर्यंत झेकोस्लोव्हाकियावर आक्रमणाची तयारी करा...”

या आदेशाचे पालन करण्यात फार मोठी अडचण होती. झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केल्याने इंग्लंड, फ्रान्स आणि रशियाविरुद्धही युद्धाचा वणवा भडकण्याची निश्चित शक्यता होती. एवढ्या मोठ्या युद्धाला तोंड देण्याची धमक जर्मन सैन्यात त्या वेळेस तरी नव्हती. त्यांच्याजवळ पूर्ण शस्त्रसज्ज केवळ 31 तर रिझर्व्ह फक्त 7 डिव्हिजन सैन्य होते. याच्या उलट एकट्या फ्रान्सचे 100 डिव्हिजनपेक्षा जास्त आणि झेकोस्लोव्हाकियाचे स्वत:चे 45 डिव्हिजन सैन्य होते. झेक - जर्मन सीमेवर फौजेचा सतत जागता पहारा होता.

सैन्य समितीचा सर्वोच्च अधिकारी (चीफ ऑफ जनरल स्टाफ) सुडविग बेकने सर्व वस्तुस्थितीचा सविस्तर अहवाल तयार करून तो प्रमुख सेनापती जनरल वाल्देर वॉन ब्राउचिट्शला सादर केला. त्यावर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेण्यासाठी गुप्त बैठक घेण्याचीही त्या अहवालात सूचना करण्यात आलेली होती.

4 ऑगस्ट, 1938 रोजी प्रत्यक्षात अशी गुप्त बैठक बोलावली गेली. सर्वांसमोर बेकचा अहवाल वाचून दाखवण्यात आला. हा मार्ग म्हणजे

'विनाशकाले विपरीत बुद्धी' असल्याचे सर्वांना समजत होते. मात्र कोणीही उघड विरोध करण्याचे धाडस केले नाही. एकटया बेकने आपल्या पदाचा राजीनामा देऊन टाकला.

हिटलरने बेकच्या जागेवर त्वरित जनरल फ्रांज हाल्दरची नियुक्ती केली. बेकचे राजीनामा प्रकरण दाबून ठेवण्यात आले. मात्र बेक आणि हाल्दर परस्परांबद्दल सहानुभूती बाळगून होते. त्यांनी कारस्थानी लोकांचा एक गट तयार केला. त्यात अनेक जनरल, पूर्व राजनैतिक नेता युलरिच वॉन हसेल, गुप्तचर विभागप्रमुख अॅडमिरल विल्यम कनारिस, बर्लिन पोलीसप्रमुख ग्राफ वॉन हेल्डोर्फ हेही सामील होते. त्या सर्वांनी ठरवून टाकले की, हिटलरने आक्रमणाचा आदेश देताच त्याला अटक करावी. गोरिंग, गोबेल्स, हिमलर अशा महत्त्वाच्या नाझी नेत्यांनाही अटक करावी. हिटलरला विशेष न्यायासनासमोर उभे केले जाईल. जर्मनीला सैनिकी विनाशाकडे ओढून नेत असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला जाईल.

या सगळ्यांनी आपल्या हस्तकांना ब्रिटनचे प्रधानमंत्री नेविल चेंबरलेनकडे पाठवून हिटलरची भावी अवसानघातकी योजना कळवून टाकली. त्याबरोबर हाही निरोप पाठवला की, ते स्वत: हिटलरची सत्ता उलथून पालथी करण्यास उत्सुक आहेत. म्हणून फ्रान्स आणि ब्रिटनने उघडउघड हिटलरविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला पाहिजे, अशी आमची हार्दिक अपेक्षा आहे.

इतर तांत्रिक अडचणींमुळे ही योजना कार्यान्वित होऊ शकली नाही.

हिटलरशिवाय दुसऱ्या कोणाचीही दुसरे महायुद्ध व्हावे अशी इच्छा नव्हती. वीस वर्षांपूर्वी झालेल्या प्रथम महायुद्धाचे दुष्परिणाम अद्याप ताजे होते. ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीची तत्कालीन तरुण पिढी त्या युद्धात कामाला आली होती.

पश्चिमेच्या मित्रदेशांनी प्राचीन होप्सबर्ग साम्राज्याच्या अवशेषांची जुळवणी करून झेकोस्लोव्हाकिया गणराज्याची निर्मिती केली होती. त्यात विविध जाती-धर्माच्या लोकांचा भरणा होता. जसे झेक, स्लोवाक, हंगेरियन आणि 30 लाखांपेक्षा जास्त जर्मन जे पश्चिम भागात वसले होते. या भागाला स्युडेटिनलँड म्हटले जाई.

ते क्षेत्र आता तीन दिशांनी हिटलरच्या सैन्याने वेढले होते. त्या क्षेत्रात कोनराड हेनलाइनच्या नेतृत्वाखाली नाझी समर्थक एक शक्तिशाली संघटन कार्यान्वित होते. त्यांचा सरळ बर्लिनशी संबंध होता.

### साम, दाम, दंड, भेद

ऑस्ट्रियाच्या विलीनीकरणानंतर 28 मार्च 1938 रोजी कोनराड हेनलाइन बर्लिनला आला. त्याने हिटलरची भेट घेतली. हिटलरने त्याला झेकोस्लोव्हाकियात सतत गोंधळ माजवित राहण्याचा आदेश दिला.

1938 मध्ये नाझींनी राजकीय आणि सामाजिक अशांतीचे वातावरण निर्माण करून ठेवले. झेक सरकारवर खोटा आरोप करण्यात आला की, स्युडेटिनमधील जर्मनांना झेक सरकार आणि तेथील इतर नागरिक त्रास देत आहेत. अशा अफवा पसरविण्यात

जर्मनीचा प्रचारमंत्री गोबेल्सचा हातखंडा होता. तो मुळातच अत्यंत लबाड व्यक्ती होता.

हिटलरच्या विध्वंसक हालचाली पाहून ब्रिटिश पंतप्रधान चेंबरलेनने त्याला चर्चेसाठी तार पाठवली. 15 सप्टेंबर 1938 च्या सकाळी 69 वर्षीय चेंबरलेन विमानाने बर्शतिस्गडेन पोहोचला. हिटलरची आणि त्याची पहिलीच भेट! त्याचा कोणत्याही प्रकारे अपमान न होऊ देण्याचा हिटलरने मनोमनी निश्चय केला होता.

स्युडेटिनमधील जर्मनांवर होणाऱ्या नि:खळ काल्पनिक आणि खोटया अत्याचाराचे तुणतुणे वाजवून चेंबरलेनला आधी मानसिक गोंधळात टाकले. नंतर त्याच्या अस्वस्थतेचा फायदा उचलण्यासाठी सरळ प्रश्न विचारला,

‘‘स्युडेटिनलँड जर्मनीला सरळ कधीच मिळणार नाही का?’’

मोठा गुंतागुंतीचा आणि पेचात टाकणारा प्रश्न! निरुत्तर करणारादेखील. ब्रिटिश पंतप्रधानपद सांभाळणे म्हणजे का ऐऱ्यागैऱ्याचे काम? हिटलरच्या प्रश्नावर तो मुत्सद्दी पंतप्रधान म्हणाला,

‘‘यावर विचार करता येऊ शकेल…’’

उभयतांच्या या भेटीत असेही ठरले की, दोघांची पुन्हा भेट होईपर्यंत हिटलरने कोणतीच लष्करी कारवाई करू नये. वेळ निभावून नेण्यासाठी हिटलरने यात सहमती दर्शविली; परंतु चेंबरलेन परत फिरताच त्याने युद्धासंबंधीची आपली योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पुढील तयारी सुरूच ठेवली.

स्युडेटिनलँड सत्तांतराबाबत ब्रिटन आणि फ्रान्स सहमत झाले.

‘हलवायाच्या घरावर तुळशीपत्र..!’ असलाच तो प्रकार. सर्व परस्पर चालले होते. कोणालाच प्रत्यक्ष झळ सहन करावी लागणार नव्हती; परंतु एवढ्यावरच हे थांबणार नव्हते. हिटलरला खुमखुमी होती. त्याला फक्त युद्ध पाहिजे होते. त्यासाठी तो कोणतेही नाटक वठवण्यास तयार होता.

नाझींनी लपूनछपून पोलंड आणि हंगेरीच्या प्रतिनिधींची भेट घेतली. त्यात ठरले की, जर्मनीला झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण करून त्याचे तुकडे करू द्यावेत. एकेका तुकड्याची आपसात वाटणी व विभागणी करून घ्यावी.

ब्रिटन आणि फ्रान्सचे एकमत झाल्यावर 19 सप्टेंबरला त्यांच्या राजदूतांनी प्रागमध्ये झेक सरकारच्या प्रतिनिधीला निर्भीडपणे कठोर शब्दांत सुनावले -

‘‘ज्या क्षेत्रात शेकडा 50 टक्क्यांपेक्षा जास्त जर्मन लोक राहतात, त्यावरचा हक्क सोडून तो भाग जर्मन साम्राज्यात विलीन करून द्यावा..’’

झेक सरकार काय समजायचे ते समजून चुकले.

22 सप्टेंबरला चेंबरलेन हिटलरला भेटण्यासाठी पुन्हा जर्मनीला आला. ही भेट ऱ्हाईन नदीच्या किनारी गोडिस्बर्गच्या एका हॉटेलात ठेवली गेली होती. चेंबरलेनने सांगितले,

‘‘तुम्हाला पाहिजे होता त्या पद्धतीने स्युडेटिलँड शेवटी जर्मनीला मिळाला..’’

या कार्यवाहीने हिटलरचे काही समाधान झाले नाही. आपल्या नेहमीच्या तिरक्या चालीत तो म्हणाला,

“खरे म्हणजे या रिकाम्या उठाठेवीचा आता काहीएक उपयोग नाही. 1 ऑक्टोबरपर्यंत स्युडेटिनलँड जर्मन साम्राज्याच्या सैन्याच्या ताब्यात दिले गेले पाहिजे, तसेच त्या क्षेत्रातील सर्व गैरजर्मन लोकांना हाकलून दिले पाहिजे...”

चेंबरलेन हे ऐकून आश्चर्यचकित झाला. तो हिटलरच्या कपट-कारस्थानाचा बळी ठरला. निराशा घेऊनच तो मायदेशी परतला. फ्यूहररचा अंतिम निर्णय ऐकून फ्रान्सने आपले 100 डिव्हिजन सैन्य एकत्र करून त्याला फ्रान्स-जर्मन सीमेकडे पाठवायला सुरुवात केली. झेक सैन्यात 10 लाख जवान होते. इंग्लंडने आपल्या नाविक दलाला सावध केले. लंडनमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली.

## म्युनिच करार

युरोपात जसजसा युद्धज्वर पसरू लागला, तसतसा जर्मनीत हिटलरविरोधी गटाला जोर चढू लागला. मात्र हे सर्व अत्यंत गुप्तपणे चालले होते.


जर्मनीच्या जनतेचा द्वितीय विश्वयुद्धाला हार्दिक विरोध होता. हिटलरही मनोमन ही गोष्ट समजून चुकला.

साम्राज्याच्या क्षेत्र विस्तारासाठी त्याने सध्या युद्धाचा मार्ग हाताळण्याचे स्थगित केले. मात्र स्युडेटिलँड जर्मनीच्या ताब्यात घेण्याचा हट्ट त्याने कायम ठेवला. त्याने चेंबरलेनला पत्र पाठवून खोटे आश्वासन दिले की, जर्मन सैन्य झेकोस्लोव्हाकियावर कधीच आक्रमण करणार नाही.

चेंबरलेन शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून जिवाचा आटापिटा करीत होता. त्याने हिटलरला तार पाठवून कळविले,

“मी चर्चेसाठी यायला तयार आहे.”

इटालीचा फॅसिस्ट हुकूमशहा बेनिटो मुसोलिनी यालाही तार पाठवून हिटलरसाठी शिष्टाई करण्याची विनंती केली. त्यानंतर मुसोलिनीने हिटलरशी संपर्क साधून जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स आणि इटलीची संयुक्त शिखरवार्ता परिषद म्युनिचमध्ये आयोजित केली.



ही परिषद 29 सप्टेंबर 1938 रोजी एका नवीनच नाझी इमारतीत- फ्यूहरर बारमध्ये घेण्यात आली. ती 30 सप्टेंबरच्या सकाळपर्यंत चालली. त्यात हिटलर, चेंबरलेन, मुसोलिनी आणि फ्रेंच प्रधानमंत्री एडुअर्ड डेलडायर यांनी भाग घेतला.

झेक प्रतिनिधीही उपस्थित होता. मात्र त्याला आत प्रवेश नव्हता किंवा चर्चेत भाग घेण्याचीही परवानगी नव्हती. एखाद्या द्वारपालाप्रमाणे त्याला बाहेर बसवून ठेवले गेले. हिटलर सांगेल तसे त्याच्या लहरीप्रमाणे सर्व चालले होते.

नाझींनी मुसोलिनीकडे पाठविलेल्या ठरावालाच व्यापक दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून चेंबरलेन आणि एड्डुअर्ड डेकडायर यांनी संमती दिली. 30 सप्टेंबरला भल्यापहाटे 1.00 वाजता चारही नेत्यांनी म्युनिच करारावर सह्या केल्या. त्यानुसार 1 ते 10 ऑक्टोबरपर्यंत जर्मन सेना स्युडेटिनलँडला जर्मनीच्या ताब्यात घेऊ शकत होती. झेक सरकारच्या प्रतिनिधीला आत बोलावून हे सर्व सांगितले गेले.

•••

# झेकोस्लोव्हाकियाचा पाडाव

सर्व राजनैतिक मुत्सद्दी आपापल्या देशांत परत फिरले. चेंबरलेनने लंडनला आल्यावर घोषणा केली,

“झेकोस्लोव्हाकियाचा प्रश्न सुटल्याने कदाचित संपूर्ण युरोप शांततेने नांदू शकेल...”

इंग्लंडमध्ये विन्स्टन चर्चिलने या कराराला विरोध केला.

हिटलरला सत्तेवरून हटविण्याची स्वप्ने पाहणाऱ्या सर्व विरोधकांच्या नांग्या ढिल्या झाल्या. त्यांची खात्री झाली की, हिटलरच्या पाठोपाठ संपूर्ण जर्मनी देशासह आपणही रसातळाला जाणार आहोत.

पुन्हा शनिवारच! 1 ऑक्टोबर 1938. ठरलेल्या वेळी जर्मन सेना स्युडेटिनलँडमध्ये प्रवेश करती झाली. भीतिपोटी झेक नागरिकांनी अंगावरील कपड्यानिशी घरदार सोडून पळ काढला.

हिटलरला एकही गोळी झाडावी न लागता आयुष्यात दुसऱ्यांदा जे पाहिजे होते ते मिळाले. यामुळे हिटलरचा आणि नाझींचा अहंकार आणखीही खूपच वाढला होता. ते विचार करू लागले - आपण काहीही करू शकतो. हे संपूर्ण जग जिंकू शकतो.

हिटलरचे साम्राज्य विस्ताराचे प्राथमिक लक्षय अशा तऱ्हेने हळूहळू पूर्ण होत होते. आता तो यहुदींच्या मागे लागण्याचा विचार करू लागला.

आपल्या अंगरक्षकाला हिटलर एकांतात म्हणाला,

“चेंबरलेनने प्रागमध्ये प्रवेश करण्याची माझी सर्व योजनाच कुचकामी करून टाकली...”

वास्तविक युद्धात उद्ध्वस्त करून त्याला झेकोस्लोव्हाकियात प्रवेश करायचा होता. ब्रिटन, फ्रान्स आणि इटलीने ती वेळच येऊ दिली नाही. यामुळे खरे तर हिटलरने त्या तिन्ही राष्ट्रांचे आभार मानायला पाहिजे होते. युद्ध न झाल्यामुळे त्याचा फार हिरमोड झाला. कारण म्युनिच करार म्हणजे फक्त एक व्यर्थ कागद आहे, असे त्याचे स्पष्ट मत होते.

21 ऑक्टोबर, 1938 रोजी हिटलरने आपल्या सर्व जनरल्सची बैठक घेतली. त्याने सरळ आदेशच दिला,

“झेकोस्लोव्हाकियाला मिटवून टाकण्याची तयारी करा...”

स्युडेटिनलँड त्याची शेवटची मागणी असेल, असे त्याने सर्वांना वचन दिले होते; परंतु आता त्याला संपूर्ण झेकोस्लोव्हाकिया स्वत:च्या ताब्यात पाहिजे होता.

## झेक राष्ट्रपतीची कोंडी

झेकोस्लोव्हाकियाचा नवा राजकीय नेता 66 वर्षीय डॉ. एमिल हाशा होता. तो अननुभवी आणि हृदयविकाराने पीडित होता. त्याने झेक राष्ट्रपती एडुअर्ड बेनची जागा घेतली होती. म्युनिच करारानंतर स्वत:च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तो जीव

वाचविण्यासाठी ब्रिटनमध्ये पळून गेला.

जानेवारी 1939 मध्ये हिटलरच्या संमतीने पोलंड आणि हंगेरीने झेकोस्लोव्हाकियाचे लचके तोडले होते. स्लोवाकांची स्वतंत्र राज्याची मागणी उफाळून वर आली. 10 मार्च 1939 रोजी राष्ट्रपती हाशाने स्लोवाक नेत्यांना पदांवरून बडतर्फ केले आणि त्यांच्या प्रदेशात लष्करी राजवट अर्थात मार्शल लॉ लागू केला.

त्याच्या या धक्कातंत्राने नाझींची सर्व योजना विस्कळीत झाली.

हिटलरने आपल्या सेनानायकांना तत्काळ आक्रमणाची तयारी करण्याचा आदेश दिला.

जर्मनी समर्थक स्लोवाक नेता महामान्य टिसो हिटलरची भेट घेण्यासाठी बर्लिनला आला. 13 मार्च सोमवारी संध्याकाळी तो कार्यालयात पोहोचला. त्याची आणि हिटलरची भेट झाली. हिटलरने आपले नेहमीचे खोटारडेपणाचे शस्त्र चालवले. हिटलरने टिसोला आश्वासन दिले.

“झेकोस्लोव्हाकियातून फुटून स्लोवाकियाचे स्वतंत्र राज्य निर्माण झाल्यास जर्मनी त्याचे सर्व बाह्य शत्रूपासून आणि आक्रमणापासून संरक्षण करील…”

स्वातंत्र्याच्या उद्घोषणेचा मजकूर तयार करण्यात आला.

दुसरा दिवस. 14 मार्च, मंगळवार. टिसो त्याच्या घरी परतला. त्याने हिटलरच्या सैनिकी कारवाईचे दडपण आणून स्वतंत्र स्लोवाक राज्याची घोषणा केली. इतरांनी इच्छा नसली तरी हिटलरच्या नावामुळे महामान्य टिसोच्या प्रस्तावाला सहमती देण्यातच स्वत:चे कल्याण सामावले आहे, असे मानून घेतले.

अशा तऱ्हेने हिटलरच्या प्रोत्साहनाने स्वतंत्र स्लोवाक देशाचा जन्म झाला.

आता विस्कळीत झालेल्या झेकोस्लोव्हाकियाचे बोहेमिया आणि मोराकिया हे दोनच प्रांत शिल्लक राहिले. गोबेल्सने आपला खोटा प्रचार सुरू केला,

“स्थानिक झेक नागरिक जर्मन लोकांना फार त्रास देत आहेत. त्यांचा छळ करीत आहेत..”

झेकोस्लोव्हाकियाचा राष्ट्रपती हाशाने हिटलरशी आमनेसामने बसून चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. हिटलरने संमती दिली. रेल्वेने निघालेला हाशा मंगळवारी रात्री 10.40 वाजता बर्लिनला पोहोचला. परराष्ट्रमंत्री रिबेन ट्रॉपची आणि त्याची भेट झाली.

हिटलरला भेटण्यासाठी त्याला ऑल्डन हॉटेलात नेण्यात आले.

तीन तासांनंतर रात्री 1.15 वाजता त्याला कार्यालयात बोलवले गेले. तो हिटलरशी खूप नम्रतेने बोलला, तर हिटलर विनाकारण त्याला खरीखोटी ऐकवून झापत राहिला. तो आपल्याच संतापात भडकून म्हणाला,

“फक्त काही तास! जर्मन सैन्य झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करण्यासाठी पूर्ण तयारीने उभे आहे. आदेश मिळताच काही तासांनंतर ते आक्रमणाला सुरुवात करतील.”

त्याचे एक वैशिष्ट्य होते. तो कोणालाच बोलू देत नसे. फक्त स्वत: बोलायचा.

कोणाचेच ऐकत नसे. फक्त त्याचे ऐकवायचा.

राष्ट्रपती हाशा हिटलरची दमदाटी ऐकून मोठ्या धर्मसंकटात सापडला. कारण सकाळच्या सहा वाजेपासून जर्मनीची सैनिक कारवाई नक्की सुरू होणार होती.

राष्ट्रपती हाशा हिटलरची धमकी ऐकून एकदम सुन्नच झाला.

बाजूच्या हॉलमध्ये गोरिंग आणि रिबेन ट्रॉप बसले होते. सर्व गुंडांचा बाजार! ते दोघे बदमाश नाझी आजारी आणि वयोवृद्ध राष्ट्रपतींवर विनाकारण कोसळले. शरणागतीच्या करारनाम्यावर सही करण्यासाठी हाशावर दबाव आणू लागले. गोरिंग म्हणाला,

“शरणागतीच्या करारनाम्यावर सही केली नाही तर केवळ दोन तासांत जर्मन वायुसेना बाँबवर्षाव करत निम्म्या प्राग शहराला स्मशानावस्थेत बदलून टाकील...”

ते ऐकताच राष्ट्रपती हाशा जमिनीवर कोसळून बेशुद्ध पडला. डॉ. थियोडोर मोरेलच्या उपचारांनी त्याला आराम वाटला. फोनवर त्याने नाझींपुढे शरणागती पत्करण्याची आपल्या लोकांना सूचना दिली.

बुधवार, 15 मार्चच्या भल्यापहाटे 3.55 वाजता हिटलरसमोर समर्पण करारनाम्यावर झेक राष्ट्रपतीने सही केली.

त्या दिवशी प्रागला रवाना होण्यापूर्वी हिटलरने जर्मन जनतेसमोर घोषणा केली -

“झेकोस्लोव्हाकिया आता संपला आहे..”

हिटलरने ती रात्र प्रागच्या रेडशिन महालात घालवली. त्या ठिकाणी पूर्वी बोहेमियाचा राजपरिवार राहायचा. गुरुवार, 16 मार्चला हिटलरने बोहेमिया आणि मोरावियाला सुरक्षित राज्य बनविल्याचे जाहीर केले. हिटलर म्हणाला,

“झेकोस्लाव्हाकियाची अंतर्गत कमजोरी त्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यास असमर्थ ठरली होती. याच कारणामुळे या राष्ट्राचे विघटन झाले...”

टिसोजवळची आधीच तयार करून ठेवलेली धूळफेक करणारी तार हिटलरच्या हातात होती. स्लोवाकच्या जनतेच्या विनंतीवरून जर्मन सेना झेकोस्लोव्हाकियात शिरली, असा निखळ खोटा आभास त्या तारेने निर्माण केला होता.

### असंतोषाची ठिणगी पडली

झेकोस्लोव्हाकियात ज्या काही घटना घडत होत्या, त्या म्युनिच कराराचे उल्लंघन करणाऱ्या होत्या. संपूर्ण जग याबाबत चेंबरलेनची प्रतिक्रिया जाणून घेण्यास उत्सुक होते. त्यानेही प्रतिक्रिया व्यक्त केली; पण ती जवळजवळ हिटलरच्या कारवाईचे समर्थन करणारी होती. त्यामुळे त्याविरुद्ध टीकेची झोड उठली. ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमनच्या काही रागावलेल्या सदस्यांनी शपथच घेऊन टाकली,

“यानंतर इंग्लंड हिटलरला कधीच प्रोत्साहन देणार नाही.”

शुक्रवार, 17 मार्चला चेंबरलेन रेल्वेने लंडनहून बर्किंगहॅमला जायला निघाला. त्याच्या हातात एक भाषण होते. अचानक त्याला जणू काहीतरी उपरती झाली. भाषणाच्या कागदाचे तुकडे करून त्याने ते फेकून दिले. पी.ए.ला तातडीने दुसरे भाषण

तयार करण्याचा आदेश दिला.

या भाषणाचा विषय होता -

'हिटलर.'

नव्या भाषणात हिटलरच्या कारवाईबाबत चेंबरलेनने जी गोलमोल प्रतिक्रिया व्यक्त केली होती त्यासाठी क्षमा मागितली. म्युनिच करारापासूनच्या सर्व आश्वासनांचा हिटलरने कसा विरुद्ध वापर केला, याचा नवीन भाषणात सविस्तर तपशील होता. त्याचे हे भाष्य इंग्लंडमध्ये रेडिओवर सर्वत्र प्रसारित करण्यात आले. त्यातील काही महत्त्वाचा अंश खालीलप्रमाणे –



''फ्यूहररने कायदा आपल्या हातात घेतला आहे. आता आम्हाला सांगितले जात आहे की, झेकोस्लोव्हाकियात उपद्रव वाढल्याने त्यावर हल्ला करणे आवश्यक झाले होते. या अवस्थेला बाहेरून कोण खतपाणी घालीत होते? त्या चिमुकल्या राष्ट्रावर हे अंतिम आक्रमण समजावे की आणखी हल्ले केले जातील?''

जर्मन साम्राज्याच्या इतिहासात ब्रिटनने पहिल्यांदा घोषणा केली की, ते जर्मनीच्या हुकूमशहाला तोंड देतील आणि वेळच आली तर त्यांच्याशी युद्ध करायलाही मागेपुढे पाहणार नाहीत.

दुसऱ्या दिवशी 18 मार्चला ब्रिटन आणि फ्रान्सने जाहीर केले,

''झेकोस्लोव्हाकियावर हिटलरचा कब्जा ही बाब म्युनिच कराराचे सरळ सरळ उल्लंघन आहे. त्याला कोणताही नैतिक वा कायदेशीर आधार नाही. कब्जाच्या वैधतेला आमच्याकडून कधीच मान्यता दिली जाणार नाही..''

कोण काय विचार करतो, कोणाचा काय दृष्टिकोन आहे याच्याशी हिटलरला आणि नाझींना काही घेणेदेणे नव्हते.

31 मार्च रोजी प्रधानमंत्री चेंबरलेनने फ्रान्सच्या समर्थनार्थ एक घोषणा जारी केली -

''नाझी आक्रमणासाठी हिटलरचे पुढचे लक्षय पोलंड असेल...''

हिटलरला रक्तहीन क्रांतीच्या विजयात स्वारस्य नव्हते. त्याला युद्धानंतर मिळणाऱ्या विजयाचा उन्माद प्रिय होता. सहजासहजी काही प्राप्त करून घेण्याऐवजी जबरदस्ती हिरावून घेण्यात त्याला फार मजा वाटे. यापुढे तो युद्धाचाच मार्ग अनुसरणार होता.

युरोपच्या विभिन्न देशांनी भविष्याच्या बदलत्या वातावरणाचा अंदाज घेऊन सैन्यशक्तीत प्रचंड वाढ आणि सुधारणा तसेच आधुनिकीकरण करण्याचा सपाटा लावला होता.

युद्धासाठी गट-तट, आपापले पक्ष निश्चित करण्याच्या गुप्त हालचालींना वेग आला. ब्रिटन, फ्रान्स आणि पोलंड इत्यादींचा एक गट तसेच जर्मनी, इटली इत्यादींचा दुसरा गट अशी विभागणी होऊ लागली. जोसेफ स्टॅलीनच्या सोव्हिएत संघाचा पत्ता अद्याप झाकलेला होता.

•••

# विनाशाचे बीजारोपण

जानेवारी 1939 पर्यंत हिटलरची हिंमत खूपच वाढली होती.

झेकोस्लोव्हाकियावर कब्जा केल्यानंतर तो पोलंडवर दबाव टाकू लागला. बाल्टिक समुद्रकिनाऱ्यावर असलेले जर्मन शहर दानजिग जर्मनीच्या ताब्यात देण्याचा त्याने पोलंडकडे तगादा लावला. जर्मनीतून पोलंडमार्गे पूर्व प्रशियापर्यंत नवा सुपर हायवे आणि रेल्वेमार्ग निर्माण करण्याचीही त्याला परवानगी पाहिजे होती.

तो भाग म्हणजे एक चिंचोळी पट्टी होती. तोच पोलंडचा समुद्रापर्यंत जाण्याचा मार्ग होता. त्यामुळे उर्वरित जर्मनीपासून पूर्व प्रशिया वेगळा व्हायचा, प्रथम विश्वयुद्धानंतर व्हर्सायच्या तहानुसार हा प्रदेश पोलंडला देण्यात आलेला होता. त्या तहातच दानजिग शहराला मुक्त (स्वतंत्र) नगराचा दर्जा दिला गेला होता. त्याची देखरेख राष्ट्रसंघाकडे (किंग ऑफ नेशन्स) होती.

हिटलर आणि नाझी परराष्ट्रमंत्री रिबेन ट्रॉपने पोलंडचा राजदूत जोसेफ लिप्स्की आणि पोलंडचा परराष्ट्रमंत्री जोसेफ बेक यांच्याशी बऱ्याच वेळा निष्फळ चर्चा केली. शेवटी पोलंड सरकारने खरमरीत भाषेत सुनावले,

“हिटलरशी तडजोड करण्यात आम्हाला कुठलेच स्वारस्य नाही. इतकेच काय, दानजिगवर कब्जा करण्याचा जर्मनीचा कोणताही प्रयत्न युद्धाला निमंत्रण समजले जाईल...”

हिटलरच्या डोळ्यांत कोणीतरी जणू झणझणीत अंजन घातले; पण म्हणतात ना,

‘जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही..’

हिटलरने तातडीने आपल्या सेनाधिकाऱ्यांची बैठक बोलावून त्यांना आदेश दिला, “अचानक हल्ला करून दानजिग ताब्यात घेण्याची तयारी करा...”

झेकोस्लोव्हाकियाचा उरलासुरला हिस्साही हिटलरने बळकावला. त्यामुळे इंग्लंडमध्ये जनतेत तीव्र प्रतिक्रिया उमटली. शेवटी 31 मार्च, 1939 रोजी फ्रान्सच्या सहमतीने नेविल चेंबरलेनने घोषणा केली,

“पोलंडला वाचवण्यासाठी ब्रिटनला युद्धाच्या मैदानात उतरावे लागेल..”

हिटलरला चेंबरलेनची घोषणा समजली. त्याने खूप थयथयाट केला. त्याचा उन्माद दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार करून जर्मनीच्या सर्वस्व विनाशाचे बीजारोपण करीत होता. येणाऱ्या काही महिन्यांनंतरच त्याची सत्यानाशी कटू फळे संपूर्ण जगाला खावी लागणार होती.

### इटलीवर दबाव

फॅसिस्ट इटली आतापर्यंत शांत होता. तेथील वातावरणात कोणता निर्णय घ्यावा हे बेनिटो मुसोलिनीच्या लक्षात येत नव्हते. त्याच्या संपर्कात येणारे ज्येष्ठ नाझी नेते बढाया मारीत होते की, युद्ध झालेच तर विजय 100 टक्के जर्मनीचाच होईल.

मुसोलिनीही सैन्यबलप्रयोगाच्या विरुद्ध नव्हता; परंतु तो अत्यंत धूर्त होता. प्रथम

जमीन फुंकून नंतर पाय ठेवायचा त्याचा स्वभाव होता. तोही बाकी बाबतीत हिटलरपेक्षा दोन पावले पुढेच होता. त्याने गरीब आणि दुबळ्या अशा इथोपिया तसेच अल्बानिया या राज्यांवर जबरदस्ती कब्जा करून ठेवला होता. मात्र त्याच्या सैन्याला मोठ्या युद्धात लढण्याचा अनुभव नव्हता.

आणखी एका विश्वयुद्धात किती लोक मारले जातील, याची नाझींना पर्वा नव्हती. हिटलरच्या दृष्टीत मानवी जीवनाला काहीही किंमत नव्हती. मुसोलिनी युद्धखोर होता; पण त्याला जीवनाचे मूल्य जाणवत होते, मान्य होते.

6 मे 1939 रोजी नाझी परराष्ट्रमंत्री रिबेन ट्रॉबने मुसोलिनीचा जावई आणि इटलीचा परराष्ट्रमंत्री काउंट गलिजो सियानो याची भेट घेऊन चर्चा केली. मुसोलिनीने जावयाला आदेश दिला,



‘‘जर्मनी आणि इटलीत खरोखरच सैनिकी एकजूट झाली आहे. सर्व प्रसिद्धीमाध्यमांना तत्काळ हे वृत्त कळवून प्रसारित करायला सांगा..’’

जर्मनी स्वत:च्या खऱ्या हेतूबाबत इटलीला जाणूनबुजून अंधारात ठेवून राहिला होता.

•••

# भय इथले संपत नाही

या हलकल्लोळात रशियाचे (सोव्हिएत संघ) काय चालले होते?

जोसेफ स्टॅलिनने पश्चिमी मित्रराष्ट्रांना ताकीद दिली,

“रशिया असा कोणताच प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही, ज्यामुळे सोव्हिएत संघाला नाझी जर्मनीविरुद्ध एकाकी लढावे लागावे आणि पश्चिमी मित्र देश बाजूला उभे राहून फक्त तमाशा पाहत असावेत…”

मे 1939 मध्ये सोव्हिएत परराष्ट्रमंत्री व्याचिस्लाव मोलोतोवने एका भाषणात स्पष्ट सांगून टाकले -

“पश्चिमी मित्रराष्ट्रांनी विचार करण्यात व्यर्थ वेळ न दवडता तातडीने मॉस्कोशी संपर्क साधावा, अन्यथा सोव्हिएत संघ आणि नाझी-जर्मनीत कोणताही करार होऊ शकतो.”

पश्चिमी मित्रराष्ट्रांचा नेता चेंबरलेन याची सोव्हिएत रशियाशी चर्चा करण्याची अजिबात इच्छा नव्हती. तो स्वत:ला एकटा समजत नव्हता. पोलंडचे लोकही रशियाशी आणि रशियनांशी घृणा करीत; कारण त्यांना कल्पना होती की, संधी मिळाली तर स्टॅलिन पोलंडवर झडप घालून त्या देशाला हडपण्यास मागेपुढे पाहणार नाही.

वास्तविक हिटलरला कम्युनिस्टांबाबत सक्त तिटकारा होता, तरीही स्टॅलिनसोबत अनाक्रमण करार करण्याचा त्याने निश्चय केला. एकाच वेळेस दोन आघाड्यांवर लढावे लागू नये एवढाच यामागे उद्देश होता.

हिटलरची योजना अशी होती -

• अचानक हल्ला करून पोलंडवर कब्जा करणे.

• नंतर पश्चिमेकडे कूच करून फ्रान्स आणि इंग्लंडला पराभूत करणे.

• या काळात सोव्हिएत संघाचे तटस्थ राहणे आवश्यक राहील. तसे झाले नाही तर जर्मनीला एकाच वेळेस पूर्व आणि पश्चिम मोर्चावर लढावे लागेल.

• पश्चिमी मित्रराष्ट्रांना पराभूत केल्यावर तो सैन्याला पूर्वेकडे अर्थात रशियावर आक्रमण करण्यासाठी नेणार होता.

• पूर्वेला लेबेंसरॉम ताब्यात घेण्यासाठी तो स्टॅलिनच्या लाल सेनेशी टक्कर घेऊ इच्छित होता.

जोसेफ स्टॅलिनच्या प्रत्यक्ष शक्तीचा हिटलरला अंदाज आला नाही.

हिटलरप्रमाणे स्टॅलिनही मानवी जीवनाला विशेष महत्त्व देत नसे. त्याला सामूहिक हत्याकांडाचा फार चांगला अनुभव होता. त्याने सोव्हिएत संघात अशी दहशत निर्माण करून ठेवली होती की, कोणाचेही जीवन सुरक्षित राहिले नव्हते.

### क्रूरकर्म्यांची हातमिळवणी

ब्रिटनच्या हे लक्षात आले की, स्टॅलिन केव्हाही नाझींच्या कळपात सामील होऊ शकतो. त्याच्या बाबतच्या समज-गैरसमजांना फाटा देऊन ब्रिटन त्याच्याशी मिळवून घेण्याचा प्रयत्न करू लागला. जर्मनांना हे माहीत होताच ते सावध झाले. त्याच्याशी संपर्क वाढविण्याचा प्रयत्न करू लागले. तो एकेक पाऊल विचारपूर्वक उचलू लागला. दोन्ही पक्षांना घुमवू लागला.



पोलंडने कोणत्याही रशियन सैनिकाला आपल्या भूमीवर पाय ठेवण्यास मज्जाव केलेला होता. हिटलरने हल्ला केला, तरीही पोलंड आपली अढी सोडायला तयार नव्हता.

11 ऑगस्टपर्यंत चेंबरलेनकडून कोणीही प्रतिनिधी मॉस्कोला पोहोचला नव्हता. तोपर्यंत नाझींनी धावपळ करून नाझी-सोव्हिएत करारासाठी पार्श्वभूमी तयार करण्यात बाजी मारली. नंतर जे अधिकारी चेंबरलेनने मॉस्कोला चर्चेसाठी पाठवले ते दुय्यम दर्जाचे होते. त्यांनाही सक्त ताकीद होती की, घाईगडबडीत कोणताही निर्णय घेऊ नये. इंग्लंडकडून युद्धविषयक काही महत्त्वाच्या सूचना मिळविण्यातही मॉस्कोचे अधिकारी अपयशी ठरले. त्यांना तो स्वत:चा मोठा अपमान वाटला.

आता स्टॅलिन जास्तच सावध झाला. मित्रराष्ट्रांना युद्धविषयक सलोख्यात स्वारस्य नाही अशी त्याला मनोमनी खात्री पटली.

जर्मनी आणि सोव्हिएत संघ अनाक्रमण करारास अनुकूल झाले.

23 ऑगस्टला स्टॅलिनच्या उपस्थितीत क्रेमलिनच्या राजवाड्यात जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेन ट्रॉप आणि सोव्हिएत परराष्ट्रमंत्री मोलोतोव यांनी समारंभपूर्वक नाझी-सोव्हिएत अनाक्रमण करारावर सह्या केल्या.

हिटलर आणि स्टॅलिन दोघांना जे पाहिजे होते ते मिळाले.

दोन्ही दुष्ट आणि क्रूर व्यक्ती - अॅडॉल्फ हिटलर आणि जोसेफ स्टॅलिन यांच्यात समझोता झाल्याचे जगजाहीर होताच सर्वांना भयचकित आश्चर्य वाटले. सर्वांची पक्की खात्री झाली की, लवकरात लवकर आणखी एक विश्वयुद्ध होणार म्हणजे होणारच. फ्यूहररला फक्त तारीख जाहीर करणे बाकी होते.

### नशिबाचे फासे पलटले

प्रधानमंत्री नेविल चेंबरलेनने फ्यूहररला व्यक्तिगत पत्र पाठवून कळवले,

“नाझींनी पोलंडवर आक्रमण केले तर इंग्लंड आपले संपूर्ण सैन्य पोलंडच्या रक्षणासाठी ताबडतोब युद्धात उतरवील आणि एकदा का युद्ध सुरू झाले की त्याचा अंत केव्हा होईल, हे सांगणे अवघड आहे…”

23 ऑगस्टला ब्रिटिश राजदूत नेव्हिल हेंडर्सनमार्फत ते पत्र बर्शतिस्गाडेन बंगल्यावर हिटलरला सोपवले गेले. पत्र वाचल्यावर त्याची पिसाळल्यासारखी

अवस्था झाली. कारण त्याने नेहमी आपल्या सेनाधिकाऱ्यांना खोटे आश्वासन दिले होते,

“ब्रिटन आणि फ्रान्स पोलंडच्या बचावासाठी कधीच आपल्याविरुद्ध युद्धात उतरणार नाहीत. ज्या लोकांना म्युनिच कराराच्या वेळेस मी पाहिले आहे आणि ओळखले आहे, त्यांच्यात एखाद्या नव्या विश्वयुद्धाची सुरुवात करण्याइतकी हिंमत नाही...”

सन 1939 चा बहुतेक काळ हिटलरने बर्शतिस्गाडेन पहाडावरच्या आपल्या बंगल्यात विचार करण्यात घालवला. आता डाव उलटला होता. कोणीही त्याच्या धाकदपटशाला भीक घालण्याच्या मन:स्थितीत नव्हते. हिटलर, पोलंड, ब्रिटन, फ्रान्स या सर्वांना युद्धज्वराने पछाडले होते. सर्वांनी युद्धाच्या धमक्या देणे सुरू केले.

अमेरिकाही या धमक्यांच्या चक्रात गुरफटला. राष्ट्रपती फ्रँकलिन रुझवेल्टने अचानक हिटलरला तार पाठवली,

“आपण हे आश्वासन द्यायला तयार आहात का, की आपली सशस्त्र सेना या स्वतंत्र देशांवर आक्रमण करणार नाही आणि त्यांच्या प्रदेशात प्रवेश करणार नाही...”

रुझवेल्टने स्वतंत्र म्हणून ज्या 31 देशांची नावे दिली त्यात ब्रिटन, फ्रान्स, बेल्जियम, नेदरलँड, डेन्मार्क, बाल्टिकराज्य, पोलंड वगैरेंचा समावेश होता.

हिटलरने रुझवेल्टला खोटे आश्वासन दिले,

“जर्मनी आपल्या शेजारी राष्ट्रांशी केवळ शांतिपूर्ण संबंध ठेवू इच्छितो. पोलंडविरुद्ध कोणतीही कारवाई करण्याचा जर्मनीचा विचार नाही...”

आता प्रश्न होता की, जर्मनीच्या बाहेर आणि काही प्रमाणात अंतर्गतही त्याच्या शब्दांवर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नव्हता. कारण तो सतत फक्त खोटेच बोलायचा. म्युनिच कराराची टवाळी केल्यामुळे ब्रिटन त्याला कधीच माफ करणार नव्हता. ब्रिटनने त्याला स्पष्ट शब्दांत ताकीद दिली होती की, ते युद्ध करतील आणि हे युद्ध एका नव्या विश्वयुद्धात रूपांतरित होऊ शकते.

## विवेकहीन नेतृत्वाचा बळी- जर्मनी

हिटलरचा अहंकार पराकोटीचा वाढला होता. आंतरराष्ट्रीय राजकारणात होणारे बदल विचारात घेऊन त्याप्रमाणे निर्णय घेण्याची त्याची इच्छा आणि तयारी नव्हती. ‘मी जे करतो, बोलतो तेवढेच सत्य’ हा अहंभाव त्याला विवेकहीन करून टाकीत होता. त्याला वास्तवतेचे भान समजावणारा जर्मनीत कोणीही शिल्लक राहिला नव्हता. त्याला त्याच्या चुकीच्या निर्णयाबाबत दोष देण्याची कोणाच्यात हिंमत नव्हती.

1939 मध्ये हिटलरने वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांचे संमेलन बोलावले. बर्लिनमध्ये बोलावलेल्या संमेलनाला हरमन गोरिंग, अॅडमिरल रेडर, जनरल ब्राउचिटश, हाल्डर आणि काईटेलही हजर होते. त्याने आपले म्हणणे स्पष्ट केले,

“जर्मनीला युद्ध करावेच लागेल. कारण जर्मन साम्राज्याची अर्थघडी पूर्ण विस्कटून संकटात सापडली आहे. तिला स्थैर्य प्राप्त करण्यासाठी दुसऱ्या देशांवर आक्रमण करून त्यांची संपत्ती हडपल्याशिवाय आपल्या देशाला दुसरा पर्याय नाही..”

दुसऱ्या देशाच्या भूमीवर जबरदस्ती कब्जा करणे नाझी जर्मनीची आर्थिक आवश्यकता बनली होती. म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाचा शेकडा 23 टक्के भाग हिटलर जर्मनीच्या शस्त्रीकरणावर खर्च करीत होता. देशाला शस्त्रसज्ज करण्याच्या नादात बेकारी 125 टक्क्यांपर्यंत वाढली. झेकोस्लोव्हाकिया आणि ऑस्ट्रियाच्या ताब्यामुळे ब्रुहत्तर जर्मन राज्याची लोकसंख्या एकदम वाढून 8 कोटी झाली होती. त्याने जर्मनीचा आर्थिक कणाच मोडून टाकण्याची वेळ आणली.

23 जूनला हिटलरच्या अनुपस्थितीत गोरिंगने राईक रक्षा परिषदेची बैठक बोलावली. त्या बैठकीत गोरिंगखेरीज कार्डडेल, रेडर, हाल्डर, हेन्रिक हिमलरही उपस्थित होते. गोरिंग म्हणाला -

“हिटलरने सशस्त्र सेनेत 70 लाख भरती करण्याचे ठरविले आहे.”

परराष्ट्रमंत्री रिबेन ट्रॉप अद्याप मॉस्कोत होता. हिटलर बर्शतिस्गाडेनच्या बंगल्यात होता. त्याने त्याच्या सर्व सेनाधिकाऱ्यांना तेथे बोलावून आदेश दिला -

“पोलंडवर आक्रमण करा.”

पूर्वेकडून रशियाच्या आक्रमणाची भीती न राहिल्यामुळे त्याने हा कपटी डाव टाकला. तो पुढे म्हणाला,

“आमची आर्थिक अवस्था इतकी गंभीर झाली आहे की, आम्ही या संकटाचा जास्त दिवस सामना करू शकणार नाही. गोरिंगला सर्व परिस्थिती माहीत आहे. आम्हाला कारवाई करावीच लागेल. याला आता दुसरा पर्याय नाही.”

जर्मनीला एक महान राष्ट्र आणि जनतेला उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने दाखवून हिटलर जर्मनीचा फ्यूहरर झाला होता. त्याच लोकांची त्याने अन्नान्न दशा करून टाकली. त्याच जर्मनीला महाविनाशाच्या काठावर आणून उभे केले. कोणाचे काही ऐकण्याचीही तयारी त्याने दाखवली नाही.

जर्मनीच्या सैनिकी यंत्रणेचा वापर करण्याची वेळ आता आली होती. त्याने आपल्या सैनिकांना फर्मान सोडले,

“दया-माया-करुणा यासाठीचे आपल्या मनाचे दरवाजे बंद करून टाका. जास्तीत जास्त क्रूर
शत्रूला त्याचे प्रत्यंतर आणून द्या. आठ कोटी लोकांनी ते सर्व प्राप्त केले पाहिजे, जे त्यांच्या अ
आहे.

अतिरिक्त शक्तिशाली व्यक्तीच नेहमी बरोबर असते. मनाने मजबूत आणि निष्ठूर बना. प्रेम आणि सहानुभूतीच्या लक्षणांविरुद्ध दगड व्हा...”

## विनाशाच्या काठावर

युद्धाची सुरुवात करण्याआधी हिटलरच्या ‘सिद्धांत प्रचाराची’ व्यवस्था फ्यूहररच्या सूचनेवरून हिमलर आणि हेड्रिक यांनी आधीच करून ठेवली होती. त्या योजनेचे नाव होते ‘ऑपरेशन हिमलर!’ त्यानुसार एस.ए. ला जर्मन-पोलंड सरहद्दीवर जर्मन फौजेविरुद्ध पोलंड सेनेच्या आक्रमणाचे नाटक खेळले गेले. नजरबंदी शिबिरातील कैद्यांना पोलंडच्या सैनिकांचा गणवेश नेसवून आधी विषारी इंजेक्शनने ठार मारायचे. नंतर बंदुकीच्या गोळ्यांनी त्यांच्या शरीराची चाळणी करायची. प्रत्यक्षात जर्मनीवर न झालेल्या आक्रमणाचा पुरावा म्हणून तीच प्रेते प्रेस फोटोग्राफरना दाखवायची,

अशी ही योजना होती.

राक्षसी वृत्तीचा अतिरेकच!

26 ऑगस्टला शनिवारी पहाटे 4.30 वाजता पोलंडवर आक्रमणाची कारवाई सुरू करण्याचे हिटलरने ठरविले.

बहुतांश जर्मनवासी अद्यापही युद्धाच्या विरोधात होते.

शुक्रवार, 26 ऑगस्टला हिटलरने पोलंडवरील आक्रमण अचानक स्थगित केले. कारण त्या दिवशी दोन विरुद्ध घटना घडल्या -

• इंग्लंड आणि पोलंडने जर्मन आक्रमणाविरुद्ध एकत्र लढण्याच्या करारावर सह्या केल्या.

• जर्मनीशी अतूट सैन्य संघटन असले तरी इटली युद्धात प्रत्यक्ष भाग घेणार नाही, असा निरोप मुसोलिनीने हिटलरला पाठवून दिला.

संध्याकाळी 6.30 वाजता हिटलरने जनरल काईटेलला कार्यालयात बोलावून सांगितले,

''सर्व कारवाई तातडीने थांबवा. मला विचार-विमर्श करण्यासाठी थोडा वेळ पाहिजे.''

गोरिंगचा एक स्वीडिश मित्र होता. बिरजर दाह्लेख त्याचे नाव. त्याला ब्रिटनचा परराष्ट्र सेक्रेटरी हेलिफॅक्स याच्याकडे निरोप घेऊन पाठवले की, नाझी सरकारला ब्रिटनशी समझोता होण्याची आशा आहे.

त्यावर हेलिफॅक्सने कळविले की, ब्रिटन अद्यापही शांतिपूर्ण समाधानाची अपेक्षा करतो.

रात्री झोपेतून उठवून हिटलरला शनिवार, 26 ऑगस्टच्या मध्यरात्री बर्लिनच्या चान्सलरीत हेलिफॅक्सचे पत्र दाखवण्यात आले. त्याने त्या पत्राला अजिबात महत्त्व दिले नाही.

आपल्या सैन्याच्या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांना हिटलरने फोन करून आदेश दिला,

''पोलंडवरील आक्रमणाची नवीन तारीख 1 सप्टेंबर समजावी. तोपर्यंत युद्धाची सर्व तयारी झाली पाहिजे..''

नाझींची अशी इच्छा होती की, पोलंडने किरकिर न करता सन्मानाने त्यांना दानजिग आणि पोलिश कॉरिडोर सोपवून जर्मनीचा मान राखावा.

ब्रिटन या मागणीशी सहमत नव्हता, तर हिटलर भयानक चाल खेळत होता. जगाच्या नजरेत तो पोलंडला शांततेने सर्व प्रश्न सोडविण्याची जास्तीत जास्त सवलत देत असल्याचे नाटक करीत होता. मात्र वस्तुस्थिती वेगळी आणि भयानक होती. कोणताही प्रश्न युद्धाशिवाय शांततेने सुटावा अशी हिटलरची नियत नव्हती. एखादा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आला की, त्यात तो नवीन खोडा घालायचा, सुटता सुटता तो प्रश्न प्रलंबित राहायचा.

बातचीत काहीही होवो, जर्मनी-पोलंड सीमेवर आक्रमणाच्या जोरदार हालचाली सुरू

होत्या. हिटलरचा प्रयत्न होता की, तातडीने आक्रमण करून आधी पोलंडचा घास घ्यावा. नंतर सैन्याचा मोर्चा पश्चिमेकडे वळवून ब्रिटन आणि फ्रान्सच्या सैन्याचा समाचार घ्यावा.

गुरुवारी रात्र होताच 15 लाख जर्मन सैनिकांनी पोलंडवर आक्रमण करण्याच्या तयारीने अंतिम पोजिशन घेण्यासाठी कूच करायला सुरुवात केली. संध्याकाळी 8 वाजता 'ऑपरेशन हिमलर' चालू झाले.

1 सप्टेंबरला शुक्रवारी सकाळी जल्लोष करीत जर्मन सैनिक सीमा ओलांडून पोलंडमध्ये शिरले. रस्त्याने ते तोडफोड आणि सत्यानाश करीत चालले.

सकाळी 10 वाजता हिटलर बर्लिनमध्ये जर्मन लोकसभेसमोर हजर झाला. त्याने घोषणा केली,

"गेल्या रात्री पहिल्यांदा पोलंडच्या अधिकृत जवानांनी आपल्या सीमा क्षेत्रात गोळाबारी केली. सकाळी 5.45 पासून आम्ही त्यांच्या हल्ल्याला तोंड देत आहोत. आता बाँब वर्षाव केला जाईल..."

### दारुण अंत

साम्राज्याच्या क्षेत्र विस्तारासाठी ज्या युद्धाचे स्वप्न हिटलर नेहमी पाहत असायचा ते युद्ध आता सुरू झाले होते. हे युद्ध 5 वर्षे, 8 महिने आणि 6 दिवस चालले. त्यात खूप विनाश झाला. जवळजवळ 4 ते 6 कोटी लोक मारले गेले. जर्मनी आणि युरोपची भरपूर सांस्कृतिक स्थळे नष्ट झाली. जर्मनीच्या जनतेने त्यांचे मनोरथ तसेच इच्छाशक्ती एका व्यक्तीला अर्पण केली होती. त्याने त्याच्या उन्मत्त अभिलाषा पूर्ण करण्यासाठी त्याच जनतेला एका दुसऱ्या नवीन महायुद्धात ढकलले.

बर्लिनच्या चान्सलर कार्यालयाच्या चान्सलरी इमारतीखाली 50 फुटांवर एक विशाल बंकर होता. 22 एप्रिल, 1945 रोजी हिटलर त्या बंकरमध्ये निघून गेला. या भूमिगत कॉम्प्लेक्सच्या निरनिराळ्या दोन मजल्यात एकूण 32 हॉल होते. हिटलर दररोज तेथे आपल्या सेनाधिकाऱ्यांची बैठक घ्यायचा. बाहेरचे युद्धविषयक वातावरण काय आहे, याचा अहवाल त्यांना विचारायचा.

आजही रोजच्याप्रमाणे सर्व आढावा घेऊन झाला.

खबर मिळाली होती की, रशियन सेना अतिशय वेगाने बर्लिनकडे चालून येत आहे; तसेच तिला थोपवणे आता केवळ अशक्यप्राय गोष्ट आहे. त्याने नियंत्रणात असलेल्या थोड्याफार फौजेला जबरदस्ती आदेश दिला,

"काहीही करून बर्लिनला वाचवा."

आपल्या आदेशातील फोलपणा बहुधा त्याच्या लक्षात आला असावा. तो नेहमीसारखा क्रोधाने उन्मत्त झाला. त्यातच दुसऱ्या विश्वयुद्धातील एकेक घटना-प्रसंग त्याच्या नजरेसमोरून सरकू लागला.

सप्टेंबर 1939 मध्ये जर्मनीकडून दुसऱ्या जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली. जर्मनीच्या पोलंडवरील आक्रमणानंतर ब्रिटन आणि फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली. सप्टेंबर अखेरपर्यंत त्यांनी युद्धाची अंमलबजावणी सुरू केली. एका आठवड्यात ऑस्ट्रिया, न्यूझीलंड, कॅनडा आणि दक्षिण आफ्रिका यांनीही दंड

थोपटले.

25 वर्षांत जगाला दुसऱ्या महायुद्धात खेचले गेले होते.

हे युद्ध जवळजवळ सहा वर्षे चालले. प्रचंड प्राणहानी झाली. इतर विनाशाचा हिशेबच नाही. हजारो किलोमीटर भूमी रक्ताने न्हाऊन निघाली. भूमी, सागर आणि वायू युद्धात पोलंडने जर्मनीशी टक्कर दिली.

इटालियन फौजेने अमेरिकेशी, जपानी फौजेने ऑस्ट्रेलियाच्या सैन्याशी युद्ध केले. शेवटी परमाणू हत्याराच्या वापरानंतर हे युद्ध समाप्त झाले. या युद्धात जगातल्या सर्व मोठ्या देशांनी भाग घेतला. सर्वांना जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची ऊर्मी आली होती. परिणामत: 6 कोटी लोकांचा संहार झाला.

युद्धाची सुरुवात पोलंडवरील हिटलरच्या जर्मन आक्रमणामुळे झाली. ब्रिटन आणि फ्रान्सने युद्धात उडी घेतली. त्यामुळे हिटलरची मूळ योजना बारगळली. पोलंडचा पाडाव केल्यानंतर तो रशियावर आक्रमण करणार होता. 1941च्या मध्यात आपला पश्चिमी मोर्चा कायम ठेवूनही कब्जा करण्याच्या मूळ उद्देशानुसार त्याने पूर्वेकडे तोंड फिरविले.

स्टॅलिनही हिटलरइतकाच पाताळयंत्री असल्याने हिटलरला ओळखून होता. जर्मनीने आक्रमण केल्यावर त्याचा सामना करण्यासाठी त्याने विशाल अशी रशियन सेना तयारच ठेवली होती.

कडाक्याच्या थंडीत जर्मन सेना रशियावर आक्रमण करील असे स्टॅलिनला वाटले नव्हते. रशियन गुप्तचर विभागाकडूनही तशी कोणतीच खबर नव्हती. इतकी गुप्तता राखली गेली होती. रशिया येथेच धोक्यात आला. प्रतिकूल वातावरणाची पर्वा न करता हटवादी हिटलरने रशियावर अचानक हल्ला करून त्याची कुतरओढ करून टाकली. रशियाची आर्थिक आणि प्राणहानी झाली. पोलंड आणि मॉस्को यातील विशाल क्षेत्र हातातून निघून गेले. तेथे संरक्षणासाठी सर्व रशियन सैन्य मारले गेले.

जर्मन सेनेला अवकाशातून वायुसेनेचेसुद्धा सुरक्षाकवच होते. त्यामुळे ते मॉस्कोपर्यंत पोहोचले; परंतु अत्यंत थकूनभागून, त्यातही जीवघेण्या थंडीने जर्मन सेनेची अवस्था केविलवाणी झाली. रशियाने वाइवेरिया वगैरे लांबच्या ताज्या दमाच्या फौजा बोलावून जर्मन सेनेवर हल्ला चढवला. त्या सैन्याने जर्मन सेनेला मागे ढकलले.

## पराभवाची नामुष्की

मॉस्को सुरक्षित वाचले.

जर्मन सैन्याला जेथे अडवले तीच लक्ष्मणरेषा ठरली. रशियाच्या पूर्व भागात जर्मन सैन्याला थोडे यश लाभले. मात्र रशियाजवळ युद्धविषयक साधनांची आणि भूमीची कमतरता नव्हती.

7 डिसेंबर 1941 रोजी 'आ बैल मुझे मार' या उक्तीप्रमाणे जपान्यांनी पर्ल हार्बर बेटावर हल्ला करून अमेरिकेला या युद्धात ओढले. जपानने पर्ल हार्बरमध्ये लढाई तर सुरू करून टाकली; परंतु त्यात विजय मिळवणे त्यांच्या कुवतीतले नव्हते. त्यांचे सर्वश्रेष्ठ सैनिक प्रमुख अॅडमिरल यामामोतोने त्यांना याबाबत सावध करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु नितांत युद्धप्रिय असणाऱ्या जपानी नेतृत्वाने युद्धाशिवाय

इतर पर्यायांवर विचार करण्यास नकार दिला.

सन 1942-43 मध्ये हिटलरने आपल्या संपूर्ण सैन्य शक्तिनिशी रशियावर दुसऱ्यांदा आक्रमण केले; परंतु रशियन सैन्याने जर्मन सेनेला मध्येच अडवले. येथून युद्धाचे पारडे फिरले. रशियन सैन्याने जबरदस्त पलटवार केला. जर्मन सेनेचे अतोनात नुकसान झाले. बहुतेक सैन्य मारले गेले. नवीन सैन्य भरतीला वेळ नव्हता. तरुण पिढीही बरबाद झाली होती.

या दोन रक्तरंजित लढायानंतर रशियन सैन्याची हिंमत वाढली. आतापर्यंतचा बचावात्मक पवित्रा सोडून देऊन रशियाने आक्रमक धोरण अनुसरले. ते आक्रमण इतके भयंकर होते की त्याने जर्मन सैन्याला मागे ढकलत ढकलत थेट बर्लिनमध्ये पोहोचविले.

हिटलरची बहुतेक जर्मन फौज कामाला आली. वाचलेली अमेरिकेपुढे समर्पण करण्यासाठी वेगाने पश्चिमेकडे मागे सरकली.

विनाशकाले विपरीत बुद्धी

22 एप्रिल, 1945 रोजी बंकरमध्ये अधिकाऱ्यांबरोबर हिटलरने तीन तासांची बैठक घेतली. तो खूप चिडला होता. ते काही नवल नव्हते. त्याला सोडून पळून गेलेल्यांवर त्याने विविध आरोपांची लाखोली वाहिली. मनाविरुद्ध काही घडले म्हणजे तो नेहमीच वेडेपणाचा पागलपणाचा झटका आल्यासारखा वागायचा. तो भान हरपल्यासारखा मोठमोठ्याने ओरडू लागला -

“शेवटची घटका जवळ आली आहे. राईक-जर्मन साम्राज्याचे स्वप्न विफल झाले. व्यर्थ ठरले. आता बर्लिनमध्ये स्थिरावून आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहण्याखेरीज अन्य पर्याय नाही.”

हिटलरच्या स्टाफने त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करून पाहिला,

“फ्यूहरर! आपण येथून निघून बर्शतिस्गाडेनच्या आसपासच्या डोंगरावर वास्तव्य करा. तेथून उर्वरित सैनिकांना मार्गदर्शन करा. त्यामुळे साम्राज्य आणखी काही काळासाठी वाचू शकेल...”

त्यावर हिटलर जिद्दीने म्हणाला,

“माझा निर्णय ठरला आहे आणि तो अंतिम आहे. कोणत्याही परिस्थितीत आता तो बदलणार नाही..”

प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्स त्याच्या पूर्ण परिवाराला बंकरमध्ये घेऊन आला. त्याचे सहा तरुण पुत्रही सोबत होते. हिटलरने कागदपत्रांची छाननी केली. त्यातील काही सुरक्षेच्या दृष्टीने जाळून टाकले. बंकरमधील कर्मचाऱ्यांना विमान आणि ट्रकच्या संरक्षणात बर्शतिस्गाडेनच्या दक्षिणेस सुरक्षित स्थळी निघून जाण्याची परवानगी दिली.

बंकरमध्ये हिटलरचे काही नोकर, सर्वोच्च सहायक मार्टिन बोर्मेन, गोबेल्स परिवार, त्याची दीर्घ काळापासूनची प्रेयसी ईवा ब्रॉन अशा महत्त्वाच्या व्यक्ती हिटलरसोबत राहिल्या.

23 एप्रिल 1945 रोजी हिटलरचा मित्र आणि शस्त्रीकरणमंत्री अल्बर्ट स्पीअर त्याला शेवटचा भेटायला आला. त्याने स्पष्ट सांगून टाकले,

“फ्यूहरर! मी आपल्या सर्वच आदेशांचे तंतोतंत पालन केले नाही. जर्मन कारखाने आणि उद्योगांना युद्धानंतरच्या कालावधीसाठी सुरक्षित वाचवून ठेवले आहे.”

नेहमीची परिस्थिती असती तर कोणतीच चर्चा किंवा मागचापुढचा विचार न करता हिटलरने स्पीअरला सरळ गोळी घालून ठार केले असते. आज हिटलर काहीच बोलला नाही. स्पीअरला फ्यूहररच्या मौनाचे आणि शांत राहण्याचे नवल वाटले.

त्याच दिवशी दुपारनंतर हिटलरला हरमन गोरिंगकडून एक तार मिळाली. तारेचा मथितार्थ थोडक्यात असा -

“माझ्या आवडत्या फ्यूहरर!

माहीत झाले की आपण बर्लिनच्या किल्ल्यातच राहणार आहात. आपल्या सहायकाच्या नात्याने अंतर्गत आणि परराष्ट्रीय मामल्यात पूर्ण स्वतंत्रपणे राईकचे संपूर्ण नेतृत्व हातात घेण्यास मला परवानगी आहे, असे समजावे का?

21 जून 1941 च्या आपल्या आदेशाने आपण तशी व्यवस्था मान्य केलीच होती.

आज रात्री 10 वाजेपर्यंत आपल्याकडून कोणतेच उत्तर आले नाही तर मी समजेन की, आपण आपले कार्य करण्याची क्षमता बाळगून बसला आहात. मग मी आपला देश आणि आपले देशवासीय यांच्या सर्वोत्तम हितासाठीच काम करीन.

आपल्याबाबत प्राप्त गंभीर अवस्थेत विचार करून माझ्या मनात कोणते विचार येत असतील ते मी व्यक्त करू शकत नाही.

ईश्वर आपली रक्षा करो आणि लवकरात लवकर आपला बर्शतिस्गडेन येथे येण्याचा मार्ग निर्वेध करो, हीच प्रार्थना.

**आपला विश्वासपात्र,**

**हरमन गोरिंग.**

बोर्मेनने उकसवल्यामुळे हिटलरने गोरिंगला कळवले,

“तुम्ही विश्वासघात करण्याचा घोर अपराध केला आहे. आपल्याला मृत्युदंड देण्याइतका आपला गुन्हा गंभीर आहे. आपल्या दीर्घकालीन सेवेचा विचार करता तूर्त आपल्याला कठोर शिक्षा देणे उचित वाटत नाही. आपण आपल्या सर्व पदांचा तातडीने राजीनामा सादर करावा.”

यानंतर बोर्मेनने बर्शतिस्गाडेनजवळच्या एस.एम. गटाला आदेश पाठवला -

“गोरिंग आणि त्याच्या कर्मचाऱ्यांना तातडीने अटक करावी.”

जर्मनीच्या नेतृत्वाची स्वप्ने पाहणारा हरमन गोरिंग 25 एप्रिलला सूर्योदय होण्याआधी जेलच्या गजाआड पोहोचला होता.

दुसऱ्याच दिवशी 26 एप्रिलला रशियाने प्रथमच जर्मनीचे चान्सलरी कार्यालय आणि फ्यूहरर बंकरच्या दिशेने तोफगोळे डागले. त्याच दिवशी संध्याकाळी एका लहान

विमानातून वायुसेना जनरल रिटर वॉन ग्राईम बंकरजवळ उतरला. सोव्हिएत सैन्याशी लढताना गोळी लागून ग्राईमचा एक पाय जखमी झाला होता. तो तसाच फ्यूहरर बंकरमध्ये घुसला. तो हिटलरसमोर येताच हिटलर त्याला म्हणाला,

‘‘तुम्हाला गोरिंगचा उत्तराधिकारी अर्थात पदोन्नती देऊन जर्मन वायुसेनेचा फिल्ड - मार्शल - इन - कमांड नियुक्त करण्यात येत आहे.’’

तीन दिवस जखमी ग्राईम बंकरमध्ये अंथरुणावर पडून होता.

27 एप्रिलला रशियाचा जर्मन चान्सलर इमारतीवरील बाँबवर्षाव खूप वाढला. हिटलरने जनरल काईटेलला वारंवार तार पाठवून बर्लिनला रशियाच्या वेढ्यातून मुक्त करण्याची सूचना दिली; परंतु काईटेलच्या नियंत्रणात तरी आता सैन्य शिल्लक होतेच कुठे?

अंतिम धक्का 28 एप्रिलला बसला. गोबेल्सच्या प्रचार मंत्रालयाने सूचना पाठवली,

‘‘ब्रिटनची समाचार एजन्सी वारंवार प्रचार करीत आहे की, हेन्रिक हिमलरने मित्रराष्ट्रांशी चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली असून, पश्चिमेस जर्मन सेना आयसेजरहावरसमोर शस्त्रे समर्पित करण्यास तयार आहे.’’

•••

# ज्ञात-अज्ञात हिटलर

विसाव्या शतकातील अत्यंत महत्त्वाच्या, कुतूहल जागविणाऱ्या व इतिहास घडविणाऱ्या व्यक्तींपैकी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे अ◌ॅडॉल्फ हिटलर. लौकिक अर्थाने प्रसिद्ध होण्यासारखी कोणतीही पार्श्वभूमी नसताना केवळ आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर अवघ्या वीस वर्षांच्या कालावधीत जगाच्या इतिहासात प्रचंड उलथापालथ घडविणाऱ्या या व्यक्तीविषयी लोकांमध्ये आजही प्रचंड कुतूहल आहे. वास्तविक पाहता हिटलर, मुसोलिनी व स्टॅलिन हे तिघेही 'क्रूरकर्मा' म्हणूनच ओळखले जात. मात्र हिटलरविषयी जगभरात जितके लिहिले वा वाचले जाते, तितके या दोघांबद्दल लिहिले वा वाचले जात नाही हे सत्य आहे. हिटलरचे व्यक्तिगत आयुष्य, त्याचे इव्हा ब्रॉनशी असलेले प्रेमसंबंध, त्याचे राजकारणातील डावपेच, त्याचे यश, अपयश आणि मृत्यू या सगळ्याच गोष्टींचे लोकांना प्रचंड आकर्षण आहे. शुभंकराप्रमाणेच भयंकराविषयीही लोकांना जबरदस्त आकर्षण असते, याचेच उदाहरण म्हणून हिटलरला बघता येईल. हिटलर अत्यंत क्रूर व पाषाणहृदयी होता याबाबत कोणाचेच दुमत होणार नाही; परंतु तो असा का घडला असावा? हे ही जाणून घेणे सयुक्तिक ठरेल. अर्थात जाणून घेणे म्हणजे त्याच्या पाशवीवृत्तीचे वा अत्याचारांचे समर्थन करणे नव्हे, तर त्याच्या रूपाने मानवी मनाची गूढ गुंतागुंत समजून घेणे आहे. त्याचबरोबर त्याच्यातील काही इतर खास गुणवैशिष्ट्यांबद्दलही जाणून घेणे औचित्याचे ठरेल म्हणजे खरा हिटलर कसा होता हे समजेल.

बऱ्याच प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रं अभ्यासताना एक वैशिष्ट्य ठळकपणे जाणवते. ते म्हणजे त्या व्यक्तीचे बालपण कसे गेले यावरून त्याच्या भविष्यातील व्यक्तिमत्त्वाची कल्पना चित्रित होते. कारण बालपणी मन अत्यंत संवेदनक्षम व ग्रहणशील असते. त्यामुळेच अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे अर्थ लहान मूल आपल्या परीने लावते आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते.

'हाइडलर' ते 'हिटलर' या प्रवासानंतर त्याला किती अडचणींचा सामना करावा लागला हे तर आपण जाणतोच. वडिलांचा विक्षिप्त स्वभाव, त्यांचे सततचे नोकरी, शहर बदलणे, त्याच्या आईला वडिलांकडून मिळणारी कनिष्ठ दर्जाची वागणूक याचा परिणाम त्याचे बालपण हरपण्यात झाला. ज्या भावनिक गरजांची पूर्तता घरातून, जवळच्या व्यक्तींकडून होत नाही, त्यांची पूर्तता करण्यासाठी व्यक्ती इतर मार्ग शोधून काढते. हा मानवी स्वभावाचा एक पैलूच आहे. त्यामुळेच की काय, आपले म्हणणे ऐकले गेलेच पाहिजे, आपला अधिकार शाबूत राहायलाच हवा या जाणिवा लहानग्या अ◌ॅडॉल्फमध्ये विकसित व्हायला वेळ लागला नसावा. त्यामुळे शाळेतही तो स्वत:ला 'नेता'च समजायचा. जी मुले त्याचे ऐकायची नाहीत, त्यांच्याशी त्याने कधीही मैत्री केली नाही. शालेय व महाविद्यालयीन जीवनातील त्याचा एकमेव मित्र म्हणजे कुबिझेक; पण काही काळानंतर त्यांच्या वाटाही वेगळ्या झाल्या.

मात्र मुलांमध्ये उपजत असणारा खोडकरपणा अ◌ॅडॉल्फमध्ये पुरेपूर होता. लिन्झच्या शाळेत असताना श्वार्झ नावाच्या शिक्षकाची तो यथेच्छ टिंगलटवाळी करत असे. पुढे स्टेइर इथल्या शाळेत असताना पेट्रोनेला सिचिनी हिच्या खानावळीत तो राहत असे. सिचिनी दांपत्याचे कलहप्रसंग तो सभिनय

मित्रमंडळींना सांगत असे. तर कधी गृहपाठ झालेला नसेल तर आजारपणाचे असे हुबेहूब सोंग वठवी की शिक्षक म्हणत, ‘‘घरी जा आणि औषध घे. उद्या शाळेत नाही आलास तरी चालेल.’’

संपूर्ण जगावर सत्ता प्रस्थापित करायची महत्त्वाकांक्षा बाळगलेल्या हिटलरची तारुण्यात पदार्पण करतानाची इच्छा काय होती माहिती आहे? आपल्या कुबिझेक या मित्राबरोबर गावाबाहेर, नदीच्या काठाशी, टेकडीच्या पायथ्याजवळ एक घर बांधायचे व वरच्या मजल्यावर दोन प्रशस्त दालने उभारायची. त्यातील एक कुबिझेकच्या संगीतसाधनेसाठी उपयोगात आणायचे व दुसरे दालन अॅडॉल्फच्या चित्रकलेचा स्टुडिओ म्हणून वापरायचे. उन्हाळ्याच्या सुट्टीत दोघांनी भ्रमंती करायची व ठिकठिकाणचे गायक, वादक, चित्र, शिल्प प्रदर्शने यांचा अनुभव व आस्वाद घ्यायचा. नव्या कल्पना घेऊन पुन्हा वर्षभर आपापल्या कलेची जोपासना करायची. या कलाप्रासादाचे चित्रही हिटलरने रेखाटून ठेवले होते; पण नियतीच्या मनात काही वेगळीच योजना होती, हे मात्र खरे.

वडिलांचा अतोनात तिरस्कार करणारा हिटलर मातृभक्त होता हे तर पुस्तकात आलेले आहेच; परंतु सुरुवातीच्या काळात, आईच्या मृत्यूनंतर व्हिएन्नाला हिटलर कुबिझेक बरोबर अत्यंत अडचणीत एका खोलीत राहिला. मात्र नंतर त्याने या मित्राला भेटणे टाळले. व्हिएन्नाच्या मरणप्राय थंडीत एक ओव्हरकोट घेण्याइतके पैसेही हिटलरकडे नसायचे. इतकेच काय एकवेळच्या जेवणाची तरी भ्रांत मिटावी म्हणून त्याने अक्षरश: पडेल ते काम केले, तर कधी लाचारीने भीकही मागितली! कडाक्याच्या थंडीत दफनभूमीत जाऊन प्रेतांवर माती ढकलण्यापासून ते रस्त्यावरील बर्फ हटविण्यापर्यंत कामे करीत राहिल्याने त्याला खोकल्याचा भयंकर त्रास सुरू झाला. त्याची तब्येत कमालीची खालावली. अखेर थंडीने मरण्यापेक्षा त्याने बहीण अँगेलाला पत्र लिहिणे व पैसे मागवणे पत्करले. अँगेलाने दिलेले पन्नास क्रोनेन हातात पडताक्षणी हिटलरने सर्वप्रथम एक ओव्हरकोट विकत घेतला. त्याक्षणी ‘हा मुलगा पुढे जर्मनीचा फ्यूहरर होईल’ असे भाकीत कुणी केले असते; तर त्याला इतरांनीच काय; पण खुद्द हिटलरनेही वेड्यात काढले असते!

ही अन्नान्नदशा संपली ती हिटलरच्या लष्करातील प्रवेशाने. लष्करातील या प्रवेशाने जेवण, कपडा, निवारा, सगळ्यांचीच सोय झाली. लष्करात तो ‘डिस्पॅच रनर’ म्हणून नियुक्त झाला. ज्या कामावर त्याची नियुक्ती झाली आहे, ते काम तो पूर्णच करून यायचा. त्याचे वरिष्ठ म्हणायचे, ‘‘हा कधीच जखमी सैनिकांना तसेच टाकून देऊन निघून येत नाही किंवा अवघड कामगिरी सोपवली की आजारपणाची बतावणी करीत नाही.’’ याचमुळे की काय आपल्या सैनिकांकडून हिटलरनेही तीच अपेक्षा नेहमी बाळगली. लढाईत कधी तोफगोळ्यांचा वर्षाव होत असे. अशा वेळी सहकारी सुरक्षित स्थळी थांबण्याचे सुचवित. हिटलरला ते मुळीच मान्य नसे. तो म्हणत असे, **‘‘जे सैनिक केवळ स्वत:च्या सुरक्षिततेचा विचार करतात ते कधीच लढाई जिंकू शकत नाही** कदाचित याच प्रखर मतांमुळे त्याने नंतर आपल्या सैन्याला रशियावर कडाक्याच्या थंडीत व सैन्याची शारीरिक मानसिक स्थिती लक्षात न घेता आक्रमण करण्याचे आदेश दिले असावेत.

लष्करात त्याचे इतरांशी सौजन्याचे संबंध होते. सैनिकांना अधूनमधून घरचे खाद्यपदार्थ दिले जात. अशा वेळी ते आवर्जून हिटलरला बोलवायचे; पण आपण

त्यांना असे काहीच देऊ शकत नाही या भावनेने त्याला ओशाळवाणे वाटायचे. या अगत्याची परतफेड म्हणून तो त्यांना चित्र काढून द्यायचा.

त्याला वाचनाची अत्यंत आवड होती. त्यामुळे तो लष्करातही वाचन सुरूच ठेवी. त्यात युद्धविषयक साहित्याचा भरणा असे. या साहित्यानेच त्याच्यातील अंतस्थ प्रेरणेला हाक दिली असावी. कार्ल मार्क्स, शोपेनहॉवर त्याचे आवडते लेखक. तो म्हणायचा, ''असीम इच्छाशक्ती हेच माणसाचं खरंखुरं सामर्थ्य आहे असे म्हणणारा शोपेनहॉवर महान आहे!''

अवघ्या पाच फुटाच्या आसपास असणाऱ्या हिटलरला अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभली होती. याची चुणूक एकार्टच्या सभेला उपस्थितांना पहायला मिळाली. याच सभेत हिटलरने पहिला ज्यूद्वेषी उद्गार काढला. त्याचे वक्तृत्व इतके प्रभावी आणि खिळवणारे असायचे की, लोक त्यात आपोआपच वाहावले जात. समूहाच्या मानसशास्त्राविषयी हिटलर म्हणत असे,

''गर्दी स्त्री प्रवृत्तीची असते. गर्दीचं हे गुपित ज्याला कळत नाही, तो चांगला वक्ता होऊच शकत नाहीतरी, स्त्रीला पुरुषाकडून कोणती अपेक्षा असते? आपल्याला समजून घेणारा, प्रेम करणार प्रसंगी धाक दाखवणारा पुरुष तिला हवा असतो. त्याच्या सहवासात तिला निर्धास्त वाटायला असतं. तुम्ही तिच्या या अपेक्षा पूर्ण केल्या की ती तुमच्यासाठी काहीही करायला तयार होते! ३ आवडत्या पुरुषासाठी कोणताही त्याग केला तरी तिला तो अपुराच वाटतो.''

त्याचे हे मानसशास्त्रीय विश्लेषण भल्याभल्यांना अचंबित करून टाकते. हे मानसशास्त्र कळल्यामुळेच त्याची एकही सभा कधीही व्यर्थ गेली नाही, असे वाटते.

हिटलर जेव्हा 11 नोव्हेंबरच्या क्रांतीत अपयशी ठरला तेव्हा तो म्हणाला होता,

''प्रत्येक देशाला आपल्या उत्थानाचा मार्ग स्वतंत्रपणे शोधून काढावा लागतो. दुसऱ्यांचे आंधळे अनुकरण करून काहीही साध्य होत नाही!''

एरव्ही अपयशाने संतापून जाऊन बेभान होणाऱ्या हिटलरकडे हे शहाणपण कुठून आले होते कुणास ठाऊक? वास्तविक पाहता, जर्मनीला आपले गतवैभव प्राप्त कसे करून देता येईल, याविषयी बोलताना तो म्हणायचा,

''उत्पादनचक्राला गती दिल्याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जर्मनीचा निभाव लागणे कठीण आहे. हमरस्त्याचं जाळं विणून सारा देश जवळ आणला पाहिजे. रस्तेबांधणीमुळे बेकार मजुरांना काम देता येईल. सामान्य माणसाला परवडतील अशा छोटया मोटारींची निर्मिती करून दळणवळणही वाढवायला हवे. दळणवळणामुळे उद्योगधंदे उभारले जातील व रोजगार निर्माण होईल.''

त्याचे हे अर्थकारणाविषयीचे विचार ऐकले की असे वाटते की जर या माणसाला योग्य दिशा मिळाली असती, तर कदाचित वेगळाच इतिहास घडला असता. आर्थर मोलर व्हॅन डेन ब्रफ या राजकीय निरीक्षकाने हिटलरच्या बाबतीत काय लिहून ठेवले आहे ते पाहू.

''हिटलरमध्ये अनेक दोष आहेत. तो क्रूर, अहंकारी आणि उद्धट आहे; पण त्याच्या उत्कट देशभक्तीविषयी कोणालाच शंका घेता येणार नाही. जर्मनीचे पुनरुत्थान करण्याचा त्याने विडाच उचलला आहे. सुसंस्कृत माणसासारख्या हिटलरला आपल्या भावना लपविता येत नाही.

याबाबतीत तो आदीमानवच आहे. नाहीतर आपले राष्ट्रीय समाजवादाचे तत्त्वज्ञान तो अधिक चलाखपणे सांगू शकला असता. आपल्या तत्त्वज्ञानाला तो बौद्धिक आशय देऊ शकत नाही.''

'विद्वत्तेपेक्षा इच्छाशक्ती महत्त्वाची' हे त्याचे तत्त्वज्ञान होते.

हिटलरला क्रांतीने झपाटले होते; पण क्रांती दीर्घायुषी नसते याची त्याला पूर्ण जाणीव होती. सत्ता मिळविणे आणि सत्ता टिकवणे यातला फरक आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना समजावून सांगताना हिटलर म्हणाला होता,

''देशाची राजकीय सूत्र मिळविण्यासाठी आपल्याला बरीच घाई करावी लागली; पण तशी घाई करावीच लागते, कारण क्रांतीपाशी वेळ नसतो. सारं काही एकाच प्रयत्नात मिळविण्यासाठी र्त अधिर झालेली असते. त्यामुळे याबद्दल खंत न करणे योग्य! मात्र सत्ता हातात आल्यानंतर पूर्व निरुपयोगी ठरतात हे आपण ओळखलं पाहिजे.''

राजकारण आणि अर्थकारण यातला फरक स्पष्ट करून सांगताना तो म्हणतो,

''राजकारण जहाल असावं लागतं; पण अर्थकारणात नेमस्तपणे वागणेच हिताचे असते. आर्थि विकास टप्प्याटप्प्यानेच घडून येतो. म्हणून आर्थिक धोरणाच्या बाबतीत आपली मत सरकार लादण्याऐवजी, त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत घ्यावे हे अधिक चांगले! नाहीतर अर्थव्यवस्थेत एक बदल केले तर देशाचं सारं अर्थकारण उद्ध्वस्त होईल.''

विशेष म्हणजे हिटलरची ही मते ऐकून त्याचे विरोधकही त्याच्या बाजूने बोलत. हिटलर पंतप्रधान झाल्यावर त्याने जर्मनीत नाझी पक्षाव्यतिरिक्त सर्व राजकीय पक्ष विसर्जित करून एकाधिकारशाही आणली. त्यापैकी एका पक्षाच्या प्रमुखाने हिटलरबद्दल व्यक्त केलेले मत असे होते -

''हिटलर राज्यकारभार चांगला करेल याबाबत मला खात्री आहे. त्याचे विचार अगदी स्पष्ट आहेत. तो कधीही मोघम बोलत नाही. त्याचं सगळं वागणंच रोखठोक आहे. अशा माणसाशी मतभेद झाले तरी त्याच्यावर रागवता येत नाही. प्रचारात अतिरेकी, विचारात ध्येयवादी; पण वागणुकीने व्यवहारवादी असाच माणूस सध्या जर्मनीला हवा आहे.''

30 जानेवारी, 1937 रोजी हिटलरने सत्ता स्वीकारून चार वर्षं पूर्ण झाली. या चार वर्षात त्याने जर्मनीला खरोखरच तिचा हरवलेला आत्मविश्वास परत मिळवून द्यायची किमया साधली होती. त्याने राष्ट्रीय राजमार्ग सुधरवले त्यामुळे व्यापार वाढला. मध्यमवर्गीय जर्मनांना परवडेल अशी गाडी तयार करण्याचे काम त्याने फर्डिनांड पोर्श या तंत्रज्ञाकडे सोपविले. शहरे सुंदर व स्वच्छ करायच्या मोहिमा सुरू केल्या. कामगारांना अनेक सुविधा देण्यात आल्या, त्यात त्यांना अत्यल्प दरात चित्रपट, नाटकं दाखवणे, सरकारी साहाय्याने पर्यटन इ. चा समावेश होता. शाळांमध्ये विज्ञानशिक्षणावर भर देण्यात आला. आर्थिक मंदी व औद्योगिक बेकारी या मूलभूत समस्यांवर त्याने अत्यंत प्रभावी तोडगे काढले. जॉन केनेथ गालब्रेथ या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने तर याबाबत हिटलरची तुलना थेट रूझवेल्टशी केली. त्याचे गौरवोद्गार पहा :

''अर्थशास्त्रज्ञांना आर्थिक समस्या शोधून काढता येतात; पण त्यावर उपाय सुचविता येत नाही याउलट अर्थशास्त्राचा गंधही नसलेल्या व्यक्ती आपल्या कल्पकतेच्या बळावर अवघड भासणा आर्थिक पेचप्रसंगातून लोकांना बाहेर काढू शकतात. रूझवेल्टने अमेरिकन मंदीच्या काळात जे

करून दाखवले तेवढ्याच तोलामोलाचे कार्य हिटलरने जर्मनीत केले आहे. या दोघांना अर्थशा
समजत नव्हते ही किती चांगली गोष्ट आहे!"

विशेष म्हणजे 1936 साली जागतिक शांततेसाठी ठेवण्यात आलेल्या



नोबेल पारितोषिकासाठी जी काही दोन-चार नावे सुचविण्यात आली होती, त्यात हिटलरच्या नावाची शिफारस केली गेली होती.

इतकेच नव्हे प्रत्यक्ष हिटलरलाही स्वत:च्या नेतृत्वाबाबत कमालीचा आत्मविश्वास होता. तो म्हणायचा

"मला एक महत्त्वाचं ऐतिहासिक कार्य करायचे आहे. नियतीच माझ्याकडून हे कार्य करून घेण
ते कार्य हेच माझे जीवन आहे. आजचा जर्मनी पहा. जर्मनीच्या इतिहासात जे कुणी करून दाख
नव्हतं, ते मी केलं आहे आणि लक्षात ठेवा हे मी बंदुकीच्या धाकावर घडवून आणलेलं नाही. म
जनतेवर प्रेम आहे. जनतेचा माझ्यावर विश्वास आहे. लोकांचं माझ्यावरचं प्रेम आणि माझ्या
नेतृत्वावरचा त्यांचा विश्वास अढळ आहे."

मात्र असे म्हणणारा हिटलर युद्धाविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणे,

"जगातला कोणताही महत्त्वाचा प्रश्न आतापर्यंत कधीही युद्धाशिवाय सुटलेला नाही याला इति
साक्षी आहे. प्रत्येक पिढीनं एकदा तरी युद्धाचा अनुभव घेतला पाहिजे. त्याशिवाय जिंकण्याची
जागी राहत नाही."

बऱ्याचदा हिटलरने कारणाशिवाय युद्ध ओढवून घेतले होते हे त्याचे चरित्र वाचताना वारंवार जाणवते; परंतु 'लढेन किंवा मरेन' हा बाणा मात्र त्याने कायम ठेवला आणि तो मेलाही तसाच! मुसोलिनीच्या दुर्दशेचे वृत्त ऐकून त्याने आत्महत्या करण्याचा आपला निर्णय अधिक पक्का केला. या गोष्टीकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन असतील. असेही असू शकेल की ज्या जर्मनीच्या जनतेपुढे तो मोठ्या दिमाखाने 'फ्यूहरर' म्हणून वावरत असे, त्यांना आश्वासनं देत असे त्या जनतेसमोर नामुष्की पत्करणे त्याला अवघड गेले असावे. मुसोलिनीच्या मृतदेहाची विटंबना समजताच त्याला अशी अवस्था होण्यापेक्षा मरण स्वत:हून पत्करणे श्रेयस्कर असेही वाटले असावे किंवा तो पराकोटीचा आत्मपूजक असल्याने ही मानहानी पचविण्याची त्याची तयारी नसावी. कारण काहीही असले तरी त्याचा अंत दुर्दैवीच म्हणावा लागेल. या पार्श्वभूमीवर त्याचे एक जगप्रसिद्ध वाक्य आठवल्याशिवाय रहात नाही. ते म्हणजे
"One who wins without any problem is called vicotory but one who wins with lots of troubles that is History"

कवी रेगे यांची एक कविताही या ठिकाणी आठवते

"काही गोष्टींचा उलगडा घड्याळ बंद पडायच्या आतच व्हावा लागतो.

पण आता तर घड्याळही बंद पडलंय आणि गोष्टीही तशाच राहून गेल्या."

हिटलरच्या बाबतीतही काहीसे असेच झाले असावे. अशा या हिटलरला जाणून घेताना अनेक गोष्टींचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. त्या गोष्टी म्हणजे मद्य, धूम्रपान व मांसाहार व स्त्रिया या चारही गोष्टींपासून हिटलर दूर राहिला. इव्हा ब्राऊनशी तो अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिला.

प्रचंड मानवी संहार घडविणाऱ्या हिटलरला रक्त बघून मळमळत असे!

विज्ञान आणि धर्माबाबत त्याचे विचार मात्र अगदी शंभर टक्के बुद्धिवादी होते. तो म्हणायचा

“शास्त्राच्या प्रगतीपुढे धर्माची पोथीनिष्ठा दुबळी पडेल. जसजसे विश्वासंबंधी अधिकाधिक ज्ञा उपलब्ध होईल, माणूस निसर्गाच्या जितका जवळ जाईल व पृथ्वीप्रमाणेच ग्रह व तारेही माणस निवासस्थाने होतील असे माणसाच्या लक्षात येईल तितका तो चर्चपासून दूर जाईल. विज्ञाना विजय अटळ आहे.”

आपल्या जन्मगावी म्हणजे लिंत्झ येथे वेधशाळा उभारण्याचा त्याचा मानस होता. मानवनिर्मित धर्मावर त्याची श्रद्धा नव्हती; पण विश्वाचे नियंत्रण करणारी कुणी शक्ती आहे यावर मात्र त्याचा विश्वास होता.

एरव्ही नेहमी उग्र व गंभीर असलेल्या हिटलरला कधी कधी काव्यशास्त्र



विनोदातही रमावेसे वाटे. रात्रीचे जेवण झाल्यावर त्याचा परिपाठ इंग्रजी, फ्रेंच व जर्मन बोलपट पाहणे हा असे. ग्रेटा गार्बो त्याची आवडती अभिनेत्री होती. वैयक्तिक मेजवान्यांच्या प्रसंगी हिटलर अगदी खुलून हास्यविनोदात रमत असे. एकदा 1937 च्या नाताळमध्ये आपल्या निवासस्थानी काम करणाऱ्या क्रॉस नावाच्या कर्मचाऱ्यासोबत तो साध्या वेशात, अंगरक्षक बरोबर न घेता गंमत म्हणून शहरात फेरफटका मारून आला!

हिटलरचे आरोग्य अभ्यासायचे झाले तर तो कोणत्याही आजाराने नव्हे तर तो आत्महत्या केल्याने मरण पावला हे तर सर्वश्रुतच आहे; पण तरीही तो अधून मधून पोटदुखी, भयंकर डोकेदुखी, शरीर कंप पावणे, कावीळ या आजारांनी त्रस्त असायचा. हे आजार मनोकायिक म्हणजेच Psychosomatic आजार असावेत.

आत्यंतिक अहंकारी व आत्मपूजक असलेल्या हिटलरचे घरातल्या नोकरमंडळींबरोबरचे वागणे मात्र अतिशय प्रेमळपणाचे होते. तेही मनोभावे हिटलरची सेवा करत. हिटलरच्या संतापाची कीर्ती ऐकून त्याची सेक्रेटरी ट्रॉडल सुरुवातीला त्याच्या घरातील कार्यालयात पत्र उतरवून घेण्यासाठी भीतभीतच प्रवेशत असे. एकदा तो तिला म्हणाला, “घाबरू नकोस ट्रॉडल. चुका झाल्या तर होऊदे. कारण कदाचित पत्र सांगताना तुझ्यापेक्षा मीच अधिक चुका करत असेन.”

मात्र असे असले तरीही हिटलरने ज्या चुका केल्या त्याचे कुठेही समर्थन होऊ शकत नाही. अर्थकारणाची चांगली जाण असलेल्या या माणसाने जर्मनीला पुनश्च एकदा

उघड्यावर आणून ठेवले. युद्ध संपले तेव्हा जर्मनीच्या जनतेला अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसाठीही याचना करावी लागली. सैनिकांचे रक्त बघून कसेसेच होणाऱ्या याच फ्यूहररने असंख्य लोकांचे बळी घेतले. धर्मांधतेचा एकेकाळी धिक्कार करणाऱ्या याच हिटलरला वंशद्वेषाने झपाटून टाकले आणि त्याने भयानक नरसंहार घडविला.

विज्ञानाभिमुख विचार असलेल्या हिटलरच्याच काळात अनेक शास्त्रज्ञ व तंत्रज्ञांना देश सोडावा लागला, तर काही शास्त्रज्ञांना नोबेल पुरस्कार स्वीकारायलाही त्याने बंदी घातली. त्याची जाज्वल्य राष्ट्रभक्तीही देशाला विनाशापासून वाचवू शकली नाही. अखेरीस त्याला पराभवाची नामुश्की पत्करावीच लागली.

या सगळ्या गोष्टी जाणून घेतल्यावर असे वाटते की माणूस नियतीवर स्वार होऊ शकत नाही हेच खरे. व्हिएन्नाच्या बर्फाळ रस्त्यावर अक्षरश: भीक मागणारा मुलगा जर्मनीचा फ्यूहरर होतो काय, जर्मनीच्या गळ्यातला ताईत बनतो काय आणि अखेरीस जर्मनीला विनाशाच्या खाईत ढकलून मृत्यू पत्करतो काय. सारेच विलक्षण!

•••

# घायाळ मी हरिणी...

ज्याचे नाव दहशतीच्या समानार्थी म्हणून घेतले जाते अशा हिटलरच्या आयुष्यात प्रेमाला काय स्थान असावे बरे? खरे म्हणजे हिटलरवर कुणी प्रेम करू शकेल वा तो कुणावर प्रेम करू शकेल ही कल्पनाच विरोधाभासी वाटते; पण असे असले तरीही हिटलरच्या आयुष्यात त्याला शेवटपर्यंत साथ देणारी व त्याच्याबरोबरच मृत्यूही पत्करणारी इव्हा ब्राऊन सर्वांनाच परिचित आहे. एका फोटोग्राफरकडे काम करणारी ही सामान्य मुलगी हिटलरसारख्या जर्मनीच्या राष्ट्रप्रमुखाच्या प्रेमात पडते व ते प्रेम आयुष्यभर निभावते ही गोष्टच सिनेमात शोभून दिसेल अशी! विशेष म्हणजे युरोपसारख्या मुक्त समाजव्यवस्थेत राहणाऱ्या हिटलरनेही हे नाते एकनिष्ठपणे निभावले. गंमतीचा भाग म्हणजे राजकारणात प्रवेश केल्यापासून कितीतरी मुली हिटलरकडे आकर्षित व्हायच्या; पण हिटलर मात्र स्त्रियांच्या बाबतीत अत्यंत संकोची होता.

आई व बहिणीशिवाय हिटलरच्या आयुष्यात आलेली पहिली स्त्री म्हणजे गेली राबॉल. आपल्या या भाचीबद्दल हिटलरला विशेष आकर्षण वाटत असे. ती दोघे तळ्याकाठी फिरायला जात व उपाहारगृहातही एकत्र जात असत. गेलीला नृत्यसमारंभात भाग घ्यायची आवड होती; पण 'रात्री अकराच्या आत घरी आलं पाहिजे' या अटीवर हिटलर तिला रक्षकांसोबत जायची परवानगी देत असे. हिटलर आणि इव्हा ब्राऊन यांच्यातील वाढत्या भेटीची गेलीला कुणकुण लागली. एक दिवस तिला हिटलरच्या कोटमध्ये खालील पत्र मिळाले

'प्रिय हिटलर,

कालची संध्याकाळ फारच चांगली गेली. नाटकही चांगले होते. पुन्हा लवकर भेटूया. मी वाट पाहत आहे.''

- इव्हा ब्राऊन.

गेलीची त्यांच्या संबंधांबाबत खात्री पटली आणि तिने गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेचा हिटलरवर चांगलाच परिणाम झाला. त्या दिवसापासून त्याने मांसाहार सोडला तो कायमचाच; परंतु स्वत: मद्यपान, धूम्रपान व मांसाहार करत नसलेला हिटलर इव्हाला मात्र कशासाठीही आडकाठी करायचा नाही. इव्हा ब्राऊनबरोबर तो अतिशय समजुतदारपणे वागत असे.

खरं तर इव्हा हिटलरच्या प्रेमात का पडली असावी? याला तार्कीकदृष्ट्या कोणतेही उत्तर नाही. हिटलरचे राजकीय स्थान काय आहे, हे तिला त्यांच्या पहिल्या भेटीनंतर समजले. त्याचे राजकारण, त्याची प्रसिद्धी, त्याचे राष्ट्रप्रमुख असणे या सगळ्याबद्दल इव्हाला अप्रुप असावे; पण केवळ त्याच भांडवलावर ती त्याच्या आयुष्यात आली असे म्हणणे धारीष्टयाचे ठरेल. परंतु त्यांचे नाते पाहता स्त्री ज्याला आपलं सर्वस्व अर्पण करते, त्याच्याप्रती आयुष्यभर निष्ठा बाळगते हे अगदी पटते.


हिटलरदेखील इव्हाच्या आवडत्या गोष्टींमध्ये रुची घेत असे. दोघे ऑपेरा पहायला जात. ती त्याच्या सभांनाही हजर असे; पण अळवावरच्या पाण्यासारखी इव्हा त्याच्या राजकीय जीवनापासून अलिप्त राहिली. सुरुवातीच्या काळात हिटलर व ती म्यूनिक

येथे भेटत. नंतर ते बर्शतिस्गडेनच्या भेटू लागले. यासंबंधीच्या नोंदी इव्हा ब्राऊनच्या डायरीत आढळतात. त्यात कधी तिने तो भेटल्यावर झालेला आनंद व्यक्त केला आहे, तर कधी तो पुरेसा वेळ देत नसल्याबद्दलचा लटका राग, तर कधी हिटलर दुसऱ्याच मुलीच्या प्रेमात पडल्याचा संशयही! पण हे खरे नव्हते. अनेक मुलींना हिटलरचे प्रेम, त्यांचा सहवास आपल्याला लाभावा असे वाटे; पण त्याच्या दृष्टीने इव्हाच महत्त्वाची होती.

'लिव्ह इन रीलेशनशिप' म्हणावे असे नाते हिटलर व इव्हात निर्माण झाले होते; पण हिटलरने आपल्याशी लग्न करावे या विचाराने इव्हा झुरत असे. तिने अनेकदा स्पष्टपणे विचारूनही हिटलरने त्यास नकार दिला होता. आपल्याला लग्न का करायचे नाही हे सांगताना हिटलर म्हणायचा

"राजकारणातील माणसाने सार्वजनिक जीवन पत्करू नये नाहीतर त्याची राजकीय कारकीर्द संपुष्टात येते. शिवाय, कर्तबगार लोकांची मुले नालायकच निघतात. मग लग्नाचा अट्टाहास कशासाठी?"

मात्र इव्हाची ही स्त्रीसुलभ आकांक्षा तिची पाठ सोडायला तयार नव्हती.



त्यापायी तिने दोनदा आत्महत्येचा प्रयत्नही केला; पण नंतर मात्र तिने लग्नाच्या इच्छेपेक्षा हिटलरच्या तिच्यावरील प्रेमाला व सहवासाला झुकते माप दिले. कदाचित तिला हे कळून चुकले असेल की पुरुष बदलत नाहीत, स्त्रियांनाच बदलावे लागते.

हिटलरला भेटायला देशोदेशीचे राजकारणी येत. त्यांच्याबरोबर त्यांच्या बायकाही असत; पण इव्हा हिटलरची लग्नाची बायको नसल्याने तिला काहीशा कोरड्या अलिप्तपणानेच वागवले जात. समाजव्यवस्था कोणतीही असली तरी लग्न न करता एकत्र राहणाऱ्या जोडप्यांकडे, त्यातही विशेषत: स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन दूषितच असतो, हे इथे अधोरेखित होते.

पत्नी, आई, गृहिणी बनण्याच्या सर्व स्त्रीसुलभ उर्मींना तिलांजली देऊन इव्हा हिटलरजवळ अखेरच्या श्वासापर्यंत थांबली यातच तिचे मोठेपण दिसते. हिटलरच्या चेंबरवर अखेरचा हल्ला होण्यापूर्वी ती सहज तिथून सुरक्षित स्थळी जाऊ शकली असती; पण आपल्या लाडक्या 'अॅल्फ'ला अशा परिस्थितीत सोडून जाणे म्हणजे आपल्या प्रेमाची विटंबना करणेच आहे असे तिला वाटले असावे. त्याचे फळ तिला मिळालेही. इव्हा ब्राऊन 'इव्हा हिटलर' झाली. अवघे चोवीस तासाचे वैवाहिक जीवन लाभलेली इव्हा त्यावेळी किती अवघड मन:स्थितीत असेल याची कल्पना येते. 'पत्नी' चा दर्जा मिळविण्याच्या मोबदल्यात आपल्या आयुष्याचीच आहुती द्यावी लागेल हे पूर्णपणे ओळखून असणारी इव्हा म्हणूनच धीरोदात्तपणे मृत्यूला सामोरी गेली. हिटलरच्या रणरणत्या वाळवंटी आयुष्यातील 'ओअॅसिस' हिटलरबरोबरच नष्ट झाले; पण तिच्याबाबतचे कुतूहल मात्र तसेच राहिले.

•••

# हिटलरचा अंत

गोरिंग आणि हिमलरने साथ सोडली. सोव्हिएत सैन्य बर्लिनमध्ये दूरवर आत शिरले. हिटलरने स्वत:च्या मृत्यूची तयारी सुरू केली.

28 तारखेला बरीच रात्र होईपर्यंत हिटलर जागाच होता. त्याने आपले वैयक्तिक मृत्युपत्र तयार करविले. दोन भागांच्या एकूण वारसाहक्काचा करारनामाही लिहून ठेवला. त्यात द्वितीय विश्वयुद्धासह अनेक विरुद्ध गोष्टींसाठी यहुदींनाच दोषी ठरविले.

मध्यरात्र उलटण्याआधी एका लहानशा कार्यक्रमात हिटलरने ईवा ब्रॉनशी विवाह केला. त्याने जवळच्या लोकांसह विवाहसोहळा साजरा केला.

29 एप्रिलच्या दुपारपर्यंत सोव्हिएत सैन्य फ्यूहरर बंकरपासून 1 मैल अंतरावर येऊन धडकले. बाह्य जगातून झिरपत झिरपत एक बातमी बंकरमध्ये पोहोचली,

'इटलीच्या हितचिंतक लोकांनी हुकूमशहा मुसोलिनीला पकडून ठार केले. आधी त्याला झाडाला उलटे लटकवले. नंतर तेथून खाली उतरवून त्याचे प्रेत एका घाण नाल्यात फेकून दिले.'

आपले भविष्य आणि शेवट काय होईल ते हिटलरला कळून चुकले.

त्याने सांभाळून ठेवलेल्या विषाचा प्रयोग आधी आपला आवडता कुत्रा ब्लाँडीवर केला. आपल्या महिला सचिवांना सायनाईड विषाचे कॅप्सूल देऊन तो म्हणाला,

"मला क्षमा करा. तुमच्या जवळून कायमचा दूर जाताना तुम्हाला देण्यासाठी माझ्याजवळ यापेक्षा चांगला असा दुसरा कोणताच उपहार नाही. रशियन सैनिकांनी बंकरमध्ये प्रवेश केल्यास महिलांनी मी दिलेल्या या कॅप्सूलचा सरळ वापर करून आपल्या पवित्र राष्ट्राच्या प्रतिष्ठेचे रक्षण करावे."

30 एप्रिलची सकाळ! रात्रीचे 2.30 वाजलेले. सूर्योदय व्हायला अद्याप बराच अवकाश. हिटलर स्वत:च्या कक्षातून बाहेर पडला. आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांचा निरोप घेण्यासाठी त्यांच्याजवळ आला. त्याने प्रत्येकाशी रुबाबात हस्तांदोलन केले. पुन्हा आपल्या खाजगी कक्षात निघून गेला.

दुपारी हिटलरने आपल्या शेवटच्या बैठकीत भाग घेतला. परिस्थितीच्या समीक्षेदरम्यान माहीत झाले की, सोव्हिएत सैन्य आता केवळ एक ब्लॉक अंतरावर पोहोचले आहे. रात्री 2.00 वाजता हिटलरने आपले शेवटचे शाकाहारी भोजन घेतले. आपल्या ड्रायव्हरला चान्सलरी बागेत 200 लिटर पेट्रोल आणून ठेवायला सांगितले. पत्नी ईवासह बोर्मन, गोबेल्स, जनरल क्रेब्ज, इतर सैनिक, सहायक अधिकारी, स्टाफ सदस्य यांना अभिवादन केले.

हिटलर आणि त्याची पत्नी आपल्या खाजगी कक्षात गेले.

शत्रूची गोळी लागून कुत्र्याच्या मौतीने मरणे किंवा शत्रूच्या कैदेत खितपत पडणे या दोन्ही गोष्टी जिद्दी हिटलरला मान्य नव्हत्या.

बार्मेन आणि गोबेल्स बाहेरच घोटाळत राहिले. काही क्षण नीरव शांततेत गेले. नंतर आतून एक गोळी चालण्याचा आवाज ऐकू आला. दुपारचे 3.30 वाजले. बोर्मन आणि गोबेल्स आत गेले. आता ते विनाशकारी वादळ शांत झाले होते. हिटलर एका सोफयावर मरून पडला होता. त्याच्या उजव्या कानफटीकडून रक्त वाहत होते. ईवा ब्राननने विष खाऊन जीवनयात्रा संपवली होती.

रशियन तोफांचे गोळे जवळजवळ पडू लागले होते. दोघांची प्रेते बंकरमधून वर चान्सलरी बागेत आणली गेली. पेट्रोल टाकून त्यांना पेटवण्यात आले. बोर्मन आणि गोबेल्सने मृतकांना अंतिम नाझी सलामी दिली. तोफगोळ्यांनी तयार झालेल्या एका खड्ड्यात त्यांचा दफनविधी करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी 1 मेला गोबेल्स आणि त्याच्या पत्नीने बंकरमध्ये आपल्या सहा तरुण मुलांना आधी विष देऊन ठार केले. स्वत: चान्सलर बागेत जाऊन एका सैनिकाकडून स्वत:वर गोळ्या झाडून घेतल्या.

जर्मन साम्राज्यासाठी क्षेत्र वाढविण्याची स्वप्ने पाहणारा हिटलर चान्सलरीच्या उद्यानात चिरशांती घेत होता. तो संपला होता. मात्र युद्ध थांबले नव्हते. ते सुरूच होते! सुरूच होते!!

•••